CMYK



महिला दिन विशेष

सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित




आसमंतसह

लातूर | रविवार, ८ मार्च २०२६ । वर्ष ३ रे अंक ३६५ । पाने १२+८+८ । किंमत रु. ६/- | RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प



स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सत्ता हेच राष्ट्रनिर्माणाचे एकमेव साधन मानले गेले. त्यामुळेच सार्वजनिक जीवनावर सत्ताभिमुख राजकारणाचे सावट पडले. त्याचाच परिणाम म्हणून मागील काही वर्षांत सामाजिक, शैक्षणिक आणि राष्ट्रीय जीवनाच्या अन्य भागांत नेतृत्वाचा म्हणावा तसा विकास झाला नाही. सत्तेच्या प्रांतात प्रवेश घेणे, हेच प्रत्येकाचे लक्ष्य बनले.

**भारतरत्न नानाजी देशमुख**
संस्थापक, दीनदयाल शोध संस्थान

# युद्धाचा फटका; गॅसचा भडका

## घरगुती एलपीजी ६० तर व्यावसायिक सिलेंडर ११५ रुपयांनी महागले

◆ **नवी दिल्ली, ७ मार्च**

पश्चिम आशियातील संघर्षाशी संबंधित वाढत्या ऊर्जा किमतींमुळे घरगुती एलपीजी आणि व्यावसायिक सिलेंडरच्या किमती अनुक्रमे ६० आणि ११४.५ रुपयांनी वाढवण्यात आल्या आहेत. इंडियन ऑईल कॉर्पोरेशनच्या (आयओसी) संकेतस्थळानुसार, उज्ज्वला लाभार्थ्यांव्यतिरिक्त सामान्य घरगुती वापरकर्ते त्यांच्या स्वयंपाकघरात वापरत असलेल्या विना-अनुदानित एलपीजीची किंमत आता दिल्लीत प्रति १४.२ किलो सिलेंडर ९१३ रुपये असेल. पूर्वी ही किंमत ८५३ रुपये होती. एक वर्षापेक्षा कमी कालावधीत ही दुसरी वाढ आहे.



पश्चिम आशियातील लष्करी संघर्ष सुरू झाल्यापासून जागतिक स्तरावर ऊर्जेच्या किमती भडकल्याने ही वाढ करावी लागत आहे, असे उद्योग अधिकाऱ्यांनी सांगितले.

किमती वाढल्या असूनही शेजारील देशांच्या तुलनेत भारतात स्वयंपाकाच्या गॅसची किंमत सर्वांत कमी आहे. ही दरवाढ शनिवारपासूनच (७ मार्च) लागू झाल्याचे इंडियन ऑईल कॉर्पोरेशनच्या संकेतस्थळावर म्हटले आहे.

मागील ११ महिन्यांत दरांमध्ये झालेली ही दुसरी वाढ आहे. मागील वर्षी एप्रिलमध्ये एलपीजी सिलेंडरच्या दरात ५० रुपये वाढ करण्यात आली होती. मुंबईत विनाअनुदानित एलपीजीची किंमत आता ९१२.५० रुपये, कोलकातामध्ये ९३९ रुपये आणि चेन्नईमध्ये ९२८.५० रुपये आहे.

स्थानिक कर आणि व्हॅटच्या प्रमाणानुसार दर राज्यानुसार वेगवेगळे असतात. उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना २०१६ मध्ये योजना सुरू झाल्यापासून मोफत एलपीजी जोडणी मिळालेल्या १० कोटींपेक्षा जास्त गरिबांना, वर्षातून १२ रिफीलसाठी प्रती १४.२ किलो सिलेंडरवर ३०० रुपयांचे अमुदान मिळेल. (वृत्तसंस्था)

### तेल खरेदीसाठी परवानगीची गरज नाही

#### ट्रम्प यांना भारताचे उत्तर

अमेरिकी-इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर होर्मुझच्या सामुद्रधुनीत तणाव निर्माण झाला आहे. त्यामुळे तेलाबाबत जगात गंभीर चिंता निर्माण झाली आहे. या परिस्थितीत रशियाकडून महिनाभर तेलखरेदीसाठी अमेरिकेने भारताला सूट दिल्याचे वृत्त आले. अमेरिकेला भारताने उत्तर दिले असून, स्वस्त तेल मिळेल तिथून खरेदी केली जाईल. भारताला तेल खरेदीसाठी कुणाच्या परवानगीची गरज नाही, असे स्पष्ट केले.

अडथळे निर्माण झाले असले, तरी भारताने ऊर्जा पुरवठा सुरक्षित ठेवला आहे, असे केंद्र सरकारने स्पष्ट केले. ■

#### फेब्रुवारीतही रशियाकडून आयात

भारत रशियन तेल खरेदी करण्यासाठी कधीही कोणत्याही देशाच्या परवानगीवर अवलंबून राहिलेला नाही. भारत फेब्रुवारी २०२६ मध्ये अजूनही रशियाकडून तेल आयात करीत आहे आणि रशिया अजूनही भारताचा सर्वांत मोठा कच्च्या तेलाचा पुरवठादार आहे, असे केंद्राने म्हटले. ■




## टी-२० विश्वचषक कोण जिंकणार?

### भारत-न्यूझीलंड अंतिम सामना आज

◆ **अहमदाबाद, ७ मार्च**

आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत रविवारी येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर गतविजेता भारत आणि न्यूझीलंड यांच्यादरम्यान अंतिम सामना खेळला जाणार आहे. एकीकडे सूर्यकुमार-यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ इतिहास घडविण्याचा प्रयत्न करेल. दुसरीकडे मिचेल सॅण्टनरच्या नेतृत्वाखालील न्यूझीलंड संघ आपले पहिले विजेतेपद मिळवण्याचे लक्ष्य ठेवेल. (वृत्तसंस्था)

# विदर्भ तापला

### अकोला, अमरावती, वर्धेत पारा ४० पार

### पुण्यात ३७ अंश तापमानाची नोंद

◆ **नागपूर, ७ मार्च**

होळीचा सण साजरा होताच विदर्भ आणि महाराष्ट्राच्या काही भागांमध्ये उष्णतेची प्रखर लाट आली आहे. विदर्भात शनिवारी अकोला, अमरावती आणि वर्धा जिल्ह्यात पारा ४० च्या वर गेला असून, पुण्यात ३७ अंश तापमानाची नोंद करण्यात आली. दरम्यान, हवामान विभागाने पुढील दोन दिवस राज्यभर उष्णतेचा इशारा दिला आहे.

विदर्भात अकोला येथे सर्वाधिक ४०.८ इतक्या सर्वाधिक तापमानाची नोंद करण्यात आली. त्याखालोखाल अमरावतीत ४०.६ आणि वर्धेत ४० अंश इतक्या तापमानाची नोंद झाली.

वाशिममध्ये ३९.२, चंद्रपुरात ३८.८ आणि यवतमाळात ३८.४ अंश सेल्सियस तापमान होते तसेच गडचिरोलीत ३८.२ अंश तापमान नोंदविण्यात आले. त्याखालोखाल नागपूर शहरात ३७.८ अंश इतके तापमान होते. त्यानंतर भंडारा येथे ३७.४ आणि बुलढाण्यात ३७.२ तापमानाची नोंद झाली. तर, गोंदियात ३६.६ अंश इतके तापमान होते. दरम्यान, हवामान खात्याने मुंबई, पालघर, ठाणे, रायगड या जिल्ह्यांना उष्ण व आर्द्र हवामानाचा यलो अलर्ट दिला आहे. पुढील दोन दिवस राज्यभरात कमाल तापमानात वाढ होणार असल्याचे सांगण्यात आले. विदर्भात पुढील दोन दिवसात पारा तापणार असून, तीन जिल्ह्यांना उन्हाचा तडाखा बसणार आहे. (तभा वृत्तसेवा)

#### पुण्यात उकाडा वाढला

पुण्यात आता चांगलाच उकाडा जाणवू लागला आहे . गेल्या दोन दिवसांपासून सरासरीपेक्षा दोन अंश जास्त तापमानाची नोंद झाली. या महिन्याच्या अखेरीस तापमान ४० वर जाण्याची शक्यता आहे. ■

# राष्ट्रपतींच्या कार्यक्रमाला नाकारली परवानगी

### ऐनवेळी बदलले कार्यक्रमाचे स्थळ

### द्रौपदी मुर्मू यांची ममता सरकारवर नाराजी



आदिवासी परिषदेत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा सत्कार करताना मान्यवर

◆ **कोलकाता, ७ मार्च**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू पश्चिम बंगालच्या दौऱ्यावर असून, बिधाननगर भागात त्यांचा नियोजित कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मात्र ऐनवेळी कार्यक्रमाचे स्थळ बदलविण्यात आले. यावर पश्चिम बंगाल सरकार आदिवासींची भले करू इच्छित नसल्याचे नमूद करीत त्यांनी नाराजी व्यक्त केली.

कार्यक्रमाची जागा बदलल्याबद्दल नाराजी व्यक्त करीत राष्ट्रपती म्हणाल्या, जर कार्यक्रम बिधाननगरमध्ये झाला असता, तर ते अधिक चांगले झाले असते. तिथे खूप जागा आहे आणि अनेक लोक येऊ शकले असते. पण राज्य सरकारने तेथील पूर्वनियोजित कार्यक्रमाला परवानगी का दिली नाही, यासंदर्भात मी अनभिज्ञ आहे. मला वाटते की बंगाल सरकारला आदिवासींचे भले नको आहे. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी माझ्या धाकट्या बहिणीसारख्या आहेत. मी देखील बंगालची कन्या आहे, हे त्यांनी विसरू नये. ९व्या आंतरराष्ट्रीय संथाळ परिषदेत सहभागी होण्यासाठी राष्ट्रपती पश्चिम बंगालमध्ये आल्या होत्या. बिधाननगर भागात त्यांचा नियोजित कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

> राष्ट्रपतींना दिलेली वागणूक लज्जास्पद आणि लोकशाही, आदिवासी समुदायाच्या प्रतिष्ठेचा अपमान आहे. पश्चिम बंगालच्या तृणमूल काँग्रेस सरकारने सर्व मर्यादा ओलांडल्या. राष्ट्रपतींचे पद राजकारणाच्या वर आहे आणि या पदाच्या प्रतिष्ठेचा नेहमीच आदर केला पाहिजे.
> **- नरेंद्र मोदी,** पंतप्रधान

मात्र राज्य सरकारने तेथील कार्यक्रमाला परवानगी नाकारली आणि आयोजकांना गोशाईपूर येथील फांसिदेवा मैदानावर कार्यक्रम घेण्याचे निर्देश दिले. कार्यक्रमाला संबोधित करताना मुर्मू म्हणाल्या, कार्यक्रमासाठी फांसिदेवा येथे निश्चित केलेले मैदान खूप लहान आहे, ज्यामुळे अनेक लोक सहभागी होऊ शकले नाही. ऐनवेळी कार्यक्रमाचे स्थळ बदलण्याचा उद्देश काय, याबद्दल मी अनभिज्ञ आहे.

राष्ट्रपतींच्या स्वागतासाठी राज्य सरकारचे प्रतिनिधी म्हणून मुख्यमंत्री, मंत्री उपस्थित राहावे अशी परंपरा आहे. मात्र पश्चिम बंगालच्या दौऱ्यात मुख्यमंत्री किंवा कोणताही राज्यमंत्री राष्ट्रपतींच्या स्वागतासाठी उपस्थित नव्हता. (वृत्तसंस्था)




सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# इराण हल्ल्यांनी जर्जर

## तीन हजार ठिकाणी बॉम्ब, क्षेपणास्त्रांचा वर्षाव

## ऑपरेशन एपिक फ्युरी तीव्र करणार

◆ **वॉशिंग्टन, ७ मार्च**

इराणमध्ये आतापर्यंत ३,००० हून अधिक लक्ष्यांवर हल्ला करण्यात आला आहे. लष्करी मोहीम आणखी तीव्र केली जाईल. इराणी सत्ताधाऱ्यांनी तत्काळ शरणागती पत्करावी अन्यथा त्यांना विध्वंसाला सामोरे जावे लागेल, असा इशारा अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने दिला आहे.

समाज माध्यमावर प्रसिद्ध केलेल्या निवेदनात मोहिमेची तपशीलवार माहिती देताना यूएस सेंट्रल कमांडने म्हटले की, एका आठवड्यात इराणमध्ये ३,००० हून अधिक ठिकाणी हल्ले करण्यात आले. इराणच्या शरणागतीशिवाय हल्ले थांबविण्यात येणार नाहीत. इराणशिवाय लेबनॉनमधील दहशतवादी हिज्बुल्लाहचे अनेक अड्डे उद्ध्वस्त करण्यात आले. इराणमध्ये लोकशाही पद्धतीने निवडलेले सरकार यावे आणि तेथील नागरिकांची अत्याचारातून मुक्तता व्हावी यासाठी ही कारवाई करण्यात आली.

**इस्रायलला शस्त्र पुरवठा वाढवणार**

अमेरिकेने इस्रायलला १५१ दशलक्ष डॉलर्स किमतीचे १२,००० जड बॉम्ब पुरवण्यास मान्यता दिली आहे. प्रादेशिक धोके आणि इराणवरील संभाव्य हल्ल्यांना तोंड देण्यासाठी हे पाऊल उचलल्याचे अमेरिकेचे ट्रेझरी सेक्रेटरी स्कॉट बेसंट यांनी सांगितले. अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याने शुक्रवारी रात्री उशिरा शस्त्र कराराला मंजुरी दिली. इराणच्या लष्करी उत्पादन केंद्रांना उद्ध्वस्त करण्याची योजना आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीवरील इराणचे नियंत्रण हे या अस्थिरतेचे एक प्रमुख कारण आहे. ◀(वृत्तसंस्था)



### इराणमध्ये विध्वंस होणारः ट्रम्प



राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटले की, माघार घेण्यास नकार देणे ही इराणची सर्वात मोठी चूक असेल. आमची जमिनीवरून कारवाई करण्याची तयारी आहे. इराणमध्ये रविवारी आतापर्यंतचा सर्वात घातक हल्ला होईल. अमेरिकेच्या हल्ल्यातून इराणी सत्ताधाऱ्यांना कोणीही वाचवू

## केशव मौर्य यांच्या हेलिकॉप्टरचे ‘इमर्जन्सी लॅण्डिंग’

◆ **लखनौ, ७ मार्च**

उत्तरप्रदेशचे उपमुख्यमंत्री केशव मौर्य यांच्या हेलिकॉप्टरचे लखनौ येथे शनिवारी आपत्कालीन लॅण्डिंग करावे लागले. उड्डाणादरम्यान तांत्रिक बिघाड झाल्यामुळे हेलिकॉप्टर अमौसी विमानतळाकडे वळवण्यात आले.

केशव मौर्य लखनौहून कौशांबीला जात होते. त्यांनी सकाळी मार्टिनियर शाळेच्या मैदानावरून हेलिकॉप्टरने उड्डाण केले. हेलिकॉप्टरने उड्डाण केल्यानंतर ५० किलोमीटर दूर असलेल्या बछरावांपर्यंत पोहोचले होते. २००० फूट उंचीवर हेलिकॉप्टरचा डिस्प्ले अचानक बंद पडला, अशी माहिती सूत्रांनी दिली. ◀(वृत्तसंस्था)

## भाजपा आमदार परमार यांचे निधन

◆ **सुरत, ७ मार्च**

गुजरातमधील सत्ताधारी भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ आमदार गोविंद परमार यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. ते ७२ वर्षांचे होते. आणंद जिल्ह्यातील उमरेठ विधानसभा मतदारसंघाचे ते प्रतिनिधित्व करत होते. प्रकृती अचानक बिघडल्याने त्यांना तातडीने आणंद येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. वैद्यकीय उपचार सुरू असतानाही त्यांच्या प्रकृतीत अपेक्षित सुधारणा झाली नाही आणि अखेर त्यांनी अखेरचा श्वास घेतला. ◀(वृत्तसंस्था)

# ... तर आखाती देशांवरील हल्ले रोखणार

## इराणच्या राष्ट्रपतींची घोषणा, आत्मसमर्पणाची मागणी फेटाळली

◆ **तेहरान, ७ मार्च**

अमेरिका-इस्रायलच्या संयुक्त हल्ल्यामुळे इराणने शेजारी राष्ट्रांवर हल्ले केले. अमेरिकेने इराणवर हल्ले करण्यासाठी आखाती देशांच्या भूमीचा वापर केल्यामुळेच आम्हाला त्यांची लष्करी, हवाई तळांवर ड्रोन, क्षेपणास्त्राचा मारा करावा लागला.



बहरीन, सौदी अरब आणि संयुक्त अरब अमिरातीवर झालेल्या हल्ल्याचा आम्हाला खेद आहे. यापुढे आखाती देशांचा वापर आमच्यावर हल्ले करण्यासाठी होत नाही, तोपर्यंत हल्ले करणे थांबवणार असल्याची घोषणा शनिवारी इराणचे राष्ट्रपती मसूद पेझेश्कियान यांनी केली.

जनतेला केलेल्या संबोधनात पेझेश्कियान म्हणाले, जोवर शेजारील राष्ट्रांच्या भूमीचा वापर आमच्यावरील हल्ल्यासाठी केला जात नाही तोपर्यंत आम्हीही या राष्ट्रांवर हल्ला करणार नाही. इराणच्या अंतरिम नेतृत्वाने याला मंजुरी दिली आहे. अमेरिकेने बिनशर्त आत्मसमर्पणाची मागणी आम्हाला मान्य नाही. बहरीन, सौदी अरब आणि संयुक्त अरब अमिरातीवरील हल्ल्यांचा आम्हाला खेद आणि त्यासाठी मी दिलगिरी व्यक्त करतो. अमेरिकेचे इराणवर ताबा मिळविण्याचे स्वप्न कदापि प्रत्यक्षात येणार नाही. कोणत्याही दबावापुढे न झुकता सर्वोच्च नेते अयातुल्ला खामेनेई यांच्या हत्येचा बदला घेतला जाईल. इस्रायल आणि अमेरिकेचे लष्कर आमचे लक्ष्य आहे. आखाती देशांवरील अलिकडच्या काळात झालेले हल्ले गैरसमजामुळे झाले आहेत आणि भविष्यात अशा घटना रोखण्याचा प्रयत्न केला जाईल.

**पुतिन यांच्यांशी चर्चा**

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी पेझेश्कियान यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला. या संभाषणादरम्यान, पुतिन यांनी या प्रदेशात सुरू असलेला संघर्ष त्वरित थांबवून शांततेसाठी पावले उचलण्याची गरज व्यक्त केली. इराणशी संबंधित वाद राजकीय आणि राजनैतिक मार्गाने सोडवले पाहिजेत. सध्याच्या परिस्थिती पाहता, सर्व पक्षांनी संयम बाळगला पाहिजे आणि संवादाद्वारे तोडगा काढावा. ◀(वृत्तसंस्था)



### अरब लीगच्या परराष्ट्र मंत्र्यांची आज बैठक

अरब लीगच्या परराष्ट्र मंत्र्यांनी रविवारी आपात्कालीन बैठक बोलावली आहे. इराणचे हल्ले आणि प्रादेशिक सुरक्षा परिस्थितीबद्दल यावेळी चर्चा करण्यात येईल. अरब लीगचे सहाय्यक महासचिव हुसम झाकी यांनी सांगितले की, ही बैठक आभासी पद्धतीने होणार आहे. सुरक्षेसाठी उपाययोजना करण्यासंदर्भात यावेळी चर्चा करण्यात येईल. ■

### माफी मागितल्यानंतरही हल्ले सुरूच

इराणी राष्ट्रपतींनी आखाती देशात केलेल्या हल्ल्यावर जाहीर माफी मागितल्यानंतरही शनिवारी कतारची राजधानी दोहाच्या काही भागात ड्रोन, क्षेपणास्त्रांचा मारा करण्यात आला. कतारच्या संरक्षण मंत्रालयानेही इराणच्या हल्ल्याची पुष्टी केली. इराणने तत्काळ हल्ले थांबवावे अन्यथा कठोर प्रत्युत्तर देणार असल्याचा इशारा कतारच्या संरक्षण मंत्र्यांनी दिला आहे. ■



राष्ट्रवादी काँग्रेस(शरद पवार) गटाचे आमदार रोहित पवार यांनी शनिवारी नवी दिल्लीत आम आदमी पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल यांची भेट घेतली. अजित पवार विमान अपघाताचा मुद्दा आपने संसदेत उपस्थित करावा, अशी मागणी रोहित पवार यांनी केली

# सौदी अरेबिया-पाकिस्तानमध्ये चर्चा

## मुनीर-प्रिन्स सलमान यांची रियाधमध्ये भेट

◆ **दुबई, ७ मार्च**

मध्यपूर्वेतील तणाव वाढत असताना पाकिस्तान आणि सौदी अरेबिया यांच्यातील लष्करी सहकार्य पुन्हा चर्चेत आले आहे. सौदी अरेबियाचे संरक्षण मंत्री प्रिन्स खालिद बिन सलमान यांनी पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर यांची रियाध येथे भेट घेतली. इराणकडून होणारे हल्ले रोखण्यासंदर्भात यावेळी चर्चा झाली आहे.

प्रिन्स खालिद बिन सलमान यांनी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, या बैठकीत इराणकडून होणाऱ्या हल्ल्यांमुळे संपूर्ण प्रदेशातील शांतता आणि स्थैर्य धोक्यात येत असल्याची चिंता व्यक्त करण्यात आली. त्यांनी इराणने संयम राखावा आणि परिस्थिती अधिक बिघडेल, असे पाऊल टाळावे, अशी अपेक्षाही व्यक्त केली.तज्ज्ञांच्या मते, इराणी धोक्यांचा सामना करताना सौदी अरेबिया आता एकट्याने लढण्याऐवजी आपल्या सहयोगी देशांची मदत घेण्याच्या तयारीत आहे. पाकिस्तान आणि सौदी अरेबिया यांच्यात असलेल्या संरक्षण सहकार्यामुळे गरज पडल्यास पाकिस्तानला मदतीसाठी पुढे यावे लागू शकते, असेही मानले जात आहे. सौदी अरेबिया पाकिस्तानला आर्थिक सहाय्य, तेलपुरवठा आणि गुंतवणूक यांद्वारे मोठा आधार देत असल्यामुळे या नातेसंबंधाला विशेष महत्त्व आहे. त्यामुळे भविष्यात परिस्थिती अधिक गंभीर झाली तर पाकिस्तान कोणती भूमिका घेणार याकडे जगाचे लक्ष लागले आहे. ◀(वृत्तसंस्था)

### सौदीवर हल्ले सुरूच

दरम्यान, सौदी अरेबियावर होणारे हल्ले थांबलेले नाहीत. शायबा तेल क्षेत्राच्या दिशेने येणारी सोळा मानवरहित विमाने चार वेगवेगळ्या टप्प्यांत रोखण्यात आली. त्यांना हवेतच नष्ट करण्यात आले. तसेच अल-खार्जपरिसरातील सुलतान हवाई तळाच्या दिशेने येणारे एक दीर्घ पल्ल्याचे क्षेपणास्त्र अडवण्यात आले. अल-खर्ज हे रियाधपासून सुमारे ऐंशी किलोमीटर अंतरावर असलेले महत्त्वाचे औद्योगिक केंद्र आहे. ■

# मानवता म्हणून इराणच्या नौकेला आश्रय

## परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांची माहिती

◆ **नवी दिल्ली, ७ मार्च**

इराणच्या नौदलातील नौका आयआरआयएस लावनला मानवतेच्या आधारावर कोच्ची येथे नांगर टाकण्याची परवानगी दिली होती, अशी माहिती परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी दिली. नौकेत तांत्रिक समस्या आल्यानंतर इराणने मदत मागितली होती, त्यानंतर हा निर्णय घेण्यात आला, असे जयशंकर यांनी सांगितले.

इराणच्या नौदलाची एक नौका आयआरआयएस देना आंतरराष्ट्रीय जलहद्दीत बुडाली होती. या कालावधीत आयआरआयएस लावनने तांत्रिक बिघाडाची मागिती देत भारतातील बंदरावर येण्याची परवानगी मागितली. ही विनंती २८ फेब्रुवारीच्या जवळपास करण्यात आली. भारताने १ मार्च रोजी नौकेला कोच्ची बंदरात प्रवेश करण्याची परवानगी दिली. काही दिवसांच्या प्रवासानंतर ही नौका कोच्चीत पोहोचले. नौकेवरील १८३ खलाशी सध्या कोच्चीतील नौदल सुविधेत थांबले आहेत. नौकेवरील कर्मचाऱ्यांपैकी कित्येक तरुण कॅडेट्स आहेत आणि नौकेने मदत मागितली, त्यावेळी भारताने मानवीय दृष्टिकोनातून याकडे पाहिले. नौकेला तांत्रिक अडचण असल्याने मदत देणे योग्य पाऊल होते आणि भारताने नेमके तेच केले, असे एस. जयशंकर यांनी सांगितले.

**फ्लिट रिव्ह्यूत घेतला होता सहभाग**

इराणी नौदलाच्या या नौका भारतात आयोजित आंतरराष्ट्रीय फ्लीट रिव्ह्यू आणि मिलन-२०२६ या युद्धाभ्यासात सहभागी झाल्या होत्या. हा कार्यक्रम १५ ते २५ फेब्रुवारी या कालावधीत झाला होता. त्या वेळी वेगळी परिस्थिती होती. नंतर ती अचानक बदलली आणि या नौका अडचणीत आल्या, असे जयशंकर यांनी सांगितले. ◀(वृत्तसंस्था)

# दोन जीएसटी अधिकारी अडकले एसीबीच्या जाळ्यात

मुंबई : सेवा वस्तू कर अर्थात् जीएसटीच्या नाशिक कार्यालयातील उपायुक्त सोमनाथ पागे आणि सहाय्क कर आयुक्त मच्छिंद्र विठ्ठल दोंदे यांच्यासह तिघांना लाचखोरीच्या प्रकरणात मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अर्थात् एसीबीने अटक केली. संबंधित अधिकाऱ्यांनी एका व्यावसायिकाकडे सव्वा कोटींच्या लाचेची मागणी केली होती.

लाचेचा पहिला हप्ता म्हणून दोन लाख रुपये स्वीकारताना कार्यालयातच त्यांना पकडण्यात आले. या कारवाईने राज्यभरातील जीएसटी विभागात खळबळ उडाली. मुंबई एसीबीचे सहाय्यक पोलिस आयुक्त विजय चव्हाण यांनी सांगितले की, नाशिकच्या कार्यालयात छापा टाकला असता पागे यांच्याकडे दोन लाख रुपयांची रोख आढळून आली. दोन्ही अधिकाऱ्यांना अटक केल्यानंतर त्यांच्या निवासस्थावर छापा टाकण्यात आला. यासंदर्भात नाशिकच्या अंबड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ावर कर भरण्यात अनियमितता आढळल्याच्या प्रकरणात नाशिक शहरातील एका व्यापाऱ्यावर जीएसटी विभागाने कारवाई केली होती. त्यासाठी संबंधित व्यापाऱ्याला नोटीस बजावण्यात आली.

सहाय्क कर आयुक्त दोंदे यांनी व्यापाऱ्याला अटक करण्याची धमकी दिली. कारवाई टाळण्यासाठी तडजोडीचा प्रस्ताव दिला. त्यासाठी खासगी व्यक्ती अमित हिरामण जाधव यांच्या मार्फत सव्वा कोटींची मागणी करण्यात आली.

# ‘एकल हब’ प्रकल्प सामाजिक-आर्थिक परिवर्तन घडविणारा ठरेल

● केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा विश्वास ● पहिल्या प्रकल्पाचे उद्घाटन ● संपूर्ण महाराष्ट्रात ‘सिने चौरंगी’चा विस्तार होणार

◆ **नागपूर, ८ मार्च**

‘सिने चौरंगी’ हा ज्ञान आणि मनोरंजनाचा ‘इंटिग्रेटेड हब’ असून ‘एकल हब’ प्रकल्पाच्या माध्यमातून युवक, महिलांना कौशल्य विकास, प्रशिक्षण व रोजगार मार्गदर्शनाच्या संधी निर्माण होतील. हा प्रकल्प ग्रामीण भागात सामाजिक-आर्थिक परिवर्तन घडविणारा ठरेल, असा विश्वास केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला.

ग्रामीण भागातील सामाजिक-आर्थिक मागासलेपण दूर करून समाजाची आर्थिक प्रगती व्हावी या संवेदनशील विचारातून स्व. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेचे शैक्षणिक उपक्रम अनेक वर्षांपासून सुरू आहेत. मात्र आता आधुनिक मनोरंजन, शिक्षण आणि ज्ञानाचे धडे देखील दिले जाणार आहेत.

**मनोरंजन, शिक्षण आणि ज्ञान**

कै. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेच्या ‘सिने चौरंगी’ अंतर्गत ग्रामीण महाराष्ट्रात आधुनिक मनोरंजन, शिक्षण आणि ज्ञानाचा संगम घडविणाऱ्या ‘एकल हब’ या प्रकल्पाचे उद्घाटन शनिवारी नागपूरच्या वर्धा मार्गावरील खापरी, मिहान परिसरात करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्यासह सिनेअभिनेते, दिग्दर्शक व निर्माति रितेश देशमुख, कै. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेचे अध्यक्ष व सिने चौरंगी प्रकल्पाचे संचालक अतुल शिरोडकर आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पाहुण्यांच्या हस्ते फीत कापून ‘एकल हब’चे उद्घाटन करण्यात आले.

**मनोरंजनासारख्या मूलभूत गोष्टी आवश्यक**

मानकर ट्रस्ट आणि अतुल शिरोडकर यांच्या कार्याचे कौतुक करताना नितीन गडकरी पुढे म्हणाले, माणसाला आनंदी राहण्यासाठी घर, शिक्षण, रोजगार, संस्कारांसोबत मनोरंजनासारख्या मूलभूत गोष्टी आवश्यक ठरतात. ग्रामीण भागातील नागरिकांना सिने चौरंगी प्रकल्पाच्या ‘एकल हब’ द्वारे मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे. अशा प्रकारच्या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील नागरिकांचा ‘हॅपी ह्युमन इंडेक्स’ वृद्धिंगत होईल. ◀(तभा वृत्तसेवा)



### दीड लाख विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट


अतुल शिरोडकर म्हणाले, ३० वर्षांहून अधिक काळ शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या कै. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेने आतापर्यंत विदर्भातील नक्षलग्रस्त भागातील ३० हजार विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली आहे. आदिवासी भागातील ‘ड्रॉप आऊट’ चे प्रमाण शून्यावर आले असून आता ‘एकल हब’ प्रकल्पाच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रातील सुमारे दीड लाख विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. ‘एकल हब’ प्रकल्पाचा विस्तार ग्रामीण भागात केला जाणार असून युवकांना शिक्षण, संस्कृती आणि मनोरंजनाचा लाभ होणार आहे. कार्यक्रमाच्या सुरुवातीला एकल हबची माहिती देणारा माहितीपट प्रदर्शित करण्यात आला. यावेळी मराठी चित्रपट अभिनेते नाट्य-चित्रनिर्माति, दिग्दर्शक अजित भुरे, कै. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेचे पदाधिकारी मिलिंद कानडे, प्रशांत बोपर्डीकर, डॉ. उपेंद्र कोठेकर, मुरलीधर चांदेकर, राजू हडप, अनिल जोशी, निरंजन देशकर, बाळासाहेब अंजनकर, माजी मंत्री राजकुमार बडोले, भूपेंद्र शहाणे आदींची उपस्थिती होती. ■

### ‘एकल हब’ हा प्रकल्प मोलाचा ठरणार

ग्रामीण भागात मनोरंजनाबरोबरच शिक्षण आणि युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात ‘एकल हब’ हा प्रकल्प मोलाचा ठरणार असल्याचे स्पष्ट प्रतिपादन सिनेअभिनेते, दिग्दर्शक व निर्माति रितेश देशमुख यांनी केले. मनोरंजनासोबतच इतर अनेक क्षेत्रात अतुल शिरोडकर यांचे कार्य एखाद्या बुलेट ट्रेनच्या वेगाने सुरू असते. त्यांच्या उल्लेखनीय कार्यापासून इतरांना देखील प्रेरणा मिळते. ग्रामीण भागात सकारात्मक विचार बिंबविण्यात सिने चौरंगी प्रकल्पाच्या ‘एकल हब’चे मोठे योगदान राहणार आहे. ■

## चित्रपट वार्ता

### अयोध्येत अमिताभ यांची आणखी एक मालमत्ता



**मुंबई** : महानायक अमिताभ बच्चन हे मुंबईत वास्तव्यास असले तरी त्यांचे उत्तर प्रदेशविषयीचे प्रेम कायम आहे. त्यांनी अयोध्येत नुकतीच संपत्ती खरेदी केली आहे. त्यांनी ३५ कोटी रुपये मोजून २.६७ एकर जमिनीचा तुकडा विकत घेतला आहे. विशेष म्हणजे अयोध्येतील बच्चन यांची ही तिसरी मालमत्ता आहे. ही जमीन सरयू प्रकल्पाजवळ आहे. अमिताभ यांच्या कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक राजेश यादव यांनी या व्यवहाराची माहिती नुकतीच दिली. अभिनंदन लोढा ग्रुपसोबत अमिताभ यांचा हा चौथा रिअल इस्टेट प्रकल्प आहे. २०२५ मध्ये त्यांनी ४० कोटी रुपयांना तब्बल २५ हजार चौरस फुटांचा तर २०२४ मध्ये १४.५ कोटींना १० हजार चौरस फुटांचा प्लॉट विकत घेतला होता. अयोध्येत श्रद्धा आणि वारसा यांचा संगम आहे. पायाभूत सुविधांच्या विकासामुळे हे शहर गुंतवणुकीसाठी एक आकर्षक ठिकाण म्हणून उदयास आले आहे. ■

### ...अन् म्हणे चुकून ‘लाईक’ झाली

**मुंबई** : बॉलिवूड अभिनेत्री यामी गौतम आणि कृती सेनन यांच्यातील वाद सोशल मीडियावर सध्या चर्चेचा विषय झाला आहे. कृती सेननला सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाल्यानंतर तिच्यावर टीका करणारी रील सोशल मीडियावर व्हायरल झाली होती. या रीलला यामी गौतमने लाईक केले. या पोस्टमध्ये कृतीला मिळालेल्या पुरस्कारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले होते. यानंतर एकच वाद निर्माण झाला. कृतीच्या यशावर यामी जळत असल्याच्या प्रतिक्रिया उमटल्या. वाद शमत नसल्याचे पाहून यामीला अखेर स्पष्टीकरण द्यावे लागले. ‘‘माझा कुणालाही कमी लेखण्याचा हेतू नव्हता. रील काही जाणूनबुजून लाईक केली नव्हती. स्क्रोल करताना कदाचित चुकून लाईक केल्याची शक्यता आहे. तसेच माझ्याकडे इतरांसारखी पीआर टीमही नाही.’’अशी पोस्ट यामीने सोशल मीडियावर केली आहे. ■



### मंदाना करीमी भारत सोडणार



**मुंबई** : अयातुल्लाह अली खामेनेई यांचा बॉम्बस्फोटात मृत्यू झाल्यानंतर इराणी अभिनेत्री मंदाना करीमीने आनंद व्यक्त करणारी पोस्ट केली होती तसेच जल्लोष करणाऱ्या रॅलीत सहभाग घेतला होता. यानंतर तिच्यावर टीकेचा भडीमार झाला. भारतातील मित्रांनी साथ सोडली. जानेवारी महिन्यात इराणमध्ये जनता रस्त्यावर उतरली होती. या जनतेचे मी समर्थन केल्याने अनेक जण माझ्याविरोधात गेले. तसेच काम मिळणे बंद झाले. एवढेच नव्हे तर अनेक जुने कराराही रद्द झाले. त्यामुळे मी आता तेहरानला परतण्याचा निर्णय घेतला आहे. मी माझे सामान पॅक केले आहे. परिस्थिती निवळल्यानंतर परत जाणार आहे, असे मंदाना म्हणाली. मंदानाचा जन्म तेहरानमध्ये झाला. २०१० मध्ये ती भारतात आली आणि २०१३ पासून मुंबईत स्थायिक झाली. मंदानाने २०१७ मध्ये भारतीय व्यावसायिक गौरव गुप्तासोबत लग्न केले, पण २०२१ मध्ये त्यांचा घटस्फोट झाला. मंदानाने तिच्या पतीवर आणि सासरच्या मंडळींवर घरगुती हिंसाचार आणि धर्म परिवर्तनासाठी दबाव टाकल्यासारखे गंभीर आरोप केले होते. ■

### धुरंधर-२ चा ट्रेलर येताच १ तासात ५ हजार तिकिटे विकली

मुंबई : रणवीर सिंगच्या बहुप्रतिक्षित 'धुरंधर: द रिव्हेंज' म्हणजेच 'धुरंधर २' या चित्रपटाचा ट्रेलर शनिवारी प्रदर्शित झाला आहे. ट्रेलरसोबतच चित्रपटाची ॲडव्हान्स बुकिंगही सुरू करण्यात आली आहे. बुकिंग सुरू होताच अवघ्या एका तासात चित्रपटाची ५ हजारांहून अधिक तिकिटे बुक झाली. चित्रपटासाठी चाहत्यांची क्रेझ अशी आहे की, २५०० रुपये किमतीच्या महागड्या तिकिटांनंतरही अनेक थिएटर्समधील शोज हाऊसफुल होण्याच्या मार्गावर आहेत. तिकीट बुकिंग प्लॅटफॉर्म बुक माय शोवर दुपारी १२:०१ वाजताचा ट्रेंडिंग टिकर दर्शवत होता की, गेल्या एका तासात चित्रपटाची ५ हजार तिकिटे विकली गेली आहेत.

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित



dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## स्वामी विवेकानंदांनी जगाला भारतीय संस्कृतीची ओळख करुन दिली

**स्वामी गोविंददेव गिरी महाराज** | **एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठात स्वामी विवेकानंदांच्या पुतळ्याचे अनावरण**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मार्च-**

१८९३ साली स्वामी विवेकानंदांनी शिकागो येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय धर्मपरिषदेत केलेल्या ऐतिहासिक भाषणामुळे संपूर्ण जगाचा भारताकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला. भारत हा ज्ञानाचे भांडार असलेला आणि वैभवसंपन्न देश आहे, याची जाणीव जगाला झाली. याच घटनेतून भारताच्या पुनरुत्थानाची मुहूर्तमेढ रोवली गेली, असे मत श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र अयोध्या ट्रस्टचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी महाराजांनी व्यक्त केले.

एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठांमध्ये स्वामी विवेकानंदांच्या पुतळ्याच्या अनावरण प्रसंगी ते बोलत होते. या सोहळ्याला श्रीक्षेत्र पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीचे सह-अध्यक्ष सद्गुरु ह.भ.प.गहिनीनाथ महाराज औसेकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड होते.

याप्रसंगी माईर्स एमआयटी संस्थेच्या विश्वस्त व महासचिव आणि एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या कार्यकारी अध्यक्षा प्रा.स्वाती कराड चाटे, विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू प्रा.गोपाळकृष्ण जोशी, कुलसचिव प्राणेश मुरनाळ, उषा विश्वनाथ कराड, संचालक स्ट्रॅटजी अँड ऑपरेशन्स राघवेंद्र एम.चाटे, सिद्धेश्वर देवस्थानच पंचकमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी, सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष पुष्पराज काडादी, सोलापूर महानगरपालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे, चार्टर्ड अकाऊंटंट राज मिणियार, सोलापूर आर्किटेक्चर असोसिएशनचे असिम सिंदगी, कायझन होंडाचे संचालक सुरेन्द्र शिरकोळे आदी उपस्थित होते.

देशाच्या माननीय पंतप्रधानांनी आपल्या भाषणात पुढील दहा वर्षात आपण आपल्या देशाच्या गुलामगिरीच्या सर्व खुणा पुसून टाकण्याचा संकल्प करण्याचे आहावन केले. परंतु स्वातंत्र्यानंतर तसे कार्य करण्याची प्रेरणा कोणी दिली असेल तर ती स्वामी विवेकानंदांनी दिली आणि त्या गुलाम गिरीच्या खुणा पुसण्याचे काम ज्या प्रकारे एमआयटीमध्ये प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांच्याकडून होत आहे ते पाहून स्तिमित व्हायला होत, असेही स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांनी सांगितले. श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर म्हणाले, सत्ता, संपत्ती आणि कीर्ती पंचवण्यासाठी अध्यात्माचे बळ लागते आणि ते प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांच्याकडे असल्यामुळे त्यांनी संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम महाराजांच्या वारकरी तत्वज्ञानाचा अंगीकार करत मूल्य शिक्षणाचा वारसा उभा केला. एमआयटी समुहाचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ.विश्वनाथ दा. कराड म्हणाले की, सिध्दरामेश्वरांच्या भूमीत स्वामी विवेकानंद यांचा पुतळा उभारणी हा एक योग अभुतपूर्व आहे. सध्याच्या परिस्थितीत जगाला संताच्या विश्वात्मके देवाच्या प्रार्थनेची गरज आहे. युनेस्कोमध्ये संत ज्ञानेश्वरांची विश्वकल्याणाचे पसायदान प्रार्थना पोहोचवता आल्याचे समाधान असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पंडित भिमण्णा जाधव यांचे सुंद्री वादन झाले. एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. गोपाळकृष्ण जोशी यांनी प्रास्ताविक केले तर कुलसचिव प्राणेश मुरनाळ यांनी आभार मानले.



### स्वामी विवेकानंदांचा पुतळा विद्यार्थ्यांसाठी प्रेरणा देणारा ठरेल : प्रा. स्वाती कराड-चाटे

विषयाचे ज्ञान घेणे जसे आवश्यक आहे तसेच वर्गाच्या बाहेरही विद्यार्थ्यांना देशात होऊन गेलेल्या थोर महापुरुषांची महती समजावी आणि त्यातून त्यांना प्रेरणा मिळावी आणि त्यांचे व्यक्तिमत्व घडावे हे या संस्थेचे नेहमीच ध्येय राहिले आहे. विद्यापीठामध्ये उभारण्यात आलेला हा स्वामी विवेकानंदांचा पुतळा विद्यार्थ्यांसाठी प्रेरणा देणारा ठरेल, असे मनोगत एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या कार्यकारी अध्यक्षा प्रा. स्वाती कराड-चाटे यांनी व्यक्त केले.




## भारताचे भारतीयत्व टिकवण्यासाठी डॉ.स्वर्णलता भिशीकर यांचे जीवनकार्य

**स्वामी गोविंददेव गिरी महाराज** | **स्वर्णस्मृतिदले स्मृतिग्रंथाचे प्रकाशन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ मार्च-**

देशाचे मूळ असलेल्या संस्कृतीपासून भारताला विलग करण्याचे प्रयत्न होत असताना डॉ.स्वर्णलता भिशीकर यांचे जीवनकार्य मात्र भारताचे भारतीयत्व अखंडपणे टिकवण्यासाठी होते, असे प्रतिपादन तीर्थक्षेत्र अयोध्याचे कोषाध्यक्ष, ज्ञानप्रबोधिनीचे अध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांनी केले.

ज्ञानप्रबोधिनीच्या राष्ट्रसमर्पित ज्येष्ठ कार्यकर्त्या डॉ.स्वर्णलता भिशीकर यांच्यावरील आठवणींचा संग्रह असलेल्या स्वर्णस्मृतिदले या स्मृतिग्रंथाचे आणि डॉ.स्वर्णलता भिशीकर यांनी लिहिलेल्या स्वामी रंगनाथानंदजी यांच्या चरित्राचे प्रकाशन समारंभात ते बोलत होते. डॉ.स्वर्णलता भिशीकर यांचे मार्च २०२५ मध्ये निधन झाले. त्यांच्यावर समाजातील १२५ मान्यवरांनी लिहिलेल्या आठवणींचे संकलन या स्मृतीग्रंथात करण्यात आले आहे. व्यासपीठावर ज्ञानप्रबोधिनीचे कार्याध्यक्ष गिरीश बापट, कार्यवाह सुवर्णा गोखले, सहकार्यवाह अमोल गांगजी, हराळी केंद्राचे प्रमुख अभिजीत कापरे उपस्थित होते.

स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज पुढे म्हणाले की, साधना, संतसंगती, स्वाध्याय, आत्मचिंतन हा डॉ. स्वर्णलता भिशीकर यांचा स्थायीभाव होता. त्यांचे जीवन तपस्विनी आणि वीरांगनेचे होते. साधक आणि योध्दा यांचे कार्यक्षेत्र जरी वेगळे असले तरी त्यांची उर्मी सारखीच असते. समाजाकडून मला काहीही नको. मला केवळ समाजाची सेवा करायची आहे, असा भाव असलेल्या स्वामी विवेकानंदांच्या चरित्राचा प्रभाव त्यांच्यावर होता. प्रसिध्दीचा हव्यास सोडून समाज उन्नतीचा ध्यास घेतलेल्या डॉ.स्वर्णलता भिशीकर यांनी आयुष्यभर शिवभावे जीवसेवा केली, असे गौरवोद्गारही स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांनी काढले.

प्रारंभी ध्येयाचा सुगंध ही डॉ. स्वर्णलता भिशीकर यांच्या जीवनावर आधारित नाटिका सादर करण्यात आली. ज्ञानप्रबोधिनीचे सहकार्यवाह अमोल गांगजी यांनी परिचय करून दिला. ज्ञानप्रबोधिनीच्या डॉ.अपर्णा कल्याणकर यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमासाठी सोलापूरकरांनी हुतात्मा मंदिरात गर्दी केली होती.

**समाजकार्य करताना संयमव समर्पण आवश्यक**

समाजासाठी काम करताना अनेक प्रसंगी विविध अडचणींना सामोरे जावे लागते. कधी अशा लोकांकडेही वारंवार जावे लागते, ज्यांच्याकडे जाण्याची इच्छा सुद्धा मनात नसते. परंतु समाजहिताचा विचार मनात ठेऊन हे सर्व सहन करणे आणि कर्तव्य म्हणून ते पार पाडणे, हीच खरी साधना असल्याचे प्रतिपादन स्वामी गोविंददेव गिरी यांनी केले.

## तिजोरीवर आस्थापना खर्चाचा मोठा ताण

**वेतन, निवृत्ती वेतन व व्याजफेडीसाठी ३.३८ लाख कोटी**

**मुंबई, ७ मार्च**

महाराष्ट्राच्या आगामी अर्थसंकल्पात वेतन, निवृत्ती वेतन आणि कर्जावरील व्याजफेड या तीन घटकांवरील वाढत्या खर्चामुळे राज्याच्या महसुली तिजोरीवर मोठा ताण येत असल्याचे स्पष्ट झाले आहे. पुढील आर्थिक वर्षात या तिन्ही बाबींवर मिळून ३ लाख ३८ हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून हा महसुली जमेच्या ५४.९३ टक्के इतका आहे. चालू वर्षाच्या सुधारित अंदाजपत्रकात वेतन, निवृत्ती वेतन आणि व्याजफेडीसाठी २ लाख ७७ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित होता.



मात्र पुढील वर्षात या खर्चात मोठी वाढ होणार असल्याने महसुली खर्चातील त्यांचा वाटा ४६.११ टक्क्यांवरून थेट ५४.९३ टक्क्यांपर्यंत जाणार आहे. सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी पुढील वर्षी १ लाख ७५ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. चालू वर्षाच्या सुधारित अंदाजपत्रकात हा खर्च १ लाख ४८ हजार कोटी रुपये होता. त्यामुळे महसुली जमेतील वेतनाचा वाटा २८.५६ टक्के इतका राहणार आहे. दरम्यान, गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर नियमित नोकरभरती न झाल्याने आस्थापना खर्च काही प्रमाणात नियंत्रणात राहिला होता. २०१९ ते २०२४ या कालावधीत वेतनावरील खर्च महसुली जमेच्या सुमारे ३१ टक्क्यांच्या आसपास होता. खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारने काही ठिकाणी कंत्राटी आणि खासगीकरणाच्या माध्यमातून भरती करण्याचाही मार्ग स्वीकारला होता. मात्र वेतन, निवृत्ती वेतन आणि कर्जावरील व्याजफेड यांचा वाढता खर्च पाहता राज्याच्या विकास कामांसाठी उपलब्ध निधीवर दबाव येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**पुढील वर्षी लागणार ९२ हजार कोटी**

निवृत्ती वेतनावरील खर्चात वाढ होत असल्याचे चित्र आहे. पुढील वर्षी निवृत्ती वेतनासाठी ९२ हजार ३७९ कोटी रुपये खर्च अपेक्षित असून चालू वर्षात हा खर्च ६७ हजार २७९ कोटी रुपये होता. परिणामी महसुली जमेतील निवृत्ती वेतनाचा वाटा ११.१९ टक्क्यांवरून १४.९९ टक्क्यांपर्यंत वाढणार आहे. राज्याच्या वाढत्या कर्जभारामुळे कर्जावरील व्याज फेडीसाठी सुमारे ७० हजार कोटी रुपये खर्च करावे लागणार आहेत. महसुली जमेच्या ११.३७ टक्के रक्कम केवळ व्याजफेडीसाठी खर्च होणार आहे.

## स्त्रीशक्तीच्या स्मृतींनी उजळली प्रिसिजन वाचन अभियानाची संध्याकाळ

**लता मंगेशकर, दुर्गा भागवत, शोभा गुर्टू यांच्या आठवणींनी रसिक भारावले**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ मार्च-**

आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या पूर्वसंध्येला सोलापुरातील प्रिसिजन वाचन अभियानाची संध्याकाळ स्त्रीशक्तीच्या प्रेरणादायी स्मृतींनी उजळून निघाली. संगीत, साहित्य आणि संस्कृतीच्या विश्वात अमिट ठसा उमटवणाऱ्या लता मंगेशकर, दुर्गा भागवत आणि शोभा गुर्टू यांच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेत प्रख्यात लेखक-पत्रकार अंबरीश मिश्र यांनी रसिकांना एका वेगळ्याच भावविश्वात नेले.

प्रिसिजन फाउंडेशन आयोजित प्रिसिजन वाचन अभियानांतर्गत शनिवारी (७ मार्च) सायंकाळी येथील डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे हा साहित्यसंवाद रंगला. अंबरीश मिश्र यांच्या निवडक लेखांचे अभिवाचन आणि त्यांच्याशी संवाद असा कार्यक्रम झाला. अभिवाचनात प्रसाद फणसे सहभागी झाले



कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच प्रसाद फणसे यांनी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांच्या आवाजात सोलापूरकरांसाठी संदेश सादर करत वातावरणात वेगळीच रंगत आणली. त्यानंतर अंबरीश मिश्र यांनी ज्येष्ठ अभिनेते अशोक कुमार यांच्याशी संबंधित आठवणी सांगत कार्यक्रमाची सुरुवात केली. कंगन, बंधन आणि झुला या चित्रपटांच्या यशामागील कथा तसेच एस.मुखर्जी आणि अशोक कुमार यांनी एकाच वेळी बॉम्बे टॉकीज आणि फिल्मिस्तान या दोन कंपन्या कशा उभारल्या, याचा रोचक मागोवा त्यांनी घेतला. 'सुंदर ती दुसरी दुनिया' या पुस्तकातील 'अशोक कुमार' या लेखाचे अभिवाचन केले.

आएगा आनेवाला हे गीत त्यांनी गुणगुणताच सभागृह टाळ्यांच्या गजरात दुमदुमले. 'झाडं, फुलं नि पाऊस' या लेखातून त्यांनी कोविड काळातील अनुभव मांडले. जीवनातील निसर्ग, एकांत आणि संवेदना यांचा स्पर्श या लेखातून प्रकट झाला. या लेखाचे प्रभावी अभिवाचन प्रसाद फणसे यांनी केले.

माधव देशपांडे यांनी प्रस्ताविक केले. प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांनी मान्यवरांचे स्वागत केले. साहित्य, संगीत आणि आठवणींच्या संगमाने रंगलेली ही संध्याकाळ सोलापूरच्या रसिकांसाठी संस्मरणीय ठरली.

**लता दीदींनी देशाला सांस्कृतिक बंधनात बांधले**

बडे गुलाम अली खान, मुकेश, मदन मोहन, मोहम्मद रफी, तलत मेहमूद यांसारख्या दिग्गजांनी लतादीदींच्या स्वरांविषयी व्यक्त केलेले गौरवोद्गार त्यांनी सांगितले. स्वातंत्र्यानंतरच्या अस्थिर काळात देशाला सांस्कृतिक बंधनात बांधण्याचे काम लता मंगेशकर यांच्या स्वरांनी केले, असे मत मिश्र यांनी व्यक्त केले. त्यांच्या विनोदबुद्धीचे आणि शिस्तप्रियतेचे अनेक किस्सेही त्यांनी सांगितले.

**-दुर्गाबाई निर्भीड होत्या**

दुर्गा भागवत यांच्या आठवणी सांगताना मिश्र म्हणाले, १९७८ साली त्यांची भेट झाली तेव्हा त्यांच्या साधेपणाने मी भारावून गेलो होतो. २०वे शतक हे स्त्रियांचे शतक आहे. पुरुष अधिकार गाजवतात; स्त्रिया लोकशाही जगवतात. आणीबाणीच्या काळात दुर्गा भागवत यांनी केलेल्या निर्भीड भूमिकेची आठवण त्यांनी जागवली. पु.ल. देशपांडे यांच्या काही आठवणी सांगत सभागृहात हास्याची लकेर उमटवली.

**-शोभा गुर्टूंमुळे महाराष्ट्राला ठुमरी कळाली**

शोभा गुर्टू यांच्या संदर्भात बोलताना त्यांनी सांगितले, जसे साडीला फॉल लागतो, तसे कलाकारांना रसिक लागतात. उत्तर भारतीय ठुमरी आणि दादरा या गायकीचा सुगंध महाराष्ट्रात आणण्याचे श्रेय शोभा गुर्टूंना जाते, असेही त्यांनी नमूद केले. यानंतर प्रसाद फणसे आणि अंबरिश मिश्र यांनी काही शेर सादर करत प्रेक्षकांची मने जिंकली.

## चित्राज् सिटी साईड रिसॉर्ट 'प्राइड ऑफ सोलापूर' म्हणून नावारुपास येईल : रंजना जवळकर

**३ ते ५ लोकांची व्यवस्था, मोठे लॉन, प्रशस्त पार्किंग**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ मार्च-**

सोलापूर हॉटेल चित्रा एक्झिक्यूटिव्हच्या यशस्वीतेनंतर खास सोलापूरकरांच्या सेवेत आलेल्या कोंडी-अकोलेकाटी रोड येथील चित्राज् सिटी साईड रिसॉर्ट हे प्राइड ऑफ सोलापूर म्हणून नावाला नावारुपास येईल, असा विश्वास रंजना जवळकर यांनी व्यक्त केला.

उत्तर सोलापूर तालुक्यातील अकोलेकाटी गावात अकोलेकाटी-कोंडी रोडवर भव्य स्वरुपात उभारलेला चित्राज् सिटी साईड रिसॉर्टच्या उद्घाटन समारंभात त्या बोलत होत्या. यावेळी संचालक धीरज जवळकर, चित्ररेखा जवळकर, सीईओ कुणाल जवळकर उपस्थित होते.सोलापूर शहरातील हॉटेल चित्रा एक्झिक्युटिव्ह हे गेल्या पाच वर्षापासून कार्यरत आहे. जवळकर परिवार ग्राहकांच्या समाधानाला आणि सेवेला प्राधान्य दिले आहे. तसेच सोलापूर जिल्ह्यात पर्यटन विकासाला चालना देणे, पर्यटकांना दर्जेदार सेवा प्रदान करणे हे आमचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.



संचालक सीए धीरज जवळकर यांनी सांगितले की, निसर्गाच्या सानिध्यात असून, शांत, सुरक्षित आणि अल्हाददायक वातावरण चा अनुभव सोलापूरकरांना देण्यासाठी चित्राजब सिटी साईड रिसॉर्ट ची निर्मिती केली आहे. लोकांना सोयीचे व्हावे म्हणून सोलापूर शहरापासून केवळ १५ किलोमीटर अंतरावर याची उभारणी करण्यात आली आहे. या रिसॉर्टमध्ये प्रशस्त आधुनिक पध्दतीच्या ८० रुम्स, ७ हजार स्क्वेअर फुटचे बँक्वेट हॉल, ४० हजार स्केअर फुटचे सर्वात मोठे लॉन, सोबत १२ हजार स्केअर फुटचे छोटे लॉन, वॉटर पार्क, एडवेंचर पार्क, व्ही.आर. गेम्स, आर्केड गेम्स, इनडोअर आणि आउटडोअर गेम्स, रेन डान्स असे सुविधा उपलब्ध आहेत. प्री-वेडिंग शूट, एंगेजमेंट, डेस्टिनेशन वेडिंग, कार्पोरेट प्रोग्रॅम्स, फॅमिली ट्रिप्ससह लग्न समारंभासाठी तीन ते पाच हजार लोकांची व्यवस्था असलेले मोठे लॉन उपलब्ध करून दिला असल्याचे त्यांनी सांगितले.

या अत्याधुनिक पद्धतीने सुरु झालेल्या या प्रकल्पाचे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी चित्रात सिटी साईड रिसॉर्टचे मॅनेजर स्टाफ आणि जवळकर मित्रपरिवार यांनी प्रयत्न केले.

## देशात तेलाचा मुबलक साठा; अफवांवर विश्वास ठेवू नका

**नवी दिल्ली, ७ मार्च**

भारत केवळ आयातीवरील कच्च्या तेलावर अवलंबून नाही, तर देशांतर्गत उत्पादनांचा पुरेसा साठा आहे. देशात डिझेल, पेट्रोल, ज्वलनशील वायूंचा पुरवठा साठा उपलब्ध आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये असे आवाहन करणारे निवेदन केंद्र सरकारने जारी केले आहे. आखाती देशांतील संघर्षाच्या पृष्ठभूमीवर इंधनाची टंचाई निर्माण झाल्याच्या पोस्ट समाज माध्यमांवरून प्रसारित होत आहे, पर्यायाने अनेक शहरांमधील पेट्रोल पंपांवर गर्दी वाढली.

यावर पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, भारतात सध्या २५० दशलक्ष बॅरल (अंदाजे ४,००० कोटी लिटर) कच्च्या तेलाचा आणि रिफाइंड पेट्रोलियम उत्पादनांचा साठा आहे. २५ दिवसांची गरज भागेल इतका साठा सध्या उपलब्ध आहे. भारत इतर जागतिक पुरवठादारांकडून तेलाची खरेदी वाढवत आहे. मंगळूर, पादूर आणि विशाखापट्टणम येथे विशेष भूमिगत साठवण सुविधा बांधण्यात आल्या. हजारो किलोमीटरच्या पाइपलाइनद्वारे भारतात नेहमीच तेल उपलब्ध असते. याशिवाय शेकडो मोठे तेल टँकर भारतीय बंदरांवर येत असल्याने चिंतेचे कारण नाही.

**होर्मुझ जलमार्ग भारतासाठी खुला**

चीनच्या पाठोपाठ, भारतीय मालवाहू जहाजांनीही होर्मुझच्या सामुद्रधुनीतून प्रवास करण्यास सुरुवात केली आहे. पुष्पक आणि आता परिमल ही दोन भारतीय मालवाहू जहाजे या व्यापार मार्गावरून प्रवास करत आहेत. इराणचे परराष्ट्र मंत्री सय्यद अब्बास अराघची यांनी भारतीय परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांच्याशी चर्चा केली, त्यानंतर हा मार्ग भारतीय जहाजांसाठी खुला करण्यात आल्याचे सरकारने निवेदनात म्हटले आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## रोखठोक

**दिनेश गुणे**

# थंडावले विलीनीकरणाचे वारे...

संसदेच्या राज्यसभेतील शरद पवार यांची उपस्थिती आणि कामगिरी या बाबी गेल्या काही वर्षांत चर्चेचा विषय ठरल्या आहेत. महाराष्ट्राच्या राजकारणात दीर्घकाळ प्रभावशाली राहिलेल्या नेत्याकडून संसदीय कामकाजातही महत्त्वाची भूमिका अपेक्षित असते. परंतु गेल्या काही वर्षांच्या संसदीय आकडेवारीकडे पाहिले, तर राज्यसभेतील त्यांची भूमिका प्रत्यक्ष कामगिरीची आहे की केवळ प्रतीकात्मक उपस्थितीची होती, यावरच चर्चा होताना दिसते. शरद पवार यांनी आता सक्रिय राजकारणातून निवृत्ती घ्यावी आणि मार्गदर्शकाची भूमिका स्वीकारून नव्या कार्यकर्त्यांना संधी द्यावी, अशी भूमिका मांडत अजित पवार यांनी शरद पवार यांच्या राजकारणातील सक्रियतेवर जाहीर नाराजी व्यक्त केली होती. याच कारणामुळे ते पक्षातून बाहेर पडले होते. त्यामुळेच आता राज्यसभेच्या नव्या निवडणुकीत सहा वर्षांकरिता शरद पवार यांची बिनविरोध निवड झाल्याने, त्यांच्या संसदीय कामगिरीचा आणि राजकारणाचा आढावा घेतला जाणे साहजिकही आहे.

भारतीय राजकारणात २०१४ नंतरच्या कालखंडात, विशेषतः मोदी सरकार सत्तेवर आल्यापासून मोठे बदल झाले. केंद्रात भारतीय जनता पार्टीचे वर्चस्व वाढले आणि इंडिया आघाडीच्या झेंड्याखाली एकत्र येऊनही विरोधी पक्षांची ताकद तुलनेने कमी झाली. अशा परिस्थितीत विरोधी बाकांवरील अनुभवी नेत्यांकडून संसदीय चर्चांमध्ये अधिक आक्रमक आणि प्रभावी हस्तक्षेप अपेक्षित असतो. विशेषतः चार दशकांहून अधिक काळ सत्तेच्या केंद्रस्थानी राहिलेल्या शरद पवार यांच्याकडून अशी अपेक्षा असणे स्वाभाविक आहे. शरद पवार यांनी संसदीय राजकारणात प्रवेश केला, त्यास आता जवळपास सहा दशके उलटली आहेत. उपलब्ध संसदीय आकडेवारीनुसार गेल्या काही वर्षांत पवार यांची राज्यसभेतील उपस्थिती साधारण ७० ते ७५ टक्क्यांच्या आसपास राहिली आहे. राज्यसभेतील सरासरी उपस्थितीच्या तुलनेत ही उपस्थिती विशेष उल्लेखनीयही नसली, तरी त्यांच्या वयाचा विचार करता ही उपस्थिती समाधानकारक म्हणता येईल. कारण उपस्थिती हा संसदीय कामकाजातील सहभागाचा एकमेव मापदंड नसतो. सभागृहातील चर्चांमधील सहभागाच्या बाबतीत शरद पवार यांची कामगिरी अत्यंत मर्यादित दिसते. कृषी, सहकार, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि संघराज्यीय प्रश्न यांसारख्या विषयांवर त्यांनी काही चर्चांमध्ये आपली मते मांडली. कृषी क्षेत्रातील त्यांचा दीर्घ अनुभव लक्षात घेता या विषयावरील त्यांची मते अनेकदा गांभीर्याने ऐकली गेली. मात्र, संसदेतील नियमित आणि सातत्यपूर्ण सहभागाच्या निकषावर पाहिले तर त्यांची सक्रियता फार मोठी नाही. सभागृहातील प्रश्नोत्तराचा तास हा सरकारला जनहिताच्या मुद्द्यांवर भूमिका घेण्यास भाग पाडण्याचे विरोधकांचे महत्त्वाचे संसदीय आयुध असते, असे मानले जाते. प्रश्न विचारणे हा सरकारला जबाबदार धरण्याचा एक प्रभावी मार्ग मानला जातो. अनेक खासदार आपल्या राज्याशी संबंधित प्रश्न या माध्यमातून मांडतात. या निकषावरही पवार यांची भूमिका अत्यंत मर्यादित असल्याचे दिसते. खाजगी विधेयकांच्या बाबतीतही शरद पवार फारसे सक्रिय दिसले नाहीत. संसदेतील खाजगी विधेयके मंजूर होण्याची शक्यता मुळातच अत्यल्प असली, तरी अनेक खासदार धोरणात्मक मुद्दे पुढे आणण्यासाठी त्यांचा वापर करतात. पवार यांनी मात्र या साधनाचा फारसा उपयोग केलेला नाही.

भाजपाला समर्थ राजकीय पर्याय देण्यासाठी महत्प्रयासाने एकत्र आलेल्या इंडिया आघाडीच्या राजकीय कसोटीच्या काळातही, शरद पवार यांची राजकीय शैली नेहमीच थेट संघर्षापेक्षा संवाद आणि तडजोडीवर आधारित राहिली आहे. राहुल गांधी यांच्यासारखे काँग्रेसचे नेते रालोआ सरकारवर तुटून पडण्याची रणनीती आखत असताना शरद पवार यांनी मात्र मर्यादित भूमिका घेतली. त्यामुळे संसदेत आक्रमक राजकीय नेतृत्व करण्याऐवजी निवडक मुद्द्यांवरच बोलणाऱ्या शरद पवार यांच्या इंडिया आघाडीतील सहभागावरही संशयाची वलये वारंवार उमटली. पवार यांची ही शैली म्हणजे त्यांच्या अनाकलनीय राजकारणाची, संधिसाधूपणाची आणि सत्तेच्या सहवासात राहण्याच्या तडजोडीच्या राजकारणाची खूण आहे, असे काहींना वाटत असले, तरी संसदीय सक्रियतेच्या निकषांवर मात्र ही शैली अपुरी ठरली आहे. शरद पवार यांच्या राजकीय कारकीर्दीचा सध्याचा टप्पाही लक्षात घ्यावा लागतो. दीर्घकाळ सक्रिय राजकारण केल्यानंतर ते आता ज्येष्ठ नेत्यांच्या भूमिकेत आहेत. त्यामुळे रोजच्या संसदीय संघर्षात आघाडीवर दिसण्याऐवजी राजकारणात सक्रियही असावे आणि सल्लागार आणि मार्गदर्शक म्हणूनही काम करावे, ही स्वयंघोषित भूमिका त्यांनी स्वीकारल्याचे दिसते. ही भूमिका काही प्रमाणात स्वाभाविक असली, तरी लोकप्रतिनिधी म्हणून सक्रिय संसदीय सहभागाची अपेक्षा मात्र कायम राहते. म्हणूनच राज्यसभेतील शरद पवार यांची अलिकडच्या काळातील उपस्थिती ही प्रभावी कामगिरीची आहे की केवळ प्रतीकात्मक अस्तित्वाची आहे, यावर चर्चा होत असते. याचे उत्तर कदाचित या दोन्हीच्या मध्यावर आहे. अनुभवी नेतृत्वाची सावली संसदेवर असणे महत्त्वाचे असते; परंतु त्या सावलीला अधिक सक्रिय रूप मिळाले, तर संसदीय लोकशाही अधिक समृद्ध होऊ शकते.

भारतीय राजकारणात दीर्घ अनुभव, सत्तेतील आणि विरोधातील अशा दोन्ही भूमिकांचा मोठा इतिहास आणि राजकीय समीकरणे ओळखण्याची क्षमता यामुळे शरद पवार हे नाव नेहमीच चर्चेत राहिले. विशेषतः केंद्रातील भाजपाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या विरोधात उभ्या



राहिलेल्या, इंडिया आघाडी या विरोधी पक्षांच्या आघाडीत त्यांची भूमिका काय होती, हा प्रश्न गेल्या काही वर्षांत वारंवार चर्चेत आला. संसदेत सरकारला कोंडीत पकडण्याच्या अनेक प्रसंगांमध्ये पवार यांची भूमिका आक्रमक राजकीय नेतृत्वापेक्षा अनुभवी रणनीतीकाराची अधिक दिसून आली. इंडिया आघाडीची कल्पना प्रत्यक्षात येण्याआधीच विरोधी पक्षांमध्ये संवाद वाढविण्याचे प्रयत्न सुरू झाले होते. प्रादेशिक पक्षांचे महत्त्व वाढलेल्या भारतीय राजकारणात विविध विचारसरणींच्या पक्षांना एकत्र आणणे हे अत्यंत अवघड काम असते. या पृष्ठभूमीवर पवार यांचा अनुभव उपयोगी पडू शकतो, अशी अपेक्षा अनेक पक्षांना होती. विविध पक्षांच्या नेत्यांशी त्यांचे दीर्घकालीन संबंध असल्यामुळे ते अनेकदा संवादाचा दुवा म्हणून पुढे आले. तथापि, संसदेत सरकारला थेट कोंडीत पकडण्याच्या बाबतीत त्यांची भूमिका मर्यादित दिसली. कृषी कायद्यांवरून देशभरात मोठे आंदोलन उभे राहिले तेव्हा विरोधी पक्षांनी सरकारवर तीव्र हल्ला चढवला. त्यावेळी पवार यांनी या विषयावर आपली भूमिका मांडली, परंतु त्यांनी आंदोलनाला पूर्णपणे राजकीय आक्रमकतेचे रूप देण्याऐवजी संवादाची भूमिका मांडली. कृषी क्षेत्रातील त्यांचा अनुभव मोठा असला, तरी ते मवाळ भाषेत बोलताना दिसले. आर्थिक आणि कॉर्पोरेट व्यवहारांशी संबंधित काही वादग्रस्त मुद्द्यांवर विरोधी पक्षांनी केंद्र सरकारवर जोरदार हल्ला चढवला. या काळात एका उद्योग समूहावरील आरोपांवरून संसदेत मोठा राजकीय संघर्ष निर्माण झाला. अनेक विरोधी पक्षांनी संयुक्त संसदीय समितीची मागणी करीत सरकारवर दबाव वाढविण्याचा प्रयत्न केला. पवार यांची या मुद्द्यावरील काहीशी मवाळ भूमिका आणि नंतरही त्यांनी याच उद्योग समूहाविषयी दाखविलेली जवळीक यामुळे त्यांच्याविषयी इंडिया आघाडीत काहीसे शंकेचे वातावरण राहिले, त्यांच्या काही वक्तव्यांमुळे विरोधकांच्या एकसंध रणनीतीला धक्का बसल्याची आणि पवार यांचे राजकारण सत्तारूढ भाजपाला अनुकूल असल्याची टीकाही झाली. शरद पवार हे क्वचितच अतिशय टोकाची भूमिका घेतात. अनेकदा ते पडद्यामागे राहून संवाद साधण्यावर विश्वास ठेवतात, संसदेतल्या तीव्र राजकीय संघर्षाच्या काळातही ते समन्वय साधण्याचा प्रयत्न करतात, असेही बोलले जाते. ही शैली अनुभवी नेतृत्वाचे लक्षण असले, तरी काहींच्या मते ती आक्रमक विरोधी राजकारणासाठी अपुरी ठरते व विरोधकांच्या बाकावरील सत्ताधाऱ्यांचा छुपा संकटमोचक म्हणूनही त्याकडे पाहिले जाते. विरोधी पक्षांच्या आघाडीमध्ये अनेकदा विचारसरणीचे आणि प्रादेशिक हितसंबंधांचे संघर्ष असतात, हे राजकीय वास्तव आहे. अशा परिस्थितीत एखाद्या नेत्याने सर्वांना एकत्र ठेवणे ही मोठी जबाबदारी असते. पवार यांनी अनेक प्रसंगांमध्ये ही भूमिका निभावण्याचा प्रयत्न केला. मात्र संसदेत सरकारला थेट आणि सातत्याने अडचणीत आणणारे नेतृत्व त्यांनी घेतल्याचे फारसे दिसत नाही.

यामागे आणखी एक कारण म्हणजे त्यांच्या राजकीय कारकीर्दीची सध्याची अवस्था. दीर्घ राजकीय प्रवासानंतर ते आज ज्येष्ठ नेत्याच्या भूमिकेत आहेत. शिवाय, अजित पवार यांनी स्वतंत्र गट स्थापन करून सत्ताधारी रालोआसोबत जाण्याचा निर्णय घेतल्याने शरद पवार काहीसे एकाकी पडलेले दिसत आहेत. कदाचित त्यामुळे रोजच्या संसदीय संघर्षात आघाडीवर दिसण्याऐवजी सल्लागार आणि मार्गदर्शक म्हणून काम करण्याचा मवाळ मार्ग त्यांनी स्वीकारला असावा. अनेक तरुण किंवा मध्यमवयीन नेते आक्रमक विरोधी राजकारणाचे नेतृत्व करीत असताना पवार यांची भूमिका अधिक शांत आणि संयमी राहते. म्हणूनच शरद पवार यांचे पुढील सहा वर्षांसाठी राज्यसभेत असणे विरोधकांच्या आघाडीसाठी खरोखरीच किती फायद्याचे, याची चर्चा आता सुरू होणार आहे. मुळात शरद पवार यांच्या नावावर विरोधकांच्या महाविकास आघाडीचे एकमेव विजयाची खात्री असलेले उमेदवार म्हणून शिक्कामोर्तब होण्याआधीचे महाविकास आघाडीतील राजकारण पाहता, पवार हे या आघाडीचे नाईलाजाचे एकमत असावे, असेच दिसते. काँग्रेसकडे अन्य नेत्याचे नाव नाही, शिवसेनेमध्ये उमेदवारीबाबत मतभेद होते. राज्यसभेसाठी प्रियांका चतुर्वेदी किंवा शरद पवार यांच्यामधून एक पर्याय निवडायचा असताना संजय राऊत यांनी पवार यांना झुकते माप देण्यासाठी प्रतिष्ठा पणाला लावली होती. त्यामागे त्यांच्या दीर्घकालीन राजकारणाची काही गणिते दडलेली आहेत, हे स्पष्ट आहे. आणखी काही महिन्यांत उद्धव ठाकरे यांची विधान परिषद सदस्यत्वाची मुदत संपेल, तेव्हा त्यांचा या सभागृहातील फेरप्रवेशाचा मार्ग निर्धोक करावयाचा असेल तर आता शरद पवार यांच्या उमेदवारीस पाठिंबा देण्याखेरीज पर्याय नाही, हे ठाकरे यांच्या गळी उतरविण्यात संजय राऊत यशस्वी झाल्यावर काँग्रेसलाही नाईलाजाने पवार यांच्या उमेदवारीस पाठिंबा द्यावा लागला आहे. आता राज्यसभेत पवार कुटुंबातील दोन सदस्य, लोकसभेत एक सदस्य आणि महाराष्ट्राच्या विधिमंडळात दोन सदस्य असल्याने महाराष्ट्राच्या सत्ताधारी आणि विरोधी राजकारणावर पवार कुटुंबाची पुरती छाया दाटलेली दिसते. शरद पवार यांच्या प्रसंगी तडजोडीच्या आणि सध्याच्या मवाळ राजकारणाचाच हा परिणाम म्हणावा लागेल.

एकंदरीत पाहता, शरद पवार यांनी इंडिया आघाडीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली असली, तरी ती मुख्यतः समन्वय आणि रणनीतीची राहिली आहे. सरकारला संसदेच्या पटलावर थेट कोंडीत पकडण्याच्या मोहिमेत ते अग्रभागी दिसले नाहीत. परंतु विविध पक्षांना एकत्र ठेवण्याचा आणि दीर्घकालीन राजकीय गणिताचा विचार मांडण्याचा प्रयत्न त्यांनी केला. आजच्या तीव्र ध्रुवीकरणाच्या राजकारणात आक्रमकता आणि संवाद या दोन्ही गोष्टींची गरज असते. पवार यांची शैली दुसऱ्या प्रकारात मोडते. त्यामुळे प्रश्न असा उरतो की, विरोधी राजकारणाला केवळ आक्रमक नेतृत्वाची गरज आहे की अनुभव आणि समन्वयाचीही गरज आहे, या प्रश्नाचे उत्तर शोधताना पवार यांच्या सध्याच्या मवाळ भूमिकेकडे पाहणे महत्त्वाचे ठरते. राज्यसभेचा उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर शरद पवार यांनी शुक्रवारी महाराष्ट्राच्या जनतेचे आभार मानणारे पत्रक समाजमाध्यमातून जारी केले. लोकप्रतिनिधी म्हणून १९६७ पासून सुरू झालेला हा प्रवास आजही, पवार यांनी या वयातही सुरू ठेवला आहे. या प्रवासाचे श्रेय ते स्वतःकडे न घेता महाराष्ट्राच्या जनतेस देतात. महाराष्ट्राच्या जनतेने दाखविलेल्या विश्वासामुळे आणि पाठिंब्यामुळेच हा प्रवास अखंडपणे सुरू आहे, असे ते नमूद करतात. पुढील सहा वर्षांकरिता राज्यसभेत पाठवून जनतेने आपल्याला महाराष्ट्राची सेवा करण्याची संधी दिली आहे. दीर्घकाळ, किंबहुना आयुष्यभर अशा सेवेची संधी राजकारणात क्वचितच कोणास मिळत असते. आता पुढील सहा वर्षांचा राज्यसभा सदस्यत्वाचा कार्यकाळ मोजता, पवार यांची संसदीय राजकारणाची सहा दशके पूर्ण होतील. पवार यांना महाराष्ट्राने त्यापुढेही सेवेची संधी दिली, तर संसदीय राजकारणातील अमृत महोत्सव साजरा करणारा नेता अशी विक्रमी नोंदही त्यांच्या नावे केली जाईल. पवार यांनी राजकारणातून निवृत्त व्हावे आणि मार्गदर्शकाची भूमिका वठवून नव्या नेतृत्वास संधी द्यावी, अशी जाहीर अपेक्षा अजित पवार यांनी व्यक्त केली होती. मात्र, विलीनीकरणाची चर्चा सुरू झाल्यानंतर अजित पवार यांच्या पश्चात त्यांच्या नव्या अपेक्षांचे अनेक गौप्यस्फोट सुरू झाले. शरद पवार यांनी राज्यसभेत जावे अशी अजित पवार यांचीच इच्छा होती, असा दावा आमदार रोहित पवार यांनी केला. आता शरद पवार यांचा राज्यसभा प्रवेश निर्धोक झाल्यानंतर विलीनीकरणाच्या चर्चेचे वारे थंडावले आहेत. पवार यांना राज्यसभेत पाठविण्याचा पर्याय स्वीकारून महाविकास आघाडीने आपले वर्तमान आणि भविष्य सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. शरद पवार राज्यसभेत दाखल झाल्याने सत्ताधारी रालोआची राजकीय गणितेदेखील मनासारखी जुळून आली आहेत. काँग्रेस आणि उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या हाती काय पडले, याची चर्चा कालांतराने सुरू होईल, तेव्हा त्याची उत्तरेदेखील स्पष्ट झालेली असतील.

dineshgune@gmail.com

## प्रासंगिक

**अन्नपूर्णा देवी**

# सेवा-शुश्रूषाविषयक अर्थव्यवस्था; महिला नेतृत्व विकासाचा पाया



भारताच्या जडणघडणीला महिलांच्या कर्तृत्वानं आकार दिला आहे. आज भारतीय महिलांनी देशाच्या परिवर्तनात आघाडी घेतली आहे. शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित, संरक्षण आणि प्रशासनासह सर्व क्षेत्रांत त्या प्रगती करीत आहेत. लढाऊ वैमानिकांपासून ते तळागाळातील नेतृत्वापर्यंत सर्वसमावेशक आणि शाश्वत राष्ट्रीय प्रगतीच्या त्या कारक घटक बनल्या आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली, भारताने महिलांकडे केवळ लाभार्थी म्हणून पाहण्याचा पारंपरिक दृष्टिकोन सोडून दिला असून त्यांना विकास प्रक्रियेचे नेतृत्व करणाऱ्या आणि विकासाच्या कारक घटक म्हणून ओळख दिली आहे.

लोकांच्या नजरेत भरणाऱ्या प्रत्येक कामगिरीच्या पाठीशी एक मूक शक्ती असतेच; ती म्हणजे सेवा-शुश्रूषाविषयक अर्थव्यवस्था. कामाच्या ठिकाणी पाऊल ठेवण्याआधी, आपल्या कुटुंबाच्या पालन पोषणाच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी पहाट होण्याआधीच उठणारी आई ही स्त्रीच. प्रतिकूल परिस्थितीतही कुटुंबाची मोट बांधून ठेवणारी पत्नी म्हणजे स्त्रीच असते. वृद्ध पालकांची सेवा आणि आपल्या कामांमध्ये समतोल साधणारी कन्या ही देखील स्त्रीच. खरे तर या कष्टांना जमेस धरले जातच नाही. तरीही अगदी शांतपणे आपली घरे, आपले समुदाय आणि आपल्या देशाची काळजी महिलांद्वारे वाहिली जाते. या सगळ्याची दखल घेऊन केंद्र सरकार सर्वसमावेशक प्रगतीचा पाया म्हणून सेवा-शुश्रूषाविषयक कामांचे मोल जपण्यासाठी, त्यांना पाठबळ देण्यासाठी आणि त्यांच्या सक्षमीकरणासाठी कटिबद्ध आहे.

भारताचा मनुष्यबळातील महिला श्रमशक्तीच्या सहभाग दर २०१७-१८ मधील २३.३ टक्के तुलनेत वाढला असून २०२३-२४ मध्ये तो ४१.७ टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. यातून महिलांच्या विस्तारत असलेल्या आर्थिक क्षमतेची प्रचीती येते. आर्थिक पाहणीत अधोरेखित केल्याप्रमाणे, मनुष्यबळातील महिलांचा मोठा सहभाग आणि मजबूत स्थितीतील सेवा-शुश्रूषाविषयक सेवांमुळे महिलांसाठी संधींची लाखो दारे खुली होऊ शकतील.

केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ मध्ये देखभाल व्यवस्था मजबूत करण्यासाठी ऐतिहासिक गुंतवणूक करण्यात आली आहे. महिलांसाठीच्या तरतुदीने पहिल्यांदाच ५ लाख कोटी रुपयांचा टप्पा पार केला आहे. यातून महिला केंद्रित विकासाची सरकारची दृढ वचनबद्धता दिसून येते. १.५ लाख आशा सेविकांचे प्रशिक्षण, महिला वसतिगृहांचा विस्तार, बालकांच्या उत्तम देखभालीसाठी अंगणवाडी केंद्रांचे आधुनिकीकरण आणि आरोग्य व पोषण प्रणालींच्या समन्वयाचे मजबुतीकरण असे उपक्रम संपूर्णपणे सरकारी सहभागातून राबविले जात आहेत. सामाजिक सुरक्षा व रोजगाराच्या ठिकाणी सुरक्षितता याबाबतची नियमावली, आरोग्य व कामाच्या ठिकाणी असलेल्या वातावरणाबाबतची नियमावली यासारख्या कायदेशीर सुधारणांमुळे पाळणाघरे व कामगार कल्याणाची सुविधा भक्कम होत आहे. बालकांची देखभाल ही आर्थिक न्याय व कामातील सहभाग यासाठी महिलांना सक्षम करणारी बाब आहे, हे ओळखून या कायदेविषयक सुधारणा करण्यात आल्या आहेत. भारताच्या एकूण लोकसंख्येतील महिला व मुलांचे प्रमाण ६५ टक्क्यांपेक्षा अधिक आहे. वाजवी दरातील व दर्जेदार बालसंगोपन सुविधांमधील गुंतवणुकीमुळे वेळेआधी विकास, मातांची आकांक्षापूर्ती यासाठी मदत मिळते आणि सशक्त देशाचा पाया रचला जातो. वाढते शहरीकरण, स्थलांतर आणि छोट्या कुटुंबांच्या संख्येतील वाढ यामुळे पारंपरिक बालसंगोपन पद्धतीत बदल होत आहेत आणि सहज उपलब्ध, परवडणाऱ्या आणि दर्जेदार बालसंगोपन व कौटुंबिक सेवांचे महत्त्व वाढत आहे. सेवा-शुश्रूषाविषयक अर्थव्यवस्थेतील गुंतवणुकीमुळे विविध राष्ट्रीय प्राधान्यक्रमांनाही चालना मिळते. महिला सक्षम होतात, बालविकासाला चालना मिळते, ज्येष्ठांच्या देखभालीत मदत होते आणि सन्मानजनक रोजगारांची निर्मिती होते. देखभाल प्रणालीच्या संस्थांची निर्मिती होते तेव्हा महिलांना कामाची संधी मिळते, कुटुंबात स्थैर्य येते आणि देशाच्या विकासाला गती मिळते. विकसित भारत २०४७ या उद्दिष्टाकडे देश वाटचाल करीत असताना, आपण एक मूलभूत सत्य समजून घेतले पाहिजे. शाश्वत विकासाचा पाया सशक्त समाज असतो. सेवा-शुश्रूषाविषयक अर्थव्यवस्था हा त्यापैकी एक आहे. या जागतिक महिला दिनानिमित्त संगोपनातील महिलांच्या कामाचे मोल ओळखून त्याला पाठिंबा देणे व त्यांच्या सशक्तीकरणासाठी आपल्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार करूया.

(लेखिका केंद्र सरकारच्या महिला व बालविकास मंत्री आहेत)

## रविवारची पत्रे

### महिलांच्या सन्मानाचा दिवस

जगभरात ८ मार्च हा आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून साजरा केला जातो. संपूर्ण वर्षातील हा एक दिवस महिलांना समर्पित केला जातो. हा दिवस प्रत्येक महिलेसाठी सन्मानाचा, अभिमानाचा आणि आनंदाचा दिवस आहे. या दिनी कर्तृत्ववान महिलांच्या कार्याची दखल घेतली जाऊन त्यांना विविध ठिकाणी सन्मानित केले जाते. स्त्री ही गृहिणी असो वा नोकरी करणारी असो, ती आपल्या घरच्या जबाबदाऱ्या लीलया पार पाडते. स्त्री, आई, बहीण, मुलगी, पत्नी म्हणून प्रत्येक क्षणी सर्वस्वाचा त्याग करण्यास ती तयार असते. आजकाल महिलांनी सर्वच क्षेत्र काबीज केली आहेत. असं एकही क्षेत्र नाही की, त्यात महिलांनी आपला ठसा उमटवलेला नाही. प्रत्येक ठिकाणी पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून महिलांनी पुरुषांपेक्षा सरस कामगिरी केलेली आहे. स्त्रीविना घराला घरपण नसते. स्त्रीमध्ये घराला जोडून ठेवण्याची अनोखी शक्ती असते. ती नेहमी आपल्या कुटुंबासाठी जगत असते म्हणूनच हा एक दिवस फक्त तिच्यासाठी असतो. आजच्या आधुनिक काळातील स्त्री ही कुणापेक्षाही कमी नाही. आजही स्त्रियांना स्वतःच्या अस्तित्वासाठी संघर्ष करावा लागतो. तिच्या या प्रयत्नांमध्ये तिचा उद्याचा प्रवास दडलेला आहे. करीअर, शिक्षण, कुटुंब यापलीकडेही जाऊन तिला तिचं अस्तित्व ठरवायचं आहे. स्वतःच्या पायावर ती कधीच उभी राहिली आहे. महिलांप्रति आपल्या जाणिवा कायमच संवेदनशील ठेवायला हव्यात आणि त्यांचं समाजातलं योगदान मान्य करायला हवे.

**जयदीप सुधीर हिरवे** / पुणे-९०९६२७६४८३

### परीक्षांना सामोरे जाताना...

दहावी-बारावीच्या परीक्षा जवळपास आटोपल्या असून आता कॉलेजच्या परीक्षांचे दिवस आहेत. पदवी-पदव्युत्तर परीक्षांच्या निकालानंतर काय, असा प्रश्न अनेक विद्यार्थ्यांना भेडसावत असतो. मानसशास्त्रीयदृष्ट्या विचार केल्यास प्रत्येक विद्यार्थ्याने चांगल्या आयुष्यासाठी स्वप्नं पाहणं आवश्यक आहे. स्वप्नांचं रूपांतर विचारात आणि विचारांचे कृतीत होतं. विद्यार्थ्यांचा शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टिकोन मात्र खरोखरच सकारात्मक आहे, हे मान्य करावचं लागेल. असे असले, तरी विद्यार्थ्यांसाठी तो फक्त परीक्षांपुरता मर्यादित असू नये. आपण जे शिकत आहोत त्याचा वापर परीक्षेव्यतिरिक्त जीवनात कसा करता येईल, याचा विचार व्हावा. काही परीक्षेत चांगले गुण मिळवतात, पण प्रत्यक्षात प्रात्यक्षिक ज्ञान काहीच नसतं. या जगात वावरताना माणसाने अपडेट राहिलं पाहिजे. म्हणूनच विद्यार्थ्याने अभ्यासाबरोबरच स्वावलंबन, श्रम, सेवा, सहकार्य आणि त्याग ही जीवनमूल्यं शिकायला हवीत. आवड जोपासावी. गुरूचं प्रत्येकाच्या आयुष्यात महत्त्व अनन्यसाधारण असतं. त्यांनी सांगितलेल्या, शिकवलेल्या प्रत्येक गोष्टीचा उपयोग आयुष्यात पदोपदी होतो. त्यामुळे शिक्षकांच्या आज्ञेचं पालन करणे गरजेचं आहे. आयुष्यातला महत्त्वाचा टप्पा असणारी विद्यार्थिदशा ही उज्ज्वल भविष्य साकारण्यासाठी कारणीभूत ठरते. एकदा हा टप्पा निघून गेला की, मूलभूत आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी क्वचितच वेळ मिळतो. त्यामुळे आपला सर्वांगीण विकास कसा होईल, याकडे लक्ष द्यायला पाहिजे. 'वेळेचं नियोजन' हा एकच रामबाण उपाय आहे. ऐन तारुण्यात असणाऱ्या विद्यार्थ्यांचे बाहेरील जगाशी संबंध वाढल्याने त्यांचा अभ्यासातला कल कमी होतो. जर मनोरंजनासोबतच अभ्यासालाही पुरेसा वेळ दिला तर भविष्याच्या वाटेवरच्या अडचणी कमी होतील. कॉलेज जीवनात त्याच्या जीवनाला वेगळंच वळण येतं. करीअरचे अनेक पर्याय असतात. विद्यार्थी काहीसा गोंधळून जातो. स्वतःच्या आवडीनुसार, ज्या विषयात आपल्याला रस आहे अशा गोष्टींची निवड करणारे विद्यार्थी काही मोजकेच असतात. हे विद्यार्थी स्वतःच्या कलागुणांना वाव देत शिक्षण घेतात. विद्यार्थ्याकडे निर्णय घेण्याची क्षमता असावी. कॉलेजच्या विविध उपक्रमांमध्ये, स्पर्धांमध्ये सहभागी होऊन स्वतःचं स्थान निर्माण करावं. पाल्याचे आयुष्य अधिकाधिक वास्तववादी होण्यासाठी पालकांचीही भूमिका तितकीच महत्त्वाची आहे.

**प्रमोद तिजारे** /८७६७१७७०८९

### विकासाच्या परिघाबाहेर आदिवासी समाज

रानावनात, जंगलात व डोंगरकडेकपारीत राहणाऱ्या भारतीय आदिवासी जमातींचं जीवन अत्यंत खडतर आहे. त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सरकारकडून अनेक योजना, कायदे आणि कार्यक्रम राबविले जातात. मात्र, या योजनांमधून आदिवासी समाजाचे प्रश्न कितपत सुटतात, याचं वस्तुनिष्ठ मूल्यमापन क्वचितच केलं जातं. कागदावर दाखवलेली प्रगती आणि प्रत्यक्षातलं वास्तव यात मोठी दरी आहे. आदिवासी वनहक्क कायदा हा अत्यंत महत्त्वाचा असून दोन दशके उलटली तरी या कायद्यामुळे आदिवासी समाजाच्या जीवनात आमूलाग्र बदल झाल्याचं चित्र दिसत नाही. यासोबतच दुर्गम आदिवासी भागात सेवा देण्याबाबत शासकीय नोकरवर्गाची उदासीनता एक गंभीर प्रश्न आहे. शिक्षण, आरोग्य, महसूल किंवा सामाजिक कल्याण कोणत्याही विभागात आदिवासी भाग 'साईड पोस्टिंग' म्हणून पाहिला जातो. प्रशासनच जर या भागांपासून दूर राहिलं, तर शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचेल, अशी अपेक्षा कशी करायची? आदिवासी समाजाचा विकास साधायचा असेल तर कायदे आणि योजनांबरोबरच जनजागृती आणि शिक्षण या दोन घटकांवर भर देणं अपरिहार्य आहे. आजही अनेक आदिवासी दुर्गम भागांत मूलभूत शैक्षणिक सोयी उपलब्ध नाहीत. भाषेची अडचण आणि व्यापक जनजागृतीचा अभाव यामुळे महाराष्ट्र, छत्तीसगड आणि ओडिशामधील काही अपवाद वगळता आदिवासी समाजाची स्थिती चिंताजनक आहे. आदिवासींना खऱ्या अर्थाने मुख्य प्रवाहात आणायचं असेल, तर त्यांना दयेचा नव्हे तर हक्काचा विकास मिळायला हवा.

**अमोल आढळकर** /९७६५९६९६३०

### महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न



देशातील महिलांची परिस्थिती पाहिल्यावर त्या देशाची स्थिती कशी आहे ते ठरत असते. स्त्रियांचे महत्त्व आजही आपल्या भारतीय समाजात जसे आहे तसेच आहे. आज महिलांवर सर्व क्षेत्रात अपमान, अत्याचार, बलात्कार, विनयभंग, हुंडाबळी, अपहरण, लैंगिक छळासाठी प्रयत्न करणाऱ्या नराधमांची संख्या कुठे ना कुठे वाढत आहे. हे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून समाजाकरिता लाजिरवाणे ठरत आहे. सध्याचे राजकारण अतिशय खालच्या दर्जाचे असून महिलांची पिळवणूक, अपशब्द, चिखलफेक केली जात आहे. आज महिला सर्व क्षेत्रात स्वतःच्या कर्तृत्वावर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात उंच भरारी घेताना दिसतात तसेच राजकारणातही आज आपल्या देशातील सर्वोच्च राष्ट्रपती पदावर द्रौपदी मुर्मू विराजमान झालेल्या आहेत, तरीही काही कारणांनी देशातील स्त्रियांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झालेला आहे. स्त्रियांचे स्थान हे समाजात महत्त्वाचे असून त्यांनी देशाच्या उन्नतीसाठी महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. समानतेचे हक्क देऊन त्यांचा सन्मान राखणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. सरकारतर्फे 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' अशा योजना राबवून स्त्रियांचे शिक्षण वाढविण्याचा प्रयत्न आहे. देशात ग्रामीण क्षेत्रात व वेगवेगळ्या क्षेत्रात आदरयुक्त महिलांविषयी अतिशय चांगल्या घटना घडत असतात. खरे म्हणजे समाजामध्ये चांगल्या गोष्टींचा प्रभाव होण्याकरिता अशा बातम्या दाखविणे आवश्यक आहे. त्यातून इतर महिलांना प्रोत्साहन मिळू शकते. ऐवजी बलात्कार, विनयभंग, अपहरण अशा घटनांची ब्रेकिंग न्यूज चालविली जाते. प्रत्येकाने आपल्या घरातील स्त्रियांना प्रोत्साहन देऊन त्यांना योग्य शिक्षण द्यावे, सन्मानाने वागवावे. त्यांच्या हक्कांचे रक्षण करावे. समाजातील वाईट प्रवृत्ती दूर करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत. प्रत्येक व्यक्तीने महिलांकडे सन्मानाने पाहिले पाहिजे. आई, बहीण, मुलगी आणि बायको अशा विविध रूपात स्त्रिया लाभलेल्या आहेत. महिलांविषयी योग्य दृष्टिकोन ठेवल्यास खऱ्या अर्थाने महिलांचा आदर व आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा केला जाईल असे वाटते.

**केशव कुकडे** /९०११०६६ ७२६

### शिक्षणातील 'ग्रीन कॉरिडॉर'

महाराष्ट्रात दरवर्षी लाखो विद्यार्थी प्रवेश, परीक्षा आणि निकाल या तीन महत्त्वाच्या टप्प्यांमधून जातात. या प्रक्रियांवर त्यांच्या आयुष्याचा पुढील मार्ग अवलंबून असतो. मात्र, शिक्षण क्षेत्रातील अनेक प्रक्रिया आजही कागदी फाईली, प्रशासकीय स्तरांची गुंतागुंत आणि निर्णय प्रक्रियेतील विलंब यांच्या कचाट्यात अडकलेल्या आहेत. याचा परिणाम विद्यार्थ्यांवर होतो. शिक्षण व्यवस्थेला वेग देण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या हिताचे निर्णय तातडीने घेण्यासाठी 'ग्रीन कॉरिडोर इन एज्युकेशन' ही संकल्पना महत्त्वाची ठरते. वैद्यकीय क्षेत्रात ही संकल्पना जीवन वाचवण्यासाठी वापरली जाते. शिक्षण क्षेत्रातही परिस्थिती काही वेगळी नाही. येथेही विलंबाचा परिणाम विद्यार्थ्यांच्या भविष्यावर होतो. शिक्षणातील निर्णय प्रक्रियेसाठीही अशाच प्रकारचा प्रशासनिक ग्रीन कॉरिडॉर तयार करण्याची गरज आहे. शिक्षणातील ग्रीन कॉरिडोर म्हणजे प्रवेश, परीक्षा आणि निकाल या प्रक्रियांमध्ये कोणताही अनावश्यक अडथळा न राहता निर्णय प्रक्रिया वेगाने पूर्ण होण्याची व्यवस्था. या व्यवस्थेत कोणतीही फाईल २४ तासांपेक्षा जास्त प्रलंबित राहणार नाही आणि विद्यार्थ्यांच्या हिताशी संबंधित निर्णय तातडीने घेतले जातील. याद्वारे परीक्षा संदर्भातील समस्या तातडीने सोडविण्यासाठी विशेष नियंत्रण कक्ष निर्माण करता येईल. आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक देशांनी शिक्षण व्यवस्थेला वेग देण्यासाठी अत्यंत कार्यक्षम प्रणाली निर्माण केल्या आहेत. भारतामध्येही राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये शिक्षण व्यवस्थेला अधिक लवचीक, तंत्रज्ञानाधारित आणि विद्यार्थिकेंद्री बनवण्यावर भर देण्यात आला आहे. या धोरणात डिजिटल प्लॅटफॉर्म, पारदर्शक प्रशासन आणि वेगवान निर्णय प्रक्रियेवर विशेष भर आहे. 'ग्रीन कॉरिडोर इन एज्युकेशन' ही संकल्पना या राष्ट्रीय धोरणाच्या उद्दिष्टांशी सुसंगत आहे. या संकल्पनेची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यस्तरावर यंत्रणा स्थापन करावी; ज्यामध्ये शिक्षण मंत्री, प्रधान सचिव, विद्यापीठांचे कुलगुरू, तांत्रिक तज्ज्ञ आणि प्रशासनिक अधिकारी यांचा समावेश असावा. या प्रणालीमुळे शिक्षण व्यवस्थेत अनेक सकारात्मक बदल घडू शकतात. सर्वप्रथम विद्यार्थ्यांच्या शिक्षण प्रवासातील अनावश्यक अडथळे दूर होतील. प्रशासनातील पारदर्शकता वाढेल. निर्णय प्रक्रिया अधिक वेगवान आणि प्रभावी बनेल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे विद्यार्थ्यांचा प्रशासनावरचा विश्वास दृढ होईल. ही व्यवस्था केवळ कागदावर राहू नये; ती प्रत्यक्षात परिणाम देणारी असावी. कारण शिक्षण क्षेत्रात होणारा प्रत्येक विलंब हा विद्यार्थ्यांच्या आयुष्याच्या अमूल्य काळावर आघात असतो.

**प्रा. भागवत भांगे** /७२७६४६९८००

### सशक्तीकरणाची व्याख्या बदला



८ मार्चला जागतिक महिला दिन साजरा करण्यात येतो. त्यानिमित्त आयोजित कार्यक्रमांत महिला सशक्तीकरणावर अनेक चर्चा, उपक्रम राबविले जातात. पण वर्षांचे बाकी दिवस या महिला काय करतात, कसं आयुष्य जगतात हे पाहणे महत्त्वाचे आहे. महिला सशक्तीकरणाची सुरुवात अगदी मुळापासून म्हणजे आपल्या घरापासून झाली पाहिजे. घरच्या सुनांची उणीदुणी काढून, नावे ठेवून तिचा आत्मविश्वास कमी करण्याऐवजी तिच्यातील सुप्त गुण, तिची एखादी आवड जिला जोपासून ती आर्थिकरीत्या आत्मनिर्भर होऊ शकेल... ती ओळखून आपली सून अतिशय आत्मविश्वासाने समाजात उभी राहू शकेल, असा प्रयत्न करा. सुधा मूर्ती नेहमी त्यांच्या मुलाखतीत सांगतात की, त्यांना स्वयंपाक रुचकर बनवता येत नाही. मला सांगा खरंच आज त्यांनी जे यश, नावलौकिक मिळविला आहे, जे सामाजिक कार्य त्या करतात, त्यापुढे त्यांना स्वयंपाक चवदार येत नाही या गोष्टीला महत्त्व आहे का? आजकालच्या बहुतेक मुलींनी तर महिला सशक्तीकरण आणि महिला व्यक्तिस्वातंत्र्याची व्याख्याच बदलवून टाकली आहे. अर्धवट कपडे घालून खांदे, कंबर, पोट, मांड्या उघड्या ठेवून फिरणे, घरची आर्थिक परिस्थिती जेमतेम आणि स्वतःला कमवायची अक्कल नसणे, कष्ट करण्याची ताकद नसणे, तरीही केवळ दिखावा करण्यासाठी महागड्या कॅफेमध्ये कॉफी पीत आपण काहीतरी खूप अफलातून आहोत असे हावभाव करणे... यांना वाटत झालं, स्त्री स्वातंत्र्य आणि सशक्तीकरण सिद्ध. डॉ. आनंदीबाई जोशी, सावित्रीबाई फुले आदी कितीतरी लोकांनी स्त्री विरोधी आणि स्त्रियांना घातक अशा कुप्रथांविरुद्ध लढा दिला, स्त्री शिक्षण आणि महिलांना समाजात मानसन्मान मिळावा म्हणून लढा दिला. पण आम्ही काय करतो आहोत? मिळालेल्या स्वातंत्र्याचा आणि संधींचा दुरुपयोग! स्वतःच्या सशक्तीकरणासाठी पुरुषांवर निर्भर राहण्यापेक्षा स्वतःच्या क्षमता ओळखा, दिखाव्याला बळी पडू नका, जितकं शिक्षण घेता येईल तितकं जास्त शिक्षण घ्या, वाचन करा, आपल्या आजूबाजूला घडत असलेल्या घडामोडींविषयी माहिती घ्या, सामाजिक जागृतता ठेवा, आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर होण्याचा प्रयत्न करा... मग महिला सशक्तीकरणाची व्याख्या तुमचा चेहराच सांगेल. एक शिक्षित स्त्री संपूर्ण घराला शिक्षित करते तसेच एक सशक्त स्त्री संपूर्ण घरातील आणि तिच्या आजूबाजूच्या महिलांना सशक्त करते. त्यामुळे जागतिक महिला दिनाच्या पर्वावर महिलांना सशक्तीकरणासाठी प्रोत्साहित करू या...

**प्रांजली र. भिवापूरकर** /९८५०४९६४५

### तरुणांचा ओढा योगाकडे...



तरुण वर्ग हा जिम, सायकलिंग, स्विमिंग, जॉगिंगसोबतच मोठ्या प्रमाणावर योगाकडे वळताना दिसून येत आहे. योगामुळे शारीरिक आरोग्य उत्तम राहतेच; मानसिक आरोग्यसुद्धा तंदुरुस्त राहण्यास मदत होते. प्रत्येक योगासनांचे फायदे आहेत जसे की, वज्रासन- उत्तम पचनक्रिया. भुजंगासन- मजबूत पाठीचा मणका. सूर्यनमस्कार- उच्च रक्तदाब कमी होतो. धनुरासन- पोटाची चरबी कमी होते. हलासन- थायरॉईड कमी होतो. उष्टासन- आतड्यांची क्षमता वाढते. प्राणायाम- तजेलदार त्वचा. त्यामुळे असंख्य तरुण वर्गांचा योगाकडे वाढता कल आहे.

**प्रा. सचिन जाधव** ८४२५००३१२७

# चिखलठाण येथे लोकवर्गणीतून रस्त्याचे डांबरीकरण

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.७ मार्च-**

पन्नास वर्षांपूर्वी माकडांच्या पिण्याच्या पाण्याची सोय करण्याच्या हेतूने निर्माण झालेल्या चिखलठाण तालुका करमाळा येथील बारा बलुतेदार संघटनेच्या वतीने कोटलींग मंदिर परिसरात लोकवर्गणीतून साडेआठ लाख रुपये खर्च करून रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले असून शासनाच्या मदतीची अपेक्षा न ठेवता या परिसरात येणाऱ्या भाविकांना सुविधा मिळण्यासाठी आजपर्यंत एक कोटी रूपये रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या विविध सुविधा लोकवर्गणीतून या ठिकाणी संघटनेच्या माध्यमातून निर्माण करून एक नवीन आदर्श निर्माण केला आहे.

करमाळा तालुक्यातील पश्चिम भागात उजनी धरणाच्या काठावर प्रसिद्ध कोटलिंग देवस्थान आहे. वर्षभरात या ठिकाणी लाखो भाविक व पर्यटक या निसर्गरम्य परिसराला भेट देण्यासाठी येत असतात या परिसरात व गावात साडेतीनशे ते चारशे माकडांचे



कायमस्वरूपी वास्तव्य आहे पन्नास वर्षांपूर्वी या माकडांच्या पिण्याच्या पाण्यासाठी व खाण्याची व्यवस्था करण्यासाठी निर्माण झालेल्या या गावातील बारा बलुतेदार मंडळींनी एक संघटना स्थापन केली याच्या माध्यमातून लोक वर्गणीतून या माकडांच्या खाण्याची व पिण्याच्या पाण्याची सोय त्यांनी केली यानंतर लोकांमधून त्यांना चांगला प्रतिसाद मिळू लागला या रकमेतून आमली पौर्णिमा उत्सवा दिवशी व गावातील अखंड हरिनाम सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी अन्नदान केले जाते उर्वरित लोकवर्गणीतून या ठिकाणी वेगवेगळ्या सुविधा निर्माण केल्या सध्या या संघटनेमध्ये गावातील इलाई इनामदार, लक्ष्मण टिंगरे, महादेव पवार ,डिगांबर पोळ,दादा रोकडे, गोरख हरिहर, शिवाजी राऊत, आनंद पोळ, सुभान तांबोळी यांचा पुढाकार असतो. या संघटनेच्या माध्यमातून मंदीर परिसरात आजपर्यंत ग्रेनाईट मार्बव फरशी, मंदीरातील पी.ओ.पी, नगारखाना व मुख्य दरवाजा कमानीची निर्मिती केली आहे पुढील पटांगणावर ब्लॉक बसवले असून पाच ठिकाणी हायमास्ट दिवे बसवले आहेत, परिसराच्या वैभवात भर घालण्यासाठी स्वागत कमानीची निर्मिती केली आहे. यावर्षी या संघटनेच्या माध्यमातून कोटलिंग मंदिर परिसरात छबिना मिरवणूकीच्या संपूर्ण रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले आहे.

## महत्वाचे...



## ए. जी. पाटील तंत्रनिकेतनमध्ये विज्ञान दिन साजरा

**सोलापूर, दि. ७ मार्च-**

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लागावा व संशोधक नजर तयार व्हावी तसेच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून नेहमी तत्पर असलेल्या ए. जी. पाटील पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट मध्ये दरवर्षीप्रमाणे विज्ञान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विज्ञान दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांकरिता या वर्षीच्या सायन्स डे च्या थीम वर आधारित विज्ञान प्रोजेक्ट मॉडेल स्पर्धा, विज्ञान पोस्टर स्पर्धा आणि वर्ग सजावट असे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. प्रथम वर्ष विभागातील सर्व विभागामधून २३ ग्रुपने सहभाग नोंदवला. याचे उद्घाटन प्राचार्य डॉ. एम. ए. चौगुले, उपप्राचार्य एस के मोहिते, प्रथम वर्ष२ इन्चार्ज व्ही आर आवटे आदींच्या उपस्थितीत झाले. प्रा. पी एस स्वामी व एस जे लिगाडे यांनी प्रदर्शनाची पाहणी करून सर्व विभागांमधून विजेत्यांची निवड केली. संस्थेचे अध्यक्ष एस ए पाटील, सचिव एस एस पाटील यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. कार्यक्रमाचे संयोजक म्हणून प्रा. एस के कांबळे आणि प्रथम वर्ष इन्चार्ज व्ही आर आवटे यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. तसेच कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. सी एस ढेपे, प्रा. एस एल मुडगी, प्रा. एस एन गवंडी, प्रा. एस आर. मिठा, प्रा. एल एस बिराजदार, प्राध्यापिका एस पी डोके व प्राध्यापक आर आर कांबळे यांनी परिश्रम घेतले.

**विविध स्पर्धांचे निकाल (प्रथम तीन )**

विज्ञान मॉडेल स्पर्धा : प्रथम वर्ष मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग (हायजिन बॉक्स फॉर टूथब्रश अँड टूथपेस्ट), प्रथम वर्ष इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकमुनिकेशन इंजीनियरिंग विभाग आणि सिव्हिल इंजिनिअरिंग विभाग (रोड ओव्हरलोड कंट्रोल सिस्टीम युजिंग मायक्रो स्विचेस अँड ट्रायो कॉम्बिनेशन ऑफ स्मार्ट सिटी), प्रथम वर्ष इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभाग (अनोलॉग सोलार ट्रॅकर). **पोस्टर्स स्पर्धा :** प्रथम वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभाग (फ्युचर टेक अँड डिजिटललायझेशन), प्रथम वर्ष इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभाग (एग्रीकल्चर अँड बायोटेक), प्रथम वर्ष सिव्हिल इंजिनिअरिंग विभाग व इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकमुनिकेशन इंजीनियरिंग विभाग (फ्युचर टेक डिजिटलायझेशन इवॉल्युशन ऑफ मोबाईल कॉम्प्युटिंग). वर्ग सजावट स्पर्धा : प्रथम वर्ष इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभाग.

## आर्या कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये 'फार्मा इंडस्ट्रीतील क्वालिटी ऍश्युरन्सची भूमिका' या विषयावर व्याख्यान

**टेंभुर्णी, दि. ७ मार्च-**

टेंभुर्णी येथील श्री विठ्ठल शिक्षण प्रसारक मंडळ, निमगाव संचलित आर्या कॉलेज ऑफ फार्मसी येथे विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नेस्टॉर फाम स्युटीकल्स, गोवा येथील क्वालिटी ऍश्युरन्स मॅनेजर अमोल कांबळे यांनी 'रोल ऑफ क्वालिटी ऍश्युरन्स इन फार्मा इंडस्ट्री' या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. व्याख्यानामध्ये अमोल कांबळे यांनी फार्मास्युटिकल उद्योगामधील क्वालिटी ऍश्युरन्स विभागाचे महत्त्व, त्याची कार्यपद्धती तसेच औषधनिर्मिती प्रक्रियेत दर्जा राखण्यासाठी या विभागाची असलेली जबाबदारी याबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. तसेच फार्मा इंडस्ट्रीमधील इतर महत्त्वाचे विभाग जसे की प्रोडक्शन, क्वालिटी कंट्रोल, रिसर्च अँड डेव्हलपमेंट, पॅकेजिंग आदी विभागांचे कार्य आणि त्यातील करिअरच्या संधींबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांची त्यांनी समर्पक उत्तरे देत शंकांचे निरसन केले. डी. फार्मसी पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांसाठी औषधनिर्मिती कंपन्यांमध्ये रोजगाराच्या भरपूर संधी उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले व विद्यार्थ्यांनी उद्योगाभिमुख कौशल्ये विकसित करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय चव्हाण होते. त्यांनी मार्गदर्शनपर व्याख्यानाबद्दल अमोल कांबळे यांचे आभार मानले. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. हर्षवर्धन वाघमारे यांनी कामकाज पाहिले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्य स्पर्धांची ठिकाणे जाहीर

### अंबरनाथ, नागपूर, बीड आणि बारामती येथे अनुक्रमे व्हॉलिबॉल, कबड्डी, कुस्ती व खो-खो स्पर्धांचे आयोजन

**मुंबई, दि. ७ मार्च-**

राज्यभर क्रीडा संस्कृतीला नवे बळ देणाऱ्या विविध राज्यस्तरीय स्पर्धांच्या आयोजनाचा महत्त्वपूर्ण निर्णय उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या उपस्थितीत बैठकीत घेण्यात आला. क्रीडाप्रेमींसाठी ही आनंदाची बातमी ठरत असून महाराष्ट्रात पुन्हा एकदा क्रीडामहोत्सवाचा जल्लोष मार्चमध्ये अनुभवायला मिळणार आहे. युवा खेळाडूंना संधी देणे, स्पर्धात्मक वातावरण निर्माण करणे आणि राज्याच्या समृद्ध क्रीडा परंपरेला चालना देणे या उद्देशाने विविध प्रतिष्ठित चषक स्पर्धांचे आयोजन राज्यातील वेगवेगळ्या शहरांमध्ये करण्यात येणार आहे.

बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय हॉलीबॉल स्पर्धा अंबरनाथ येथे, छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा नागपूर येथे, स्वर्गीय खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा बीड येथे, तसेच कै. भाई नेरुरकर चषक राज्यस्तरीय खो-खो स्पर्धा बारामती येथे आयोजित करण्यात येणार आहेत.

या स्पर्धांमुळे राज्याच्या विविध भागातील खेळाडूंना एकत्र येऊन आपली कौशल्ये दाखवण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे.

### क्रीडा विकासासाठी महत्त्वाच्या स्पर्धा : उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

याबाबत बोलताना उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांनी सांगितले की, राज्यातील क्रीडा विकासासाठी अशा स्पर्धा अत्यंत महत्त्वाच्या आहेत. या स्पर्धांमधून उभारी घेणारे खेळाडू भविष्यात देशाचे प्रतिनिधित्व करतील आणि महाराष्ट्राचे नाव राष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल करतील, असा त्यांना विश्वास आहे.



## हराळवाडीच्या बाळकृष्ण शेळकेची सलामी

### शहर व जिल्हा कुस्ती निवड चाचणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मार्च-**

शहर व जिल्हा कुस्ती स्पर्धेत ९२ किलो गटात हराळवाडीच्या बाळकृष्ण शेळके याने विजयी सलामी दिली.

येथील अथर्व गार्डन मध्ये सुरू झालेल्या या स्पर्धेत त्याने पंढरपूरच्या सोमनाथ कोरकेला हरविले. ६८व्या महाराष्ट्र कुस्ती स्पर्धेसाठी जिल्हा आजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. नगरसेवक आनंद जाधव, नगरसेवक संजय कोळी आणि नगरसेवक पाटील यांच्या हस्ते सलामीची कुस्ती लावण्यात आली.

## विनयभंग प्रकरणी चौघा विरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि.७ मार्च -**

मंगळवेढ्याच्या ग्रामीण भागात एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीस तु चायनीस का उघडले आहे? ही जागा आमची आहे असे म्हणत तिला अश्लिल शिवीगाळी करुन तिच्या मनाला लज्जा वाटेल असे कृत्य केल्या प्रकरणी निर्मला स्वामी, दिलीप स्वामी,शोभा स्वामी,कैलास स्वामी (सर्व रा.भोसे) या चौघा विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

पोलीस सुत्रांकडून मिळालेली माहिती अशी,यातील पिडीत मुलगी दि.५ रोजी सकाळी १० वाजता ती तिच्या आत्यासह भोसे येथे चायनीस सेंटर या ठिकाणी गेले असता वरील आरोपींनी तेथे येवून आरोपींनी हाताने मारहाण केल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक विनोद लातुरकर हे करीत आहेत.

### CHANG IN NAME

I, hereby declare that My Old Name- **AISHWARYA SUKANT VHORA** has been changed to - **SANDHYA SURAJ GANDHI**

Resi add- 2471, Khupare bol, Station Road, Barshi, Taluka- Barshi, District- Solapur Pin Code: 413 401. Aadhaar No.: 5186 8395 1884 Maharashtra

Mob No. 9075626291

Affidavit No. 815/2026

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः सोलापूर शहर व सोलापूर जिल्ह्यातील लोकांना या खरेदीपूर्व जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डि व सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी कसबे सोलापूर येथील सलगवाडी येथील भुमापन क्र.८/१/१/२/३/१/प्लॉट नं. १६६/१९१२/ब २१ यांसी क्षेत्र १.१६.१६ चौ.मी. यांसी

चतुःसिमा येणेप्रमाणे

पूर्वेस : अंतर्गत रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं. बी१०

दक्षिणेस : सर्व्हे नं.८/१/३/२ ची जागा, उत्तरेस : प्लॉट नं. बी२०

येणेप्रमाणे चतुः सिमेतील वर नमुद प्लॉटजागा ही विद्यमान मालक श्री. भरत बुधमल कुंकुलोळ यांच्या मालकी वहिवाटीची असून त्यांनी आमचे अशिल श्री. सुरज मदन साबळे रा. क २८७, राजस्व नगर, प्रताप नगर रोड, सोलापूर यांना खुषखरेदीने विकण्याचे ठरविले आहे.

सदर नमूद मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री त्यांनी आमचे अशिलांना दिली आहे. आमचे अशिल लवकरच नमूद प्लॉटचे रजिस्टर खरेदीखत करुन घेणार आहेत. तथापि ज्या कोणाचाही या मिळकतीत करार, मदार, साठेखत, दान, गहाण, टाच, लिज, बक्षिस, पोटगी, बोजा, विल्हेवाट, वाटणीपत्र, मृत्युपत्र या अथवा अन्य कोणत्याही मार्गाने हक्क अथवा हितसंबंध असल्यास अथवा कोर्ट केसेस असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०२ दिवसाचे आत खालील पत्त्यावर भेटून, कागदोपत्री हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याचे गृहीत धरुन रजिस्टर खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार मिळकतीवर अगर आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होऊ नये व कोणास कळविले नाही असे होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली.

ही खरेदीपूर्व जाहिर नोटीस दिली ता. ०७/०३/२०२६

**सही/-**
**अशील**
**सुरज मदन साबळे**

**सही/-**
**ॲड. शिवा धरेप्पा औटगी**
बी.ए. एल.एल.बी ॲडव्होकेट
पत्ता: चेंबर नं.४, लॉयर्स चॅवर, जिल्हा न्यायालय आवार, सोलापूर
मो.नं. ९७६२६३३१६५

### उपविभागीय अधिकारी सोलापूर क्र. १ सोलापूर यांचे न्यायालय

किरकोळ अर्ज क्र. :- ६५/२०२४
संगणक क्रमांक १९३/२०२४
सोलापूर दिनांक :- १२/१/२०२५

**नोटीस**

अतुल दगडू शेंडगे
रा. शेंडगे प्लॉट, उपळाई रोड, — वादी
ता. बार्शी जि. सोलापूर

**विरुध्द**

१) जयवंत रामलिंग शेंडगे
२) गणपत रामलिंग शेंडगे
३) यशवंत रामलिंग शेंडगे
४) दगडू रामलिंग शेंडगे — प्रतिवादी
५) वसंत रामलिंग शेंडगे
६) हिंमतराव रामलिंग शेंडगे (मयत) वारस
प्रेमनाथ हिंमतराव शेंडगे
सर्व रा. शेंडगे प्लॉट, उपळाई रोड,
ता. बार्शी जि. सोलापूर

वादींनी मंडळ अधिकारी बार्शी यांचेकडील मौजे बार्शी तालुका बार्शी येथील दिलेल्या फेरफार क्र. २६१८ सन १९८३ चे नोंदी विरुध्द अपिल दाखल केले आहे.

या नोटीशीद्वारे तुम्हास कळविणेत येते की, सदर अपिलाची सुनावणी दिनांक १८/३/२०२६ रोजी दुपारी ठीक ३.०० वाजता तहसिल कार्यालय बार्शी येथे ठेवणेत आली आहे. सदर तारखेच्यावेळी आपण स्वतः किंवा आपल्या विधीज्ञामार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे. हजर न राहिल्यास आपणास काहीही सांगावयाचे नाही असे समजून एकतर्फी (ex-parte) सुनावणी घेणेत येईल.

**सही/-**
**उपविभागीय अधिकारी,**
**(सोलापूर क्रमांक १ सोलापूर, करिता**



## राष्ट्रीय ॲथलेटिक्स खेळाडू स्वरा जाधवचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मार्च -**

नेहरूनगर येथील विराट स्पोर्टस् अकादमीची राष्ट्रीय ॲथलेटिक्स खेळाडू स्वरा सौदागर जाधव हिचा मॉर्निंग योगा ग्रुपच्या वतीने सत्कार करण्यात आला.

तिने तिहेरी उडीमध्ये राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग नोंदविल्याबद्दल तिचा अभियंता जवाहर उपासे यांच्या हस्ते स्पोर्टस्‌चे शूज देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी तिचे प्रशिक्षक भारती व सुर्याजी लिंगडे, ग्रुपचे अजितकुमार संगवे, उन्मेश कमलापुरे, संतोष कदम, शरद गायकवाड, श्रीरंग कुलकर्णी, आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन चंद्रकांत पुकाळे यांनी केले.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः शहर सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर येथील तसेच आजूबाजूच्या परिसरातील तमाम लोकांना आमच्या अशिलानी दिलेल्या माहिती व कागदपत्रावरुन या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि।। व सब डि।। सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका शहर हद्दवाढ विभाग मजरेवाडी हद्दीतील पेठ हुच्चेश्वर नगर, भाग-१ या नांवाने ओळखले जाणारे नगरातील प्लॉट नं.५७ याचे क्षेत्र ३६ × २४ = ८६४ फुट जागेत १० × १२ फुटाची एक स्लॅब घातलेली खोली व १० × १२ फुटाची संपूर्ण पत्राशेड खोली आहे. यात लाईट नळ व संडास बाथरुमची सुविधा आहे यांसी म.न.पा. मिळकत क्र.६५०५८८ असे आहे.

अशा वर्णनाची संपूर्ण घरजागा आमचे अशिल श्रीमती कावेरी भिमराव कुलकर्णी यांचे पत्नी कै. भिमराव बळवंत कुलकर्णी यांचे नांवावर असून त्यांचे दि.०३/०७/१९९१ रोजी निधन झालेले आहे. त्यांचे मृत्युपश्चात आमचे अशिल श्रीमती कावेरी भिमराव कुलकर्णी ही त्यांचे धर्मपत्नी व कुटुंबकर्ती या नात्याने मुख्य वारस आहेत. आमचे अशिलाचे पती कै. भिमराव बळवंत कुलकर्णी यांचे स्वकष्टार्जित मिळकत असून त्यांचे दि.०३/०७/१९९१ रोजी मृत्यु झालेला आहे.

तरी सदरहू प्लॉट नं.५७ हुच्चेश्वर नगर भाग-१ या मिळकतीवर म.न.पा.चे कर आकारणी विभागाचे दप्तरी त्यांचे नांवाची वारस नोंद होवून त्यांचे नांवे करपश्पती मिळावे व वारस नोंद होवून म.न.पा.कडून त्यांचे नांवे कर पावती मिळावे याकरिता आमचे अशिल हे म.न.पा.कडे अर्ज दाखल करणार आहेत.

तरी सदरहू घरजागेवर आमचे अशिला व्यतिरिक्त इतर कोणाचाही कुठल्याही प्रकारचे हक्क व अधिकार असेल अथवा इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, लीज, करार, मदार, टाच, जप्ती, बोजा, पोटगी, बक्षिसपत्र, खरेदीखत अगर इतर हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसाचे आंत हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्यावर लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचेही कसलेही हरकत व तक्रार न आल्यास ही घरजागा निर्वेध, निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल त्यांचे नांवाची वारस नोंद सो.म.पा.चे कर आकारणी हद्दवाढ विभागाचे दप्तरी त्याचे नावाची वारस नोंद करून घेतील व त्यानंतर कोणाचेही व कसल्याही प्रकारचे तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली तारीख ७/३/२०२६

**सही/-**
**अशिलाची सही / अंगठा**

**सही/-**
**ढेकणे एस.एम.**
ॲडव्होकेट रा. १२६-ओ वाणी गल्ली बाळे, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-प्रोक्योरमेंट**

विभागीय स्टोअर ऑफिस मध्य रेल्वे, सोलापूर भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवत आहे. 01 निविदा क्रमांक:- 96265078, 02 वर्णन:- अन-इन्सुलेटेड कॅडमियम कॉपर कॅटेनरी वायर 65 चौरस मिमी (19/2.10 मिमी) तपशील: टीआय एसपीसी ओएचई कॅट क्यू-सीडी 0971, एसटीआर: टीआय एसटीआर 020 रेव्ह 02 किंवा नवीनतम. 03 प्रमाण:- 21.5 किमी, 04 बक्यौता रक्कम (INR):-रु.243590.00, www.ireps.gov.in वर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ:- 25-03-2026 रात्री 11:30 नंतर., संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे जेणेकरून या निविदेत जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात येईल. वेबसाइट: www.ireps.gov.In.

16 — **सीनियर डीएमएम/सोलापूर**

**सुरक्षित प्रवास करा, पायी प्रवास टाळा.**

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-प्रोक्योरमेंट**

विभागीय स्टोअर ऑफिस मध्य रेल्वे, सोलापूर भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवत आहे. 01 निविदा क्रमांक:-96265076, 02 वर्णन:- आरडीएसओ स्पेसिफिकेशन क्रमांक टीआय/एसपीसी/ओएचई/सीडब्ल्यू/0971 किंवा नवीनतम नुसार सतत कास्ट कॉपर वायर रॉडपासून बनवलेले जॉइंटलेस ग्रूव्हड कॉपर कॉन्टॅक्ट वायर, 107 चौ.मिमी. 03 प्रमाण:- 17.5 किमी, 04 बक्यौता रक्कम (INR):- रु.311690.00, www.ireps.gov वर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ. दिनांक:- 30-03-2026 रात्री 11:30 नंतर., संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे जेणेकरून या निविदेत जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात येईल. वेबसाइट: www.ireps.gov.in.

15 — **श्री. डीएमएम/सोलापूर**

**सुरक्षित प्रवास करा, पायी प्रवास टाळा.**

### महाराष्ट्र शासन
### ग्राम विकास व जलसंधारण विभाग
### बांधकाम वि.क्र.१ जिल्हा परिषद, सोलापूर
### जाहिर नोटीसांतर्गत निविदा सुचना क्र. २२ सन २०२५-२६

अति. मुख्यकार्यकारी अधिकारी/ कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग क्रमांक १, नि.प. सोलापूर दूरध्वनी क्रमाक ०२१७-२७२२१००० हे जिल्हा परिक्षण सोलापूर कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत मक्तेदाराकडून तिन लिफाफा पद्धतीने खालील कामाच्या जाहिर-नोटीसद्वारे द्वारे निविदा मागवित आहेत. जाहिर-नोटीस द्वारे निविदेचा कोरा नमुना कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग क्रमांक १.जि.प. सोलापूर यांचे कार्यालयामध्ये दिनांक ०३/०३/२६ रोजी सकाळी १०.०० वाजले पासून दिनांक १०/०३/२६ रोजी सायंकाळी १७.०० वाजे पर्यंत उपलब्ध राहील. परिपूर्ण रित्या भरलेल्या जाहिर निविदा दिनांक १०/०३/२६ रोजी सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत वा त्यापूर्वी स्विकारण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रु. लाखात | बयाणा रक्कम रु. | काम पूर्ण करणेची मुदत | कोऱ्या निविदा संचाची किं. रु. | अधिकृत ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मा. विरोधी पक्षनेता जिल्हा परिषद सोलापूर यांच्या कक्षास व निजी कक्षास रंगकाम व दुरुस्ती व अनुषंगीक बाबी करणे. | २.४० | -- | ६ महिने | ५००/- | म.स.स |
| २ | मा. अध्यक्ष जिल्हा परिषद सोलापूर यांचे नंदादिप यशवंत नगर येथील निवास स्थानाची रंगकाम व दुरुस्ती व अनुषंगीक बाबी करणे. | ४.०० | -- | ६ महिने | ५००/- | सु.बे.अ |
| ३ | जिल्हा परिषद यशवंतनगर येथील सर्व पदाधिकारी यांचे निवास स्थाना मध्ये आवश्यक ती विद्युती करनाची कामे व दुरुस्ती करणे. | ३.५० | ३५००/- | ६ महिने | ५००/- | खुला |
| ४ | जिल्हा परिषद मुख्यालयातील पाइप लाइन, छतावरील निचरा होणाऱ्या पाईप लाइन, व इतर अनुशांगीक बाबी किरकोळ दुरुस्तीचे कामे करणे, विकास गंगा येथील निवास स्थानाची किरकोळ दुरुस्ती करणे. | २.५० | -- | ६ महिने | ५००/- | म.स.स. |
| ५ | मा. महिला व बाल कल्याण सभापती व मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रां.प) जिल्हा परिषद सोलापूर यांचे यशवंत नगर येथील निवास स्थानाची रंगकाम व दुरुस्ती व अनुषंगीक गाबी करणे. | ५.०० | -- | ६ महिने | ५००/- | सु.बे.अ |
| ६ | चैतन्य निवास स्थान पहिला मजला यशवंत नगर येथील निवास स्थानाची रंगकाम व दुरुस्ती करणे. | २.५० | २५००/- | ६ महिने | ५००/- | खुला |
| ७ | मा. पशुसंवर्धन व कृषी समिती सभापती जिल्हा परिषद सोलापूर व पत्रकार कक्ष यांच्या कक्षास व निजी कक्षास रंगकाम दुरुस्ती व अनुषंगीक बाबी करणे. | ५.६० | -- | ६ महिने | ५००/- | म.स.स |
| ८ | मा.समाजकल्याण सभापती व मा.पशुसंवर्धन व कृषी समिती सभापती जिल्हा परिषद सोलापूर यांचे यशवंत नगर येथील निवास स्थानाची रंगकाम व दुरुस्ती व अनुषंगीक बाबी करणे. | ६.०० | -- | ६ महिने | ५००/- | सु.बे.अ |
| ९ | जिल्हा परिषद येथिल मुख्य इमारती मधील जिना व पादचारी मार्गाचा दुरुस्ती करणे. | ७.०० | ७०००/- | ६ महिने | ५००/- | खुला |
| १० | यशवंत नगर येथील जि.प.कर्मचारी व पदाधिकारी यांचे निवास स्थानाची रंगकाम व दुरुस्ती व अनुषंगीक बाबी करणे. | ६.०० | -- | ६ महिने | ५००/- | सु.बे.अ |

उपरोक्त सर्व कामाबावत निविदा अटी व शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केलेला असून कोऱ्या निविदा संच कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग क्रमांक २, जि.प.सोलापूर यांचे कार्यालयामध्ये दिनांक ०३/०३/२६ रोजी सकाळी १०.०० वाजलेपासून दिनांक १०/०३/२६ रोजी सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत कार्यालयातील नोटीस बोर्डावर पहावयास मिळतील.

१ उपरोक्त तक्त्यातील कामाचे नावासमोर रकाना क्र. ४ व ६ मध्ये नमूद केलेल्या बयाणा व निविदा फी रक्कम स्टेट बँक ऑफ इंडिया येथे चलनाने भरण्यात यावी. सदरची निविदा दिनांक ०३/०३/२६ रोजी सकाळी १०.०० वाजलेपासून दिनांक १०/०३/२६ रोजी सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत कोऱ्या निविदा संच खरेदी करता येतील व सादर करता येतील.

२. निविदेच्या अटी शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदापैकी, एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला आहे.

३. लिफाफा क्रमांक १ मधील सर्व कागदपत्रे जाहिर-निविदा मध्ये सादर करणे आवश्यक आहे. तसेच सादर केलेल्या कागदपत्रावर मक्तेदारांनी स्वतःच्या सहीने (स्वाक्षरीने) साक्षांकित करूनच सादर करावी अन्यथा सदरची निविदा अपात्र करणेत येईल. (निविदे व्दारे सुशिक्षित बेरोजगार अभियंता व मजूर सहकारी संस्थेस काम असलेस बयाणा रक्कम सुट आहे) दिनांक १ जुलै २०१७ पासून जीएसटी (IST) या नव्या कररचनेची अंमलबजावणी सुरु करण्यात आलेली असल्याने, जीएसटी (GST) कराची तरतूद निविदा BOQ मध्ये करण्यात आलेली आहे याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**बांधकाम वि.क्र.२,जि.प. सोलापुर**




# शह, काटशहस चढतो रंग वादविवादाने होत असतो राजकारणाचा बेरंग



राजकारण, कुस्ती आणि तमाशा या तीन फडांविषयी अनेकांना 'विशेष रुची' असते. तद्वत, 'चढाओढीने चढवित होते, बाई मी पतंग उडवित होते'. या 'लावणी'वर आधारित 'धुलीवंदन-रंगपंचमी'चे औचित्य साधून सोलापूर जिल्ह्यातील 'माजी' आमदारांच्या स्वभाव-वैशिष्ट्यांवरील 'राजकीय धुळवड'रुपी (बुरा न मानो होली है... हे येथे उल्लेखनीय!) 'विडंबनात्मक काव्यपंक्ती' खास दैनिक 'तरुण भारत'च्या वाचकांसाठी...

श्रीनिवास ध. गाजूल
मुख्य वरिष्ठ उपसंपादक
९३७०७५९७४६
९५१८५५७४५६





हौळीच्या रंगात म्हणतील,
राजकारण थौडं विसरुन जावुया,
स्वामी समर्थाच्या नगरीत राहून,
गुलालाची उधळण करुया.

- सिध्दाराम म्हेत्रे



हौळीलाही काढतील मौर्चा,
लाल रंगाचीच उधळण,
मागण्या मान्य झाल्याशिवाय
थांबणार नाही सरण.

-नरसय्या आडम

अहो, सुटताच निवडणुकीचा वारा
राजकारण्यांचा सुरु होतो येरझारा
चढाओढीने राजकारण खेळले जातात
इकडून तिकडे, तिकडून इकडे
पक्षांतरही करतात.
निवडणुकीत वाढतोय हेवेदाव्यांचा पसारा
जनतेला मात्र बसतोय फुकटचा मारा
पुढाऱ्यांच्या शह-काटशाहस चढतोय रंग
त्यांच्या वादविवादाने होतो
राजकारणाचा बेरंग.

मांडणी व सजावट : अभिषेक विजयकुमार उघडे



हौळीच्या धुळवडीत गुलाल
असा उधळतील,
विरौधी गटाचे पत्ते आपौआपच
गळून पडतील.

- राजन पाटील



हौळीच्या दिवशी विठ्ठलाचीच
गाणी गातील,
रंग लावून समर्थकांना
राजकारणात न्हातील.

- प्रशांत परिचारक



राजकीय रंगात मिसळणार
नाहीत फार, पक्षसंघटनेविषयी
निष्ठा वाहण्यात, यांचा हात
धरणार नाहीत यार

- प्रकाश यलगुलवार



रंगात न्हाऊन निघतील,
जुन्या आठवणींना उजाळा
देत, मैत्रीची हौळी खेळतील,
तेही सर्वांशी छान छान वागत.

- नरसिंग मेंगजी



हौळीला जौ रंगात येईल,
त्याला देतील प्रेमाची औढ,
राजकारणाच्या मैदानात, साठेंचं
गणित आहे थौडं जड.

- धनाजी साठे



हौळीला रंगात न्हातील, मात्र
विकासकामांचा पडत नाही
विसर, राजाभाऊ म्हणतील,
आमच्या रंगात नाही कसर.

- राजेंद्र राऊत



हौळीच्या रंगात आज, जुन्या
आठवणी काढतील,
आम्ही आहौत, असं पुन्हा
पुन्हा सांगत राहतील.

- जयवंतराव जगताप



हौळीला रंगात न्हाऊन,
कुटुंबियांसौबत रमतील, आबांचे
रंग मात्र, राजकारणात कधी
कधी फिकेही पडतील.

- दीपकआबा साळुंखे



हौळीला भगवा रंग, जौराने
उधळत राहतील,
डिजिटलरुपी रंगात मात्र सर्वात
पुढे धावतील.

- राम सातपुते



हौळीला नका उधळू राजकीय
रंग, म्हणतील विकासाकडे बघा
जरा, ऐन रंगात आल्यावर
मालकांचाच असतौ ऐटबाज तौरा.

- दिलीप माने



हौळीत साखर कारखान्याचाच
गौडवा वाटत राहतील,
केवळ सहकार-अर्थकारणरुपी
गणिताचेच रंग उडवतील.

- संजयमामा शिंदे



हौळीला म्हणतील, काय हा
रंग, काय ती पिचकारी, इथून
तिथून समदं औके, पण गड्या
आपलं गावच आहे भारी.

- शहाजीबापू पाटील

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### बांधकाम कामगार शिष्यवृत्ती अपहार प्रकरणी अटकपूर्व जामीन अर्ज दाखल

**सोलापूर, दि. ७ मार्च -**

येथील सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय यांनी बांधकाम कामगार शिष्यवृत्ती घोटाळा प्रकारणी दाखल असलेल्या गुन्ह्यातील एक आरोपी आर. एस. मुसळे (रा. दमाणी नगर, सोलापूर) यांनी सोलापूर येथील सत्र न्यायालयामध्ये अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केलेला आहे. बांधकाम कामगारांच्या मुलासाठी असलेल्या विविध शैक्षणिक योजनेमध्ये बनावट बोनाफाईड, शैक्षणिक कागदपत्रे सादर करून शासनाची रक्कम रुपये ३ कोटी ६३ लाख २० हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयाने दि. ०४/०३/२०२६ गुन्हा रजिस्टर नंबर २५०/२०२६ अन्वये फौजदार चावडी पोलीस स्टेशन येथे दुकाने निरीक्षक (सुविधाकार), कंत्राटी कर्मचारी, दलाल आणि शिष्यवृत्ती लाभार्थी अशा २० जणांविरुद्ध गुन्हा दाखल केलेला आहे.



सदर गुन्ह्यामध्ये अटकेची शक्यता निमर्माण झाल्यामुळे प्रकरणातील आरोपी आर. एस. मुसळे यांनी ड. शशि कुलकर्णी यांचे मार्फत सोलापूर येथील जिल्हा व सत्र न्यायालयामध्ये अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केलेला असून त्यामध्ये सदर गुन्हाशी आरोपीचा संबंध नाही, कोणतीही खोटी कागदपत्रे आरोपीने दाखल केली नाहीत, कोणत्याही रकमेचा अपहार केला नाही व आरोपी कोणत्याही प्रकारे लाभार्थी नाही. असे महत्त्वपूर्ण मुद्दे अर्जामध्ये नमूद आहेत. त्याची प्राथमिक सुनावणी दि.११ मार्च २०२६ रोजी सत्र न्यायालयासमोर होणार आहे. सदरकामी आरोपीतर्फे ॲड.शशी कुलकर्णी, ॲड. गुरुदत्त बोरगांवकर, ॲड. प्रसाद अग्निहोत्री ॲड. रणजित चौधरी हे काम पाहत आहेत.

### आंबेगावची लेक दिपमाला काळे यांची पोलिस निरीक्षक म्हणून यशस्वी कारकीर्द सुरु

**सोलापूर, दि. ७ मार्च -**

अंगात जिद्द आणि कर्तव्याप्रती निष्ठा असेल तर यशाचे शिखर सहज सर करता येते, हे आंबेगाव तालुक्यातील पेठ येथील कन्या दिपमाला काळे यांनी सिद्ध करून दाखवले आहे. जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर, एका सामान्य कुटुंबातून येत पोलीस निरीक्षक पदापर्यंत पोहोचलेला त्यांचा प्रवास आजच्या तरुण मुलींसाठी प्रेरणादायी ठरत आहे. दिपमाला काळे यांची २०१० मध्ये (बॅच क्र. १०३) पोलीस उपनिरीक्षक (PSI) म्हणून महाराष्ट्र पोलीस दलात निवड झाली होती. तेव्हापासून त्यांनी मागे वळून पाहिले नाही. नुकतीच त्यांची राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, मुंबई येथे पोलीस निरीक्षक (झख) पदी पदोन्नती झाली असून, त्या तिथे अत्यंत समर्थपणे आपली सेवा बजावत आहेत. यापूर्वी त्यांनी



'राज्य गुन्हे अन्वेषण विभागात' सहाय्यक पोलीस निरीक्षक म्हणून मोलाची कामगिरी केली आहे. त्यांच्या कामाचा अनुभव दांडगा असून त्यांनी आतापर्यंत मुंबईतील महत्त्वाच्या पोलीस ठाण्यांमध्ये आपली छाप पाडली आहे. पोलीस दलातील नोकरी म्हणजे वेळेचे बंधन नसलेले अत्यंत आव्हानात्मक क्षेत्र. मात्र, दिपमाला काळे यांनी आपले घर आणि कर्तव्य यांचा समतोल उत्तमरीत्या राखला आहे. आपल्या या यशाचे श्रेय त्यांनी आपल्या कुटुंबाला दिले आहे. 'माझे आई-वडील, बहीण तसेच सासू-सासरे आणि पती शरद काळे यांच्या खंबीर पाठिंब्यामुळेच मी आज इथपर्यंत पोहोचू शकले. कुटुंबाच्या विश्वासामुळेच मी निर्भयपणे माझे कर्तव्य पार पाडू शकते,' असे भावोद्गार दिपमाला काळे यांनी काढले.

### रंगपंचमी सण शांततेत साजरा करा; पोलिस निरीक्षक विकास दिंडुरे

**माळशिरस, दि. ७ मार्च -**

नागरिकांनी रंगपंचमी सण शांततेत व आनंदात साजरा करावा कोणालाही जबरदस्तीने रंग लावू नये यासह नैसर्गिक रंग वापरावा असे आवाहन माळशिरस पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक विकास दिंडुरे यांनी केले . रंगपंचमी सण शांततेत व आनंदात साजरा करावा कोणालाही जबरदस्तीने रंग लावू नये., केमिकलयुक्त, हानिकारक किंवा कायमस्वरूपी रंगाचा वापर करू नये. नैसर्गिक रंगच वापरावेत. सार्वजनिक ठिकाणी धिंगाणा घालुन, रस्त्यावर पाणी किंवा रंग टाकून वाहतुकीस अडथळा निर्माण करू नये., मद्यपान करून वाहन चालवू नये. वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे. महिलांशी किंवा इतर नागरिकांची गैरवर्तन करू नये, तसेच छेडछाड किंवा गोंधळ घालू नये असे प्रकार आढळल्यास त्वरित पोलिसांना कळवावे., लहान मुले रंग खेळताना त्यांच्या सुरक्षिततेची पालकांनी काळजी घ्यावी. मोठ्या आवाजात डीजे किंवा ध्वनी प्रदूषण करणारी साधने वापरू नयेत. शासनाच्या नियमांचे पालन करावे. कोणताही वाद निर्माण झाल्यास स्वतःहून कायदा हातात न घेता त्वरित पोलिसांची संपर्क साधावा. ,कोणत्याही धर्माच्या प्रार्थना स्थळावर (मंदिर, मशीद, चर्च इत्यादी) रंग उधळणे किंवा त्या परिसरात गोंधळ घालू नये., संशयास्पद हालचाल किंवा अनुचित प्रकार दिसल्यास त्वरित जवळच्या पोलिसांना माहिती द्यावी , रंग खेळताना अंगावरील मौल्यवान दागिन्यांची किंवा खिशातील रोख रक्कमेची काळजी घ्यावी. असे आवाहन त्यांनी केले

## निधन वृत्त...

### सातव्वा अचलेरे



**सोलापूर, दि. ७ मार्च-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील शिंगडगाव येथील गुरुनाथ अचलेरे यांच्या मातोश्री कै. सातव्वा कलप्पा अचलेरे यांचे वृद्धापकाळाने वयाच्या ८३ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, सून, नातवंडे असा परिवार आहे.

### हरिकिसनदास गुल्लापल्ली



**सोलापूर, दि.७ मार्च-**

दत्त नगर येथील रहिवासी हरिकिसनदास अंबाजी गुल्लापल्ली यांचे अल्पशा आजाराने शनिवार, दि.७ मार्च २०२६ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ६१ वर्षांचे होते. रविवार, दि.८ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता त्यांच्या राहत्या घरापासून अंत्ययात्रा निघणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक बहीण असा परिवार आहे. ते एलआयसी एजंट होत. ते ज्योतिष अभ्यासकही होते.

# आचेगाव येथे भाजपाचा कृतज्ञता मेळावा उत्साहात

## दिवंगत जि.प.सदस्य लक्ष्मण गोतसूर्वे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**आचेगांव, दि.७ मार्च-**



जिल्हा परिषद व पंचायत समिति निवडणूकीत वळसंग गटात भाजपाला मोठे यश मिळाले. गटात रामप्पा चिवडशेट्टी तर वळसंग गणात बलवान गोतसुर्वे हे मोठया विक्रमी मताधिक्याने निवडून आले. यावेळी नूतन पंचायत समिती सदस्य बलवान गोतसुर्वे यांचे पिताश्री माजी जिल्हा परिषद सदस्य कै. लक्ष्मणराव गोतसुर्वे यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनाचे औचित्य साधून आचेगाव ग्रामस्थांच्या वतीने अक्कलकोट नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी व कार्यक्रमाचे अध्यक्ष भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष महेश बिराजदार यांच्या प्रमुख उपस्थितीत कृतज्ञता मेळावा घेण्यात आला. वळसंग गणातील सर्व गावातील भाजप प्रमुख पदाधिकारी व सहकारी यांचा कृतज्ञतापर सत्कार करण्यात आला.

गोतसुर्वे परिवाराच्या वतीने मोफत नेत्र तपासणी व सर्व रोग निदान शिबीर घेण्यात आले. आचेगांव ग्रामस्थ, ग्रामपंचायत अधिकारी रुक्मिणी कांबळे, पोलीस पाटील प्यारन मुल्ला, श्रीदेवी खोबण, महादेवी जळगोडर व वैद्यकीय अधिकारी डॉ. बी. एन. पाटील व त्यांचे सहकारी काशिनाथ गाडे, कटारे, श्रीमती संगीता खांडे, श्रीमती केत, रोहित देशपांडे, काशीनाथ हबू, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, समुदाय आरोग्य अधिकारी, आशा व गटप्रवर्तक यांचे सहकार्य लाभले. सिद्धेश्वर ब्लड बँक सोलापूरच्या सत्यम गायकवाड यांच्या वतीने रक्तदान शिबीर घेण्यात आले. त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कृतज्ञता मेळावा व राबवलेल्या सामाजिक उपक्रमाबद्दल आमदार सचिन कल्याणशेट्टी, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी व युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष महेश बिराजदार यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी जिल्हा परिषद सदस्या श्रुती भोरगुंडे, जिल्हा परिषद सदस्य नेताजी भाऊ खंडागळे, पंचायत समिती सदस्य पंचप्पा धनशेट्टी, पंचायत समिती सदस्य विजय राठोड, भंडारकवठे सरपंच भीमाशंकर बबलेश्वर, नटराज नरोळे, वळसंग सरपंच जगदीश अंटद, माजी सरपंच श्रीशैल दूधगी, जगनाथ गायकवाड, सरपंच विश्रांती पाटील, उपसरपंच रफिक मुल्ला, दत्तात्रय पाटील, माजी सरपंच रमेश क्षीरसागर, हारून बिराजदार, जयशंकर पाटील, शशिकला विधाते, हुसेन पटेल, तंटामुक्त अध्यक्ष पंडित गोतसुर्वे, आदींची प्रमुख उपस्थिती होती.

कै. लक्षणराव गोतसुर्वे यांच्या प्रतिमेचे पूजन अक्कलकोट नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले. आरोग्य शिबीर उदघाटन जिल्हा परिषद सदस्य रामप्पा चिवडशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक दत्तात्रय पाटील यांनी केले. अल्ताफ पटेल, महादेव होटकर, रामजी गायकवाड, लक्ष्मण हुल्ले, पंडित कोरे, सागर कोळी, विकास गोतसुर्वे, ऐश्वर्या वाघमारे-गोतसुर्वे आदींनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय मनोगतात महेश बिराजदार यांनी आचेगांवची एकता बलवान गोतसुर्वे यांची पक्षनिष्ठा, पक्षअभियान व सामाजिक उपक्रम आणि थेट जनसंपर्क या त्यांच्या जमेच्या बाजू पाहता बलवान गोतसुर्वे यांना उमेदवारी देण्यात सर्वांचे नेते आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना सोयीचे झाल्याची भावना व्यक्त केली. यावेळी मलकाप्पा कोडले, बसवराज मिरजे, परमेश्वर पाटील, दगडू मुगळे, पप्पू तेलंग, हणमंत जमादार, विशाल माने, श्री सिद्धू तिपरादी, मल्लू ढब्बे, कलय्या स्वामी, विरेश बागलकोटी, सिद्धू वाघमारे, शांतकुमार गायकवाड आदिसह वळसंग पंचायत समिती गणातील व परिसरातील भाजपाचे सर्व प्रमुख उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शावरसिद्ध पाटील, चंद्रकांत शिलेणी टेलर, सागर कोळी, भगवान गोतसुर्वे, पंडित गोतसुर्वे, महिबूब पटेल, सुरेश मोची, रायप्पा पुजारी, कुलदीप पाटील सर्व ग्रामपंचायत आजी माजी सदस्य पदाधिकारी व ग्रामस्थ आदीनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सागर कोळी यांनी केले.

## बार कौन्सिल सत्ताकेंद्री झाल्याने वकिलांच्या कल्याणाचा विचारच उरला नाही : ॲड.सरोदे

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ७ मार्च**



बार असोसिएशन वकीलकेंद्री न राहता सत्ताकेंद्री झालेली असल्याने वकिलांच्या कल्याणाचा विचार उरला नाही. वकिलांचे कल्याण हा एकतर्फी कार्यक्रम खरे तर बार कौन्सिलच्या कामाचा उद्देश असायला पाहिजे, परंतु वकिलांच्या कल्याणाबाबत संपूर्ण निष्क्रियता त्यांनी दाखविली आहे. त्यामुळे यावेळी जास्तीत जास्त नवीन वकील उमेदवारांना व वकील महिलांना बार कौन्सिलवर निवडून द्या, असे आवाहन जेष्ठ संविधानतज्ज्ञ ॲड. असीम सरोदे यांनी बार्शी बार असोसिएशनच्या वकिलांशी संवाद साधताना केले. यावेळी बार्शी बार असोसिएशनचे अध्यक्ष, जेष्ठ विधिज्ञ, सदस्य व पदाधिकारी वकील बांधव उपस्थित होते.

पारदर्शकतेची मागणी करणे, सत्तेला प्रश्न विचारणे आणि सत्तेचा खरा चेहरा असंवैधानिक आहे हे सोप्या भाषेत सांगितल्याने माझ्यावर बार कौन्सिलच्या मदतीने गैरवर्तन केल्याचा खोटा ठपका ठेऊन माझी वकिली सनद तीन महिन्यांसाठी निलंबित करण्याचा अनाकलनीय व बेकायदेशीर निर्णय बार कौन्सिलच्या काही सदस्य वकिलांनी घेतला. त्या वाईट प्रवृत्तींना नक्कीच विरोध केला पाहिजे.

कायदा राजकीय प्रेरणेने शस्त्र म्हणून वापरणारी प्रवृत्ती वकिली व्यवसायाची प्रतिष्ठा मलिन करीत आहे, असा घणाघात ॲड. असीम सरोदे यांनी केला. आपण सगळे वकील मिळून न्यायासाठी, न्यायाचा दर्जा टिकविण्यासाठी व वाढविण्यासाठी एकत्रित काम करीत राहू तरच न्यायव्यस्थेवरील सामान्य लोकांचा दर्जा कायम राहील, असा विश्वास ॲड. असीम सरोदे यांनी व्यक्त केला. वकिलांच्या अनेक प्रश्नांची उत्तरे सुद्धा त्यांनी दिली. सदरचा कार्यक्रम बार्शी बार असोसिएशनचे अध्यक्ष, जेष्ठ विधिज्ञ, सदस्य, पदाधिकारी वकील यांनी यशस्वी पार पाडला.

## पंढरपुरातील वाहतूक शाखेचे दोन पोलिस कर्मचारी निलंबित

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.७ मार्च-**




वाहन चालकाला मारहाण करुन त्याच्याकडून दोन हजार रुपये रोख तसेच त्या व्यतरिक्त नो एंट्रीमध्ये आला म्हणून दोन हजार रुपये चलन दंड म्हणून आकारणाऱ्या येथील वाहतूक शाखेच्या दोन पोलिस कर्मचाऱ्यांवर जिल्हा पोलिस प्रमुखांनी निलंबनाची कारवाई केल्याची माहिती येथील उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत डगळे यांनी दिली.

दरम्यान या संपुर्ण प्रकरणाची माहिती अशी की, मागील आठवड्यात गोपाळपूर नाक्याजवळ वाहतूक शाखेच्या दोन पोलिस कर्मचाऱ्यांनी वाहन चालकाकडून दोन हजार रुपये रोख व दोन हजार रुपये चलन नो एंट्रीमध्ये आला म्हणून घेतल्याचा प्रकार समोर आलेला होता. त्या नंतर संबंधित वाहन चालकाने आपला सहाचाकी ट्रक आडवा लावून रस्ता रोको आंदोलन केले.

या आंदोलनाच्या दरम्यान मोहोळचे आमदार राजू खरे अडकले. त्यावेळी हा सर्व प्रकार घडत होता; तसेच या वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांनी तेव्हा चालकाला मारहाण केली. हे सर्व सोशल मीडियावर व्हायरल झाले. दरम्यान याबाबत विधानसभेतही माढ्याचे आमदार आमदार अभिजीत पाटील व मोहोळचे आमदार राजू खरे यांनी आवाज उठवला. तात्काळ सभापतींनी चौकशीचे आदेश दिले. यामध्ये पोहेकाँ विजय कांबळे, पोना रविकांत वाघमारे यांना निलंबीत करण्यात आले आहे. पंढरपूर उपविभागीय अधिकारी सहाय्यक अधीक्षक प्रशांत डगळे यांनी याबाबत त्या वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांच्या निलंबनाचा प्रस्ताव जिल्हा पोलीस प्रमुखांकडे पाठवला होता. त्यानंतर जिल्हा पोलीस प्रमुखांनी वाहतूक शाखेच्या दोन पोलिस कर्मचाऱ्यांना निलंबित केल्याची माहिती येथील उपविभागीय पोलिस अधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक प्रशांत डगळे यांनी दिली.

## सरकारी कामात अडथळा व पोलिसांशी हुज्जत प्रकरणी आरोपीची निर्दोष मुक्तता

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि.८ मार्च-**

कुर्डूवाडी पोलीस स्टेशन अंतर्गत भारतीय दंड विधान संहिताचे कलम ३५३, ३२३,५०४,५०६ प्रमाणे आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल झाला होता. सदर प्रकरणातील आरोपी होंडा शाईन मोटारसायकल नं. एम. एच ४५ ए.सी./६३०१ वरुन ट्रिपल सीट येत असताना फिर्यादी पोलिसाने त्यांना थांबविले असता त्यांनी ट्रिपल सीटची पावती करण्यास नकार दिला.

आरेरावीची भाषा वापरुन मोटारसायकल पोलीस ठाणेस घेण्यास सांगितले असता ती पोलीस ठाणेस घेतली नाही व कायदेशीर सरकारी काम करीत असताना फिर्यादीचे कामात अडथळा करुन फिर्यादी पोलिसाशी हुज्जत घालून आरेरावीची भाषा वापरली आहे म्हणून यातील आरोपींनी भादंवि कलम ३५३,५०६,३४ मो.वा.का.क १२८/१७७ प्रमाणे गुन्हा केल्याचे तोहमत असे. प्रकरणी गुन्हा नोंद केला होता. सदर प्रकरणाची सुनावणी बार्शी येथील अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे समोर झाली. सदर प्रकरणी सरकार पक्षातर्फे साक्षीदार तपासण्यात आले. सरकार पक्षातर्फे तपासलेले साक्षीदार यांचा



पुरावा आरोपींना शिक्षा देण्यासाठी पुरेसा नाही व आरोपीविरुद्ध सबळ पुराव्याच्या अभाव असल्याबाबत युक्तिवाद ड. एस.एम. गुंड यांनी केला. सदर प्रकरणातील आरोपीच्या वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरुन सदर आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली. साक्षीदार व अनेक बाबींची पडताळणी करुन न्यायालयाने हा निर्णय दिला आहे. सदर प्रकरणी यात आरोपीच्यावतीने ड. एस.एम. गुंड व ड. व्ही.पी.जाधव, ड. आर.आर. घोडके ड. ए. एस. गुंड, ड. आर.के. ननवरे, ड. एस. एस. विधाते, यांनी काम पाहिले.

## महिलांनो जगण्याची कला आत्मसात करा : भरमशेट्टी

**जागतिक महिला दिनानिमित्त २७ महिलांचा सन्मान**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट,दि. ७ मार्च-**

माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात कौटुंबिक जीवनात अर्थकारणाला महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यासाठी महिलांनी व्यवसायाभिमुख शिक्षण घेऊन स्वावलंबी जीवन जगण्याची कला आत्मसात केली पाहिजे असे प्रतिपादन मलकप्पा भरमशेट्टी यांनी व्यक्त केले. महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक . मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय तसेच उच्च माध्यमिक विद्यालय आणि गिरीजामाता प्राथमिक मराठी विद्यालयाच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिला सन्मान कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

त्यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर प्राथमिकचे मुख्याध्यापक सुरेश आवटे, सेमी विभाग प्रमुख दिगंबर जगताप, ज्येष्ठ शिक्षक रवीकिरण दंतकाळे, कुमार जाधव उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाबाई यांच्या प्रतिमेस वंदन करण्यात आले. त्यानंतर बोलताना भरमशेट्टी म्हणाले की, शिवणकाम, ब्युटी पार्लर,मेहंदी, फॅशन डिझाइनिंग, बेकरी, संगणक प्रशिक्षण, डिजिटल मार्केटिंग अशा अनेक क्षेत्रांत महिलांना प्रशिक्षण घेऊन स्वतःचा व्यवसाय सुरू करता येतो. त्यासाठी सरकार आणि विविध संस्था कौशल्य विकासाचे कार्यक्रम राबवत आहेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निशिगंधा सोमेश्वर यांनी केले सूत्रसंचलन जेष्ठ शिक्षिका कल्पना स्वामी यांनी केले तर आभार प्रतिभा माने यांनी मानले कार्यक्रमास सलोनी शहा, शितल टिंगरे, विद्या बिराजदार, विजयालक्ष्मी वाले आदी महिला शिक्षिका उपस्थित होते

**संकुलातील २७ महिलांचा सन्मान**

पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलातील २७ महिला शिक्षकांचा संकुलाच्या वतीने शाल पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला..

# अर्थसंकल्पात पंढरपूर उड्डाणपूलासह रस्त्याला ५० कोटी १६ लाखांचा निधी

### उपमुख्यमंत्री शिंदे यांनी शब्द पाळला; संपर्कप्रमुख साठे यांच्या मागणीला यश

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.७ मार्च -**



तीर्थक्षेत्र पंढरपूर विकास आराखड्यामध्ये प्रबोधनकार ठाकरे चौक ते टाकळी चौक या रस्त्याचा समावेश करावा अशी मागणी आषाढी यात्रेदरम्यान महापूजेसाठी आलेले तात्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे शिवसेना सोलापूर लोकसभा संपर्कप्रमुख महेश साठे यांनी केली होती. त्यावेळी टाकळी येथे झालेल्या शिवसेनेच्या मेळाव्यात तात्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी टाकळीकरांना दिलेला शब्द पाळा असून अर्थसंकल्पात पंढरपूर विकास आराखड्याला गती देण्यात आली असून पंढरपूर ते टाकळी उड्डाणपूलसह रस्त्याला ५० कोटी १६ लाख रुपये निधीची तरतूद केल्याने शिवसेना संपर्कप्रमुख महेश साठे यांनी शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे आभार मानले.

याप्रसंगी बोलताना महेश साठे म्हणाले की, शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी इतिहासात प्रथमच टाकळी ग्रामपंचायतीला मोठा निधी दिला आहे. यामध्ये टाकळी पाणीपुरवठा योजना पूर्णत्वास आली असून, एक हजार बेडचे शासकीय रुग्णालय, टाकळी नगरपंचायत होण्याचा मार्ग लवकरच पूर्णत्वास येणार असल्याचे सांगितले. यावेळी महेश साठे यांनी शिवसेना कामातून उत्तर देते असे सांगत विरोधकांचा चांगलाच समाचार घेतला. याप्रसंगी टाकळी गावचे माजी सरपंच संजय साठे, रोहन बचुटे, बालाजी बागल, धनंजय पाटील, सारंग महामनी, पांडुरंग शिंदे, प्रदीप भोसले, इंगवले सर, मारुती माने, भारत म्हात्रे, निंबाळे, बापू डोंगरे, विशाल माने, दादा कदम, आकाश कदम, जयकुमार सपकाळ उपस्थित होते. दरम्यान अर्थसंकल्पात टाकळी उड्डाणपूल्यास रस्त्याला निधी देण्याची घोषणा झाल्यानंतर टाकळी ग्रामस्थांनी महेश साठे यांच्या निवासस्थानी एकत्र येऊन साठे यांचे आभार मानत पेढे वाटून जल्लोष साजरा केला.

**उपमुख्यमंत्री शिंदे कडून वेगळा पायंडा : साठे**

दक्षिण काशी पंढरी नगरीत श्री विठ्ठल रुक्मिणीमातेच्या दर्शनासाठी देशभरातील भाविक मोठ्या संख्येने दाखल होत असतात येणाऱ्या भाविकांना चांगल्या सोयी सुविधा मिळाव्यात यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी इतिहासात प्रथमच पंढरपूरच्या वारी अगोदर पाहणी दौरा करून भाविकांना सोयी सुविधा उपलब्ध करून देऊन एक वेगळा पायंडा घालून दिला आहे. राज्यातील पहिली शिवसेनेची ग्रामपंचायत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या टाकळी ग्रामपंचायतीला महेश साठे यांच्या माध्यमातून इतिहासात प्रथमच सर्वात मोठा निधी मिळाल्याने लवकरच गावचा कायापालट होणार असल्याने टाकळीकर नागरिकांकडून शिवसेनेचे आभार मानले जात आहे.

## तारापूरमध्ये १६ हजारांच्या अवैध दारुचा साठा जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.७ मार्च -**

पंढरपूर तालुका पोलिसांनी तारापूर सुस्ते रस्त्यावरील एका हॉटेलात कारवाई करीत १६ हजार रुपयांची देशी, विदेशी अवैध दारु जप्त केल्याची माहिती तालुका पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक टी.वाय.मुजावर यांनी दिली. या कारवाई संदर्भात माहिती देताना वरिष्ठ पोलिस निरीक्षक टी.वाय.मुजावर यांनी सांगितले की, पंढरपूर तालुका पोलीस ठाणे हद्दीतील आगामी रंगपंचमी या उत्सवाच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून पंढरपूर तालुका पोलीस ठाणे हद्दीतील मौजे तारापूर सुस्ते रोडवर हॉटेल रविराज या ठिकाणी पंढरपूर तालुका पोलिसांनी रेड करून एकूण १६ हजार रुपयांची देशी, विदेशी दारू तसेच बियर अशी अवैध दारू जप्त केली. दरम्यान या कारवाईत संबंधित हॉटेल मालकावर पंढरपूर तालुका पोलीस ठाणे येथे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

दरम्यान सदरची कारवाई येथील उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली, पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनची वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी. वाय.मुजावर, एपीआय शहाजी गोसावी, श्रीमती रेळेकर, पोलीस उपनिरीक्षक भारत भोसले, पोलीस हवालदार परशुराम शिंदे, ब्रह्मदेव काळे, संतोष चव्हाण, गावडे, संजय गुटाळ, सतीश चंदनशिवे यांच्या पथकाने केली.

















# गल्लीतल्या मुलीला दिल्लीपर्यंत नेण्याचं धाडस फक्त एकनाथ शिंदेंच करु शकतात

## प्रा.डॉ.खा.ज्योती वाघमारेंचे जगजीवनराम झोपडपट्टीत स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मार्च-**



शिवसेनेकडून प्रा.ज्योती वाघमारे यांना राज्यसभेची उमेदवारी देण्यात आली. राज्यसभा खासदार झाल्यानंतर प्रथमच सोलापुरात आलेल्या वाघमारे यांचे बाबू जगजीवनराम झोपडपट्टीत जल्लोषात स्वागत करण्यात आले. शिवसेनाप्रमुख (स्व.) बाळासाहेब ठाकरे हे महिला आघाडीला रणरागिणी म्हणायचे. शिवसैनिक हाच आमचा धर्म, हाच वारसा एकनाथ शिंदेंनी पुढे नेला आहे. गरीब मागासवर्गीय वस्तीत राहणाऱ्या मुलीला, गल्लीतल्या मुलीला दिल्लीपर्यंत नेण्याचं धाडस फक्त एकनाथ शिंदेंच करु शकतात. काही नेते पक्ष जणू आपला कुटुंब समजतात, असे खासदार ज्योती वाघमारे यांनी सांगितले.

आजोबांनी रस्त्यावर बसून चपला शिवल्या. वडिलांनी वेटर म्हणून काम केलं आणि आई गिरणी कामगार म्हणून परिस्थितीशी झगडत राहिली. मातीत मळलेल्या लोकांच्या जीवनात बदल घडवण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी मला राज्यसभेची उमेदवारी दिली. माझ्यासारख्या सर्वसामान्य महिलेला उमेदवारी देऊन शिवसेनेत जातीपतीला थारा नाही, हे शिंदे यांनी दाखवून दिले आहे, अशी भावना खासदार डॉ. ज्योती वाघमारे यांनी व्यक्त केली.

आयुष्यातील ३०-३५ वर्षे या झोपडपट्टीत गेली, याच झाडाखाली बसून १० वी ते पीएच.डी.चा अभ्यास केला. वडील नगरसेवक झाले तरी घरं मातीचं होतं. पण, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी एका झोपडपट्टीतील मुलीला राज्यसभेत काम करण्याची संधी दिली, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानते, असेही त्या म्हणाल्या.

### मायभुमीला नतमस्तक

सोलापूर ही माझी मायभूमी आहे, त्यामुळे माझ्या मायभूमीला नतमस्तक होण्यासाठी मी आलेय. सोलापूरकरांचे माझ्यावर अनंत उपकार आहेत, प्रत्येक भूमिकेत त्यांनी मला स्वीकारलेलं आहे. दिल्लीत गेल्यावरही मी सोलापूरला कधी विसरणार नाही, सोलापूरचा स्वाभिमान मी दिल्लीत मिरवेन, असे सांगायलाही त्या विसरल्या नाहीत.

### मी राज्यकन्या नाही

मी राजकन्या नाही, संघर्षकन्या आहे. गरिब आई-बापाची पोरगी आहे. माझा बाप मोठा नाही, मी बंगल्यात राहणारी नाही, माझं घरं फाटकं आहे. वस्तीतला लोकांच्या कष्टाची जाणीव मला आहे, प्रत्येक कष्टकऱ्याच्या प्रश्नाला मी दिल्ली दरबारी आवाज उठवेन, असेही त्यांनी स्पष्ट केले.



# उमाबाई श्राविका विद्यालयात महिला दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मार्च-**

श्राविका संस्था नगरस्थित उमाबाई श्राविका विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य सुकुमार मोहोळे हे होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रशालेच्या वरिष्ठ दीप्ती शहा, प्रशालेच्या ज्येष्ठ शिक्षिका व सांस्कृतिक विभागप्रमुख माधवी खोत यांची उपस्थिती होती.

प्रारंभी स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या, पहिल्या शिक्षिका, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व संस्थेच्या संस्थापिका पद्मश्री पंडिता सुमतीबाई शहा यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पांजली मान्यवरांच्या हस्ते अर्पण करुन कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविक प्राचार्य मोहोळे यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयातील सहशिक्षिका प्रतिभा कंगळे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन गणेश लेंगरे यांनी केले. आभार सोमनाथ राऊत यांनी मानले.






**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## औसा येथे १४ व १५ मार्च ला लातूर ग्रंथोत्सवाचे आयोजन : वंदना काटकर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०७ मार्च :** राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय मुंबई व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने औसा येथे दि. १४ व १५ मार्च २०२६ रोजी लातूर ग्रंथोत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्रीमती वंदना काटकर यांनी दिली.

लातूर ग्रंथोत्सव २०२६ च्या आयोजनाच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी जिल्हा ग्रंथालय कार्यालयात आयोजित ग्रंथालय पदाधिकारी ,कार्यकर्त्यांच्या बैठकीत काटकर बोलत होत्या. दोन दिवस चालणाऱ्या या ग्रंथोत्सवात वाचन संस्कृती वाढविण्याच्या अनुषंगाने विविध उपक्रम पार पडणार आहेत. यामध्ये ग्रंथदिंडी, कथाकथन, कवी संमेलन, उत्कृष्ट वाचक सत्कार, ग्रंथ प्रदर्शन, परिसंवाद अशा उपक्रमांचा समावेश आहे. ग्रंथोत्सवात ग्रंथ वितरक, प्रकाशकांसाठी ग्रंथविक्रीसाठी स्टॉलही उपलब्ध करुण देण्यात येणार आहेत. या ग्रंथोत्सवाच्या माध्यमातून वाचकांना दर्जेदार ग्रंथ उपलब्ध व्हावीत हाही यामागचा हेतू आहे. दोन दिवस चालणाऱ्या या ग्रंथोत्सवात लातूर जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक ग्रंथालयांचे पदाधिकारी, ग्रंथपाल, कर्मचाऱ्यांनी पूर्णवेळ उपस्थित राहणे अनिवार्य असल्याचे सांगून वंदना काटकर यांनी जिल्ह्यातील सर्व ग्रंथप्रेमी नागरिकांनीही या ग्रंथोत्सवात आपला सक्रिय सहभाग नोंदवून ग्रंथोत्सव यशस्वी करावा, असे आवाहन केले आहे. या बैठकीस जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रभाकर कापसे, ग्रंथालय निरीक्षक राजेंद्र कोरे, सुधीर आचार्य, हिरालाल पाटील यांच्यासह ग्रंथालय क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.



# विविध वृत्त...

## सहकार मंत्री नामदार पाटील यांच्याकडून रेड्डी परिवारांचे सांत्वन

**अहमदपूर :** येथील स्व. स्वातंत्र्य सैनिक तथा माजी आमदार निवृत्तीराव रेड्डी यांचे सुपुत्र, यशवंत विद्यालयाचे विज्ञान विषयाचे सेवानिवृत्त शिक्षक विजय निवृत्तीराव रेड्डी यांचे दि.६ रोजी शुक्रवारी सकाळी १० .३०वाजता राहत्या घरी वयाच्या ८२ व्या वर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.त्यांचा अंत्यविधी शनिवारी पार पडला. या अंत्यविधीस राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील हे उपस्थित होते. त्यांनी विजय रेड्डी यांच्या प्रति शोक भावना व्यक्त करत त्यांना आदरांजली वाहिली. तसेच त्यांनी वैभव रेड्डी परिवाराचे सांत्वन केले.

## जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाची वार्षिक सभासद नोंदणी अभियान सुरु

**लातूरः** लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाची सन २०२६ या वर्षासाठीची सभासद नोंदणी सुरु झाली आहे. लातूर जिल्ह्यातील सार्वजनिक शासनमान्य ग्रंथत्तलयांनी आपापल्या तालुक्यातील तालुका प्रतिनिधीकडे दि.२५ मार्च २०२६ रोजी पर्यंत संस्था व व्यक्ती सभासद नोंदणी उदगीर-सुर्यकांत शिरसे,राम मोतीपवळे,जळकोट-यशवंत कुलकर्णी, अशोक कारभारी,शिरुर अनंतपाळ-काशिनाथ बोडके, देवणी- अनिल पाटील,निलंगा-गुप्तलिंग स्वामी, औसा-प्रभाकर कापसे, लातूर-राम मेकले, हुतात्मा स्मारक, लातूर, चाकूर-हावगीराव बेरकीळे, तुकाराम सुगावकर, अहमदपूर-अशोक खोडवे, नंदकुमार घोगरे, रेणापूर- सिध्देश्वर उकिरडे, या तालुकाप्रतिनिधींकडे आपली वार्षिक ग्रंथालय सभासद नोंदणी वरील प्रमाणे करावी,असे आवाहन जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाच्यावतीने एका प्रसिध्दीपत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

## वाणिज्य शाखेमध्ये उपलब्ध करिअरच्या संधीचा लाभ घ्या

**औराद शहाजानी :** वाणिज्य विद्याशाखेतील विद्यार्थ्यांना सेवा क्षेत्रात करिअरच्या विविध संधी उपलब्ध असून विद्यार्थ्यांनी आपल्या दैनंदिन अध्ययनासोबतच तंत्रज्ञान व कला-कौशल्ये आत्मसात करावीत असे प्रतिपादन अजित कुलकर्णी (देशपांडे स्किल अकादमी, हुबळी, कर्नाटक) यांनी केले. येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयातील करिअर काउंन्सेलिंग व प्लेसमेंट सेल आणि वाणिज्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने वाणिज्य विद्याशाखेतील करिअर संधी, मार्गदर्शन व संवाद'' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.शंकर कल्याणे, वाणिज्य विभागप्रमुख डॉ.विनोद चिंते, करिअर काउंन्सेलिंग व प्लेसमेंट सेलचे समन्वयक डॉ.रितेश व्यास, डॉ.सत्यशीला जोंधळे, डॉ.सचिन हंचाटे आता उपस्थित होते. यावेळी कुलकर्णी यानी माहिती-तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता (ए.आय.), बँकिंग - फायनान्स इत्यादीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी मोबाईलचा सुयोग्य व मर्यादित वापर करून आपला अधिकाधिक वेळ हा वाचन, लेखन, चिंतन यामध्ये घालवावा. यापुढील काळात विद्यार्थ्यांना केवळ पदवी अथवा पदव्युत्तर पदवी संपादन करून रोजगार - स्वयंरोजगार मिळणार नसून यासाठी त्यांनी जागरूक राहून जिद्दीने, प्रामाणिक व सातत्यपूर्ण प्रयत्न करणे आवश्यक आहे असेही त्यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.रितेश व्यास यांनी केले. अतिथींचा परिचय डॉ.सत्यशीला जोंधळे यांनी करून दिला. प्रास्ताविक डॉ.विनोद चिंते यांनी केले. मारोती पवार यांच्यासह वाणिज्य व संगणकशास्त्र विभागातील विद्यार्थी उपस्थित होते.


# महिलांच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवणार तरी केव्हा.. ?

- महिला पदाधिकाऱ्यांचा कारभार आजही ‘पती’च पाहतात
- २१ व्या शतकातही महिलांना सोसावी लागतेय घुसमट.
- महिलांच्या आरक्षणाला दिली जातेय ‘कवडीमोल’ किंमत..!

**तभा वृत्तसेवा/श्रीधर स्वामी**

**लातूर, दि. ०७ मार्च :** स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी पन्नास टक्के आरक्षण देण्यात आलेले असले तरी बहुतांश ठिकाणी महिलांकडे असलेल्या संविधानिक पदाचा कारभार त्यांचे पतीच पाहताना दिसतात. जागतिक महिला दिन साजरा करत असतानाही हा विषय अत्यंत गंभीर आहे. त्यामुळे कितीही कर्तृत्व असले तरी महिलांना २१ व्या शतकातही मानसिक घुसमट सोसावी लागते. त्यामुळे वास्तवात महिलांच्या आरक्षणाला 'कवडीमोल ' किंमत दिली जात असल्याचे दुर्दैवाने नमूद करावेसे वाटते.

दरवर्षी ८ मार्च हा आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून विविध उपक्रमांनी साजरा केला जातो.आपल्याकडे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी ५० टक्के आरक्षण देण्यात आलेले आहे. त्यामुळे सरपंच पदापासून ते नगराध्यक्ष - महापौर पदावर आज महिला भगिनी विराजमान झालेल्या पाहायला मिळतात. खऱ्या अर्थाने हा महिलांच्या कर्तृत्वाचा सन्मानच म्हटला पाहिजे. पुरुष प्रधान संस्कृतीत महिलांना सातत्याने दुय्यम स्थान दिले जात असल्याचे पाहायला मिळते. आरक्षणामुळे महत्वाच्या पदावर महिलांची निवड होत असली तरी प्रत्यक्षात त्यांचा कारभार पती किंवा अन्य कोणी तरी पाहत असल्याचे चित्र बहुसंख्य ठिकाणी पाहायला मिळते.



निसर्गाने महिलांना पुरुषांपेक्षाही अधिक सहनशिलता, संयम दिलेला आहे. महिलांएवढी सहनशीलता आणि संयम जगातला कोणताही पुरुष बाळगू शकत नाहीत, हे वास्तव आहे. त्यामुळे अंगी कर्तृत्व, क्षमता असूनही सुशिक्षित महिलांना सातत्याने पुरुषी अहंकाराला बळी पडावे लागत असल्याचे पदोपदी पाहायला मिळते. याचेच मूर्तिमंत उदाहरण नुकतेच लातूरमध्ये सर्वांसमोर आले आहे. लातूरच्या नूतन महापौर पदावर जयश्री सोनकांबळे यांची निवड झाली आहे. महापौर पदाचा पदभार स्वीकारल्यापासून त्यांचे पती नेहमी सोबत असतात. कोणताही अधिकार नसताना ते सतत महापौरांसोबत असतात त्यामुळे महापौरांना अपात्र ठरविण्यात यावे,अशी मागणी मनपातील विरोधी पक्षाच्या सदस्यांनी मनपा आयुक्तांकडे केल्याचे सर्वज्ञात आहे. असा प्रकार केवळ लातूरातच हडतोय असे नाही. राज्यात बहुतांश महिला पदाधिकारी असणाऱ्या ठिकाणी हे सर्रास घडत असल्याचे दिसून येते.

संविधानाने महिलांना काही अधिकार प्रदान केले असले तरी त्याचा वापर आजही महिला भगिनींना खुल्या दिलाने करता येत नाही. आज महिलांनी सर्वच क्षेत्र पादाक्रांत केली आहेत. पुरुषांच्या तुलनेत महिला काकणभर सरसच असतात, असे म्हणणेही धाडसाचे ठरणार नाही. मात्र, पुरुष आपण कुठेतरी महिलांपेक्षा कमी पडू शकतो हे मान्य करताना दिसत नाहीत, हेही वास्तव आहे. स्वतःची चूक कबूल करण्यात कोणताही कमीपणा नसतो, असे म्हटले जाते. परंतु या मुद्द्याकडे गांभीर्याने पहिले जाताना दिसत नाही. खऱ्या अर्थाने जागतिक महिला दिन साजरा करायचा असेल तर कर्तृत्ववान महिलांच्या कर्तृत्वावर डोळे झाकून विश्र्वास ठेवलाच पाहिजे. एखाद्या ठिकाणी महिला कमी पडत असेल तर त्यांना तेवढ्यापुरते मार्गदर्शन करण्याची तयारी पुरुष मंडळींनी ठेवली पाहिजे. असे झाले तर स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिला पदाधिकारी आपल्या पदाचा वापर व्यवस्थितरीत्या करू शकतील आणि महिलांचे आरक्षण वास्तवात येण्यास मौलिक मदत होईल. पाहू या, याची सुरुवात कधीपासून होतेय ते.

## शैक्षणिक पंढरीचे जनक काळाच्या पडद्याआड : डॉ. संजय जमदाडे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०७ मार्च :** लातूरचे वैभव व शैक्षणिक पंढरीचे जनक प्राचार्य डॉ. जे. एम. वाघमारे सर यांच्या निधनाने लातूरकरांचे व साहित्य क्षेत्राचे अतोनात नुकसान झाले आहे असे मत डॉ. संजय जमदाडे यांनी व्यक्त केले. नाना नानी वाकर्स ग्रुप च्या वतीने वाहण्यात आलेल्या श्रद्धांजली कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी डॉ. संजय जमदाडे यांनी प्राचार्य डॉ. जे.एम. वाघमारे सर यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणारी एक कविता सादर केली. तसेच विधीज्ञ श्री शिरीष दहिवाल यांनी सरांच्या काही आठवणींना उजाळा दिला .पारस सेठ चापसी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी बापू कुंभार, महेश बावगे, नंदकुमार बनाळे, महेश खेकडे, विजय वारद, विकास सावळसुरे, निळकंठ स्वामी, हुसेन शेख, दत्तात्रय गायकवाड,उमाकांत बट्टेवार, अजय घाळे, निलेश शिंदे, विलास भूमकर, अभिजीत शिरसाट, अशोक कांबळे, राजू जाधव आदी उपस्थित होते.



## चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेजचे ‘टेक्स्टबुक ऑफ सोशल अँड प्रिव्हेंटिव्ह फार्मसी’ पुस्तकाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०७ मार्च :** चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज (डिग्री), लातूर येथील ‘‘टेक्स्टबुक ऑफ सोशल अँड प्रिव्हेंटिव्ह फार्मसी’’ या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. हे पुस्तक इंगोले पब्लिकेशन यांच्या मार्फत प्रकाशित करण्यात आले आहे.

फार्मसी अभ्यासक्रमातील सोशल अँड प्रिव्हेंटिव्ह फार्मसी हा विषय सार्वजनिक आरोग्य, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम, रोगप्रतिबंधक उपाययोजना, लसीकरण, महामारीशास्त्र, आरोग्य शिक्षण, पोषण, पर्यावरण व स्वच्छता, माता-बाल आरोग्य, लोकसंख्या नियंत्रण, औषधांचा तर्कसंगत वापर, फार्माकोव्हिजिलन्स, तसेच शासनाच्या विविध आरोग्य योजनांबाबत सखोल माहिती देणारा आहे. प्रस्तुत पुस्तकात या सर्व घटकांचे सुलभ, समजण्यास सोपे आणि परीक्षाभिमुख स्वरूपात विस्तृत विवेचन करण्यात आले आहे.

पुस्तकात अद्ययावत आकडेवारी, तक्ते, आलेख, महत्त्वाचे मुद्दे, संभाव्य प्रश्नोत्तरे, एकाधिक निवड प्रश्न, तसेच अभ्यासासाठी उपयुक्त अशा टिप्स समाविष्ट करण्यात आल्या आहेत. त्यामुळे हे पुस्तक केवळ परीक्षा तयारीसाठीच नव्हे तर फार्मसी स्पर्धा परीक्षा व व्यावसायिक प्रात्यक्षिक ज्ञानासाठीही उपयुक्त ठरणार आहे. फार्मसी विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करून त्यांना आरोग्य व्यवस्थेतील जबाबदार घटक म्हणून सक्षम बनविण्याचा हेतू या पुस्तकामागे आहे.

या पुस्तकाचे लेखक प्रा. महेश मानके, डॉ. पद्मजा गिराम, डॉ. ओमप्रकाश भुसनुरे, डॉ. शशिकांत ढवळे व डॉ. सिध्देश्वर पाटील हे असून त्यांनी आपल्या शैक्षणिक व अध्यापन अनुभवाच्या आधारे विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार पुस्तक उपलब्ध करून दिला आहे.

## गंजगोलाईत अतिक्रमण हटाव मोहीम; मनपा व पोलिसांची संयुक्त कारवाई, सहा हातगाडे जप्त

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०७ मार्च :** शहरातील गंजगोलाईत लातूर शहर महानगरपालिका व पोलिसांच्या वतीने संयुक्तपणे अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात आली.यात ६ हातगाडे व वजन काटे जप्त करण्यात आले.

गंजगोलाई ही लातूरची प्रमुख बाजारपेठ आहे.विशेष म्हणजे या परिसरातून असंख्य रस्ते जात असल्याने वाहतूकही सुरू असते. सध्या रमजान व गुढीपाडवा यासारखे मोठे सण तोंडावर आलेले असल्याने बाजारपेठेत वर्दळ आहे. अतिक्रमणे वाढल्याने वाहतुकीला अडथळे निर्माण होत होते. याशिवाय खरेदीसाठी बाजारपेठेत येणाऱ्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. यामुळे मनपाच्या वतीने अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात येत आहे.



गुरुवारी मनपा व पोलिसांच्या वतीने संयुक्त कारवाई करण्यात आली. असंख्य फेरीवाल्यांनी रस्ते व्यापल्याने त्यांना हटविण्यात आले. वारंवार सूचना करूनही हातगाडे हटत नसल्याने ६ हातगाडे व वजन काटे पोलिस व मनपाच्या पथकाने जप्त केले.

या कारवाईत गांधी चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुनिल रेजितवाड, वाहतूक पोलीस निरीक्षक विठ्ठल दराडे,उपनिरीक्षक बाबू गीते, माधव केंद्रे मनपाचे क्षेत्रीय अधिकारी समाधान सूर्यवंशी, मुख्य स्वच्छता निरीक्षक शिवराज शिंदे, अतिक्रमण विभाग प्रमुख संतोष रणदिवे, सी झोनचे सर्व स्वच्छता निरीक्षक, यांच्यासह मनपा व पोलीस कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

व्यावसायिकांनी रस्त्यावर अतिक्रमणे करू नयेत.रहदारीस अडथळा होईल अशा ठिकाणी हातगाडे उभे करू नयेत. खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांना त्रास होईल अशा पद्धतीने हातगाडे उभी करू नयेत. महानगरपालिकेच्या वतीने अतिक्रमण हटाव मोहीम यापुढेही सुरू राहणार आहे.अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आल्यास दंडात्मक व जप्तीची कारवाई करण्यात येईल,असा इशारा मनपाच्या वतीने देण्यात आला आहे.

# स्वकर्तृत्वावर आणि अपार मेहनतीच्या बळावर यशस्वी झालेली लातूरची कन्या : डॉ. अक्षया जैन

**महिला दिन विशेष...**

**सोमेश श्रीधर स्वामी**

लातूरची भूमी खरोखर सोन्याची भूमी असल्याचे अनेक बाबींनी स्पष्ट झाले आहे. राजकीय, औद्योगिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, वैद्यकीय अशा विविध क्षेत्रात लातूरच्या मंडळींनी आपले नेतृत्व आणि कर्तृत्व सिद्ध केले आहे. त्यातच आता आणखी एका तेजस्वी व्यक्तिमत्वाची भर पडली आहे. सौंदर्य आणि केसांच्या उपचारात अक्षरशः आंतरराष्ट्रीय पातळीवरील अत्युच्च दर्जाची सेवा देणाऱ्या डॉ. अक्षया जैन, असे यशस्वी उद्योजिका कम वैद्यकीय व्यावसायिकांचे नाव आहे.

डॉ.अक्षया जैन यांचा जन्म लातूर शहरात झाला असून त्यांच्या मातोश्री सौ. अमृता नितीनचंद्र कंगळे या लातुरातील ख्यातनाम सौंदर्यतज्ञ आहेत. लातूरच्या औसा रोडवरील 'अमृताज ब्युटी क्लिनिक'च्या संचालिका म्हणूनही त्यांची विशेष ओळख राहिली आहे. डॉ.अक्षया जैन यांचे पिताश्री नितिनचंद्र कंगळे यांनी पाटबंधारे विभागात उप कार्यकारी अभियंता म्हणूनही उत्कृष्ट कार्य केले आहे. घरातील वातावरण संस्कृती संवर्धनात्मक असल्याने डॉ. अक्षया जैन यांना अगदी लहानपणापासूनच संस्कृती सोबतच सौंदर्य क्षेत्राबद्दलचे ज्ञान मिळत गेले. जे जे नवीन आहे, त्यातल्या त्यात आजच्या काळाला अनुसरून सौंदर्य आणि केसांच्या आरोग्यासंदर्भात उच्च स्तरीय उपचाराचे प्रशिक्षण त्यांनी संपादन केले आहे.



पुण्यातील प्रथितयश भागात त्यांचे स्वतःचे अद्यावत ,सर्वसोयी सुविधांनी परिपूर्ण क्लिनिक आहे. आपल्या क्लिनिकच्या माध्यमातून त्या मागच्या अनेक वर्षांपासून उत्कृष्ट सेवा देण्याचे काम करत आहेत. आपण ज्या क्षेत्रात कार्य करतो, ते कार्य त्या क्षेत्रातील अत्युच्च असले पाहिजे, या विचाराने प्रेरित होऊन डॉ. अक्षया जैन आपल्या आरोग्यसेवेचा उपक्रम यशस्वीपणे चालविण्याचे काम करत आहेत. आज जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रातील महिलांचा यथायोग्य सन्मान करण्याचे काम विविध पातळीवर केले जात आहे. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून लातूरच्या या कन्येने स्वकर्तृत्वावर पुण्यासारख्या महानगरात आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे, ही बाब तमाम लातूरकरांसाठी निश्चितच अभिमानास्पद आहे. डॉ.अक्षया जैन यांच्या या यशामागे अर्थातच त्यांचे आई वडील नितिनचंद्र कंगळे - सौ. अमृता कंगळे यांचा सिंहाचा वाटा आहे. कोणत्याही मातापित्याला आपल्या कांहीच अभिमान वाटावा असेच कार्य डॉ. अक्षया जैन यांच्याकडून सातत्याने होत आहे.

कोणत्याही व्यक्तीने आपल्या जीवनात एक उच्च ध्येय घेऊन त्या ध्येयाच्या परिपूर्तीसाठी सर्वतोपरी कष्ट, मेहनत करण्याची तयारी दर्शविल्यास यश त्याच्या पायाशी लोळण घेते,असे म्हटले जाते. डॉ.अक्षया जैन यांच्या एकंदर प्रगतीवरून त्याची सत्यता पटते. उत्कृष्ट वैद्यकीय व्यावसायिक म्हणून तर आज त्यांचे सर्वत्र नाव झालेलेच आहे. त्यांच्याकडे उपचार घेणाऱ्यांची यादीही खूप मोठी आहे. हिंदी - मराठी अभिनय विश्र्वातील अनेक दिग्गज कलाकारही त्यांच्याकडे नियमित उपचार घेतात. त्यामुळे विविध क्षेत्रातील दिग्गजांशी डॉ. अक्षया जैन यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे, निकटचे संबंध आहेत, हे पाहून प्रत्येक लातूरवासियांचे मन अभिमानाने भरून आल्याशिवाय राहणार नाही. आपल्या लातूरच्या भूमीत जन्मलेली एक कन्या आपले एवढे मोठे अस्तित्व, साम्राज्य निर्माण करू शकली यातच सर्व काही आले, असे म्हटल्यास ते फारसे अतिशयोक्तीचे होणार नाही.

स्किनटिलेटिंग क्लिनिक्स, क्रोमोकोस्मो इन्स्टिट्यूट ऑफ एस्थेटिक्स , ट्रायकॉलॉजी अँड न्यूट्रिशन ( सीआयएटीएन )पुणे च्या संस्थापक डॉ. अक्षया जैन यांना नुकतेच ' एस्थेटिक मेडिसीन आणि कौशल्य विकास क्षेत्रातील लीडर ' हा पुरस्काराने देऊन केंद्रीय रस्ते व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते गौरविण्यात आले आहे. डॉ. अक्षया जैन यांनी मेडिकल ट्रायकॉलॉजी, क्लिनिकल कॉस्मेटॉलॉजीमध्ये पदव्युत्तर डिप्लोमा प्राप्त केला आहे. तर पॅरिसमधून परमनंट मेक अप चा डिप्लोमा मिळवला आहे. स्तनाच्या कर्करोगासाठी एरोला पिग्मेंटेशनमध्ये मास्टर्स डिग्री संपादन केली आहे. तसेच हॉलंडमधून चट्टे आणि केसांच्या रेषांच्या रंगद्रव्यात मास्टर्स डिग्री मिळवली आहे. सीआयएटीएन ही स्किल इंडिया, कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयांतर्गत नोंदणीकृत असलेली संस्था आहे. या संस्थेअंतर्गत एस्थेटिक मेडिसीन , ट्रायकॉलॉजी आणि क्लिनिकल न्यूट्रिशन विषयातील प्रमाणित अभ्यासक्रम राबविण्यात येतात. त्याचा उपयोग उत्कृष्ट करिअरसाठीही होतो, असे डॉ. अक्षया जैन यांनी सांगितले. त्यांना आजपर्यंत अशा प्रकारचे अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. आपले कार्य केवळ पुरस्कारांवरच अवलंबून नसून आपण भविष्यातही आपल्या कार्याची व्याप्ती वाढविण्यासाठी प्रयत्नशील असल्याच्या भावना डॉ. अक्षया जैन यांनी व्यक्त केल्या आहेत.

हा कोर्स डॉक्टर्स आणि बारावी पासच्या पुढील महिला - पुरुष दोघेही करु शकतात. हा शासनमान्य कोर्स असल्याने स्वतंत्र व्यवसायालाही वाव आहे. ही इंडस्ट्री जगभरातून पुढे येत आहे. आजच्या एआय च्या युगात अनेक व्यवसाय - उद्योगात बेरोजगारी येण्याची शक्यता आहे.अशावेळी या क्षेत्रात स्थिरता राहणार असल्याने इकडे इच्छुकांची कल वाढावा यासाठी आपण प्रयत्न करत असल्याचेही डॉ. जैन यांनी नमूद केले. सीआयएटीएन च्या संस्थापक - मुख्य कार्यकारी अधिकारी असलेल्या डॉ. अक्षया जैन यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल कॉर्पोरेट सोशल फोकस या मॅगझीननेही घेऊन त्यांच्या कार्याचा सन्मान केला आहे. मागच्या १२ वर्षांपासून त्या कॉस्मेटिक्स आणि एस्थेटिक मेडिसिनमध्ये प्रभावी कार्य करत आहेत.

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून लातूरच्या या भूमीकन्येला खूप खूप शुभेच्छा..

## संक्षिप्त...

### पंचकुंड महादेव मंदिर व पाच समाजाच्या स्मशान भूमी रस्त्याची मागणी पुर्ण



**पानगाव :** पानगाव येथील पंचकुंड महादेव मंदिर व पाच स्मशानभूमी रस्त्याची मागणी पुर्ण झाली आहे .लातूर ग्रामीणचे आमदार रमेश आप्पा कराड यांनी रेनापुर येथील जनता दरबारात तीन ते चार महिन्यात हा प्रश्न निकाली लावू हा शब्द दिला होता त्यानंतर आज मंडळ अधिकारी तिडके तलाठी, सारोळे व संबंधित शेतकरी सत्यवान भंडारे या सर्वांच्या एकमताने हा विषय निकाली निघाला असून आज पंचकुंड महादेव मंदिर ट्रस्ट व पाच स्मशानभूमीच्या समाजाच्या वतीने या रस्त्याच्या कामाला लागली सुरुवात झाली आहे. लातूर ग्रामीण आमदार रमेश आप्पा कराड मंदिर ट्रस्ट अधिकारी वर्ग व संबंधित शेतकऱ्याचे सर्वजण आभार व्यक्त करीत आहे.

### अर्थसंकल्प महाराष्ट्राला नवी दिशा देणारा- सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील

**चाकूर :** आजचा अर्थसंकल्प हा महाराष्ट्राला नवी दिशा देणार असून, या अर्थसंकल्पातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या सर्व घटकाला न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. शेतकऱ्यांची कर्जमाफी सुद्धा करण्याचा निर्णय केला असून या निर्णयामुळे अनेकांना दिलासा मिळणार आहे. २०४७ पर्यंत भारत निश्र्चित एक विकसित राष्ट्र म्हणून उदयास येईल तेव्हा महाराष्ट्राची भूमिका ही महत्त्वाची असणार आहे. हीच या अर्थसंकल्पातून अध-ोरेखित झाले आहे. मुख्यमंत्री तथा वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर्षीचा अर्थ संकल्प हा आमचे नेते स्वर्गीय अजित पवार यांना समर्पित केला. त्याचबरोबर दादांचे भव्य स्मारक व अजितदादांच्या नावाच्या अनेक योजना त्यांनी अर्थसंकल्पात घोषित केल्या त्याबद्दल मी या राज्याचा मंत्री म्हणून त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो..



### महादेव मंदिर यात्रा महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी आश्विन लांडगे तर सचिव पदी सूरज अंबुलगे

**देवणी :** येथील श्री ग्रमदैवत महादेव मंदिर यात्रा महोत्सव समिती २०२६ ची बैठक शुक्रवारी ( दि.६) सकाळी महादेव मंदिर येथे संपन्न झाली. या बैठकीमध्ये यात्रा विषयी अनेक धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. यानंतर यात्रा महोत्सव पदाधिकार्यांची निवड करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी अश्र्विन लांडगे तर सचिव पदी सूरज अंबुलगे यांची एकमताने निवड करण्यात आली. उर्वरित कार्यकारणी मध्ये उपाध्यक्ष अँड. उदयकुमार बिराजद-ार, ईश्वर पाटील सहसचिव महेश धनुरे, मयूर पटणे, कोषाध्यक्ष काशिनाथ भद्रशेट्टे तर कार्यकारणी सदस्य म्हणून अँड. बस्वराज ईश्वरशेट्टे,श्रीमती मनोरमा बोंद्रे, बस्वर-ाज बिराजदार, गुंडप्पा कंटे, सोमनाथ कुडते, निलेश लांडगे, अभिजीत सौंदाळे, अविनाश धनूरे, माणिक मानकरी, रोहित पडसलगे, शशिकांत कप्से, महंतेश हरनाळे, सतीश वासगे, कैलास पडसलगे, कैलास जीवने, विजयकुमार लुल्ले, गणेश बोंद्रे, उद्धव मल्लेशे, स्वप्निल भद्रशेट्टे, मनोज बुदे, दीपक मळभगे, अटलविश्वास धनूरे, रमेश घटबाळे तर मार्गदर्शक म्हणून वैजनाथ अष्टुरे, शिवराज बिराजदार, पृथ्वीराज पाटील -जिवणे आदींची निवड करण्यात आली.





### वडमुरंबी येथील शांताबाई बिजापुरे यांचे निधन

**देवणी :** तालुक्यातील वडमुरंबी येथील कै. शांताबाई यलाप्पा बिजापूरे यांचे दिनांक ०६/०३/२०२६ रोजी रात्री १०.०० वाजता दुःखद निधन झाले . त्या रास्त भाव दुकानदार चेअरमन यलाप्पा दुर्गप्पा बिजापूरे यांच्या धर्मपत्नी तसेच तहसील कार्यालयातील कर्मचारी व्यंकटेश बिजापूरे यांच्या मातोश्री होत.

त्यांच्या निधनामुळे कुटुंबीय, नातेवाईक व मित्रपरिवारामध्ये शोककळा पसरली आहे. त्या स्वभावाने प्रेमळ, साध्या व सर्वांशी आपुलकीने वागणाऱ्या होत्या. त्यांच्या जाण्याने कुटुंबियांची मोठी हानी झाली आहे.

त्यांचा अंत्यविधी दिनांक ०७/०३/२०२६ रोजी दुपारी १२..३० वाजता मौजे वडमुरंबी, तालुका देवणी येथील त्यांच्या शेतात करण्यात आला. त्यांच्या पश्र्चात पती, एक मुलगा, एक मुलगी, सुन, नात-वंड असा परिवार आहे.



# मुलीने शिक्षण, आहार, आरोग्य व स्वसंरक्षणाची काळजी घ्यावी: डॉ. पूजा बिडवे

**तभा वृत्तसेवा**

**शिरूर अनंतपाळ, दि. ०७ मार्च :** मुलीने शिक्षण आरोग्य व स्वसंरक्षणाची काळजी घेणे आवश्यक आहे . कारण शिक्षण घेतले तर आपण सक्षम होऊन आर्थिक स्वंय पूर्ण व्हाल, तर प्रोटीन युक्त आहारा बरोबरच भाजी पाला बिटाचा आहारात उपयोग करावा तरच आ-पले आरोग्य चांगले राहून निरोगी राहण्यास मदत होते . आजच्या डिजीटल युगात मुलीनी स्व संरक्षण करण्यासाठी सक्षम निर्भिड राहिले पाहिजे असे मत वैधकीय आरोग्य अधिकारी डॉ पुजा बिडवे यांनी शहरातील शिवनेरी महाविद्यालयात महिला सक्षमीकरण विभाग व समाजशास्त्र विभागाच्या वतिने जागतीक महिला दिना निमित आयोजीत कार्यक्रमात त्या महाविद्यालयीन युवतीना मार्गदर्शन करताना म्हणाल्या.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.ए.बी. धालगडे होते तर यावेळी प्रमुख पाहुण्या डॉ. पुजा बिडवे, डॉ. ओमप्रकाश जाधव, प्रा. वर्षा खरोबे, प्रा. डॉ. जयश्री शिंदे, आयक्युसीचे समन्वयक डॉ. सतिष कुंडलवार,




सदस्य प्रा. डॉ.एम.डी. वाकडे यांची यावेळी प्रमुख उपस्थीती होती.

यावेळी जागतीक महिला दिना निमित विद्यार्थीनीना डॉ. ओमप्रकाश जाधव, समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. पांडूरंग मुठ्ठे यांनी मागदर्शन केले व शुभेच्छा दिल्या.

यावेळी अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ.ए.बी. धालगडे यांनी मानला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा वर्षा खरोबे मॅडम यांनी केले. तर सुत्रसंचालान कु. वाले हिने केले तर आभार कु. भिसे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या प्रारंभी क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करून महाविद्यालयातील सर्व महिलां प्राध्यापीका व कर्मचारी महिलांचा पुष्प गुच्छे देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक विद्यार्थी उपस्थीत होते हा कार्यक्रम यशस्वीते साठी विद्यार्थ्यानी परिश्रम घेतले.

## चाकूर पंचायत समीती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या गटनेते पदी गजानन होनराव यांची निवड



**तभा वृत्तसेवा**

**चाकूर, दि. ०७ मार्च :** चाप-ोली येथील नवनिर्वाचित पंचायत समिती सदस्य गजानन होनराव यांची चाकूर पंचायत समितीच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या गटनेती पदी सर्वानुमते निवड करण्यात आली असून सदरील निवडीचे पत्र जिल्हाधिकारी कार्यालयात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते तथा पंचायत समिती सदस्य सूरज पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत देण्यात आले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशचे शिवानंद हेंगणे, तालुकाध्यक्ष शिवाजीराव काळे, शिवाजी देशमुख, अनिलराव वाडकर, व्यंकट वंगे, सादिक शेख, संदीप शेटे, सचिन तोरे सह विविध मान्यवर उपस्थित होते.

माझ्यासारख्या पहिल्यांदा निवडून आलेल्या तरुण कार्यकर्त्यावर सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी गटनेते पदाची जबाबदारी दिली त्यांचा हा विश्र्वास सार्थ ठरवण्याचा मी प्रयत्न करणार आहे. सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील साहेब व सर्व पंचायत समिती सदस्य, सदस्या व पक्ष श्रेष्ठींची या नवीन जबाबदारी बद्दल मनापासून आभार व धन्यवाद

गजानन होनराव

नवनिर्वाचित गटनेते पंचायत समिती चाकूर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष

## कासार शिरसी येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**

**कासार शिरसी, दि. ०७ मार्च :** निलंगा तालुक्यातील कासार शिरसी येथे प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी छत्रपती शिवाजी महाराज यांची तिथीनुसार जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. शुक्रवार दिनांक ६ मार्च रोजी सकाळी छत्रपती शिवाजी महाराज चौक कासार शिरसी येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस दुग्धाभिषेक करून या जयंतीची सुरुवात करण्यात आली. दुग्धाभिषेक झाल्यानंतर शिवजयंती समितीच्या वतीने शहरातील काही गरीब महिलांना साड्या वाटप करण्यात आले. त्यानंतर सायंकाळी कासार शिरसी शहरातून छत्रपती शिवरायांच्या पालखीची व प्रतिमेची जयंती निमित्ताने भव्य मिरवूनक काढण्यात आली.

या मिरवणुकीत विविध अशा सुंदर देखाव्यांचे आयोजन करण्यात आले होते.यात मर्दानी खेळ, गोंधळी संभळ वादन, पारंपरिक हालगी वादन,दांडपट्टा, हनुमानाचा देखावा, शोभेच्या विद्युत छत्र्या व चिमुकल्या वारकऱ्यांचा टाळमृदंग वादन वाजवत छत्रपती शिवाजी महाराजांची भव्य मिरवणूक कासार शिरसी च्या मुख्य मार्गावरून शहरात काढण्यात आली. मिरवणूक चौकात आल्यानंतर चौकातील शिवरायांच्या प्रतिमेस विविध मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले व शिवरायांची आरती करण्यात आली. या वेळी कासार शिरसी व परिसरातील शिव प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## व्हि.डि.डी. व सनराईज इंग्लिश स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे



**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. ०७ मार्च :** व्ही.डी .डी नोबल पब्लिक स्कूल व सनराईज नोबेल इंग्लिश स्कूल, सारोळा रोड, लातूर येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्सा-हात साजरा करण्यात आला.

वार्षिक स्नेहसंमेलनाचे उदघाटन संस्थेच्या सचिव सौ. प्रतिभाताई धुमाळ व प्रा. गोमारे मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष पंडीतराव धुमाळ होते . प्रमुख पाहुणे म्हणून मधुकर तोडकर (अधिक्षक वेतन पथक प्राथमिक विभाग जि.प लातूर),दत्तात्रय भेटे (उपनिरीक्षक माध्यमिक विभाग जि प. लातूर) व शामसुंदर मलवाडे सर (चेअरमन हिंदिया गॅस ), समन्वयक अतुल शिंदे, मुख्याध्यापक अविनाश मलवाडे सर हे उपस्थित होते. यावेळी व्हि.डि. डी नोबल पब्लिक स्कूल व सनराईज नोबेल इंग्लिश स्कूल मधील विद्यार्थ्यांनी विविध कला गुणांचे सादरीकरण करून उपस्थित रसिक पालकांचे लक्ष वेधून घेतले. यावेळी पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुजाता मिरकले व राहूल भालेराव व आभार डॉ . गणेश मलवाडे सर यांनी मांडले. कार्यक्रम उत्कृष्ट सादरीकरण करण्यासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी खूप मेहनत घेतली या करिता मुख्याध्यापक मलवाडे अविनाश सर यांनी सर्वांचे विशेष आभार मानले. वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे थेट लाईव्ह सादरीकरण करण्यात आले.

## निलंगा शहरातील अवैध दारू विक्री बंद करा राष्ट्रवादी काँग्रेसच्या शहराध्यक्षाचे निवेदन

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. ०७ मार्च :** निलंगा शहरात मिलिंद नगर,अशोक नगर यासह आदी भागात सुरू अस-लेली बेकायदेशीर देशी दारू,हातभट्टी दारू, केमिकल मिश्रित शिंदी बंद करा अन्यथा उपोषण करू असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे शहराध्यक्ष धम्मानंद काळे यांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाला एका निवेदनाद्वारे दिला आहे.

शहरात स्थानिक पोलिस व उत्पादन शुल्क विभाच्या अशिर्वादाने शहरातील मिलिंद नगर,अशोक नगर, निलंगा शहरात,सुरू असले-ली बेकायदेशीर देशी दारू,हातभट्टी दारू, केमिकल मिश्रित शिंदी मोठ्या प्रमाणात अवैध पणे सुरू आहे. या भागामध्ये वैध परवाना नसताना बेकायदेशीररित्या दारू विक्री मोठ्या प्रमाणात होत आहे, दारू विक्री केली जात आहे. निलंगा शहरातील मिलिंद नगर सारख्या एका गल्लीमध्ये (१२)बारा लोक अवैध दारू विक्री करतात अशी प्राथमिक माहिती माझ्याकडे आहे.(मग निलंगा शहरात किती विकत असतील) दारूचे व्यसनामुळे कमी वयात मुली विधवा होण्याचे प्रमाण वाढलेला आहे व मुलांच्या डोक्यावरील वडिलांचे छत्र हरवल्यामुळे मुलं वाईट वळणाला लागलेले आहेत. मिलिंद नगर,अशोक नगर, वीर लहुजी साळवे नगर या ठिकाणची महिलांची आकडेवारी काढली बघितली तर तरुण वयात विधवा होण्याचे प्रमाण खूप जास्त झा-लेला आहे.मग निलंगा शहरांमध्ये किती वाईट परिस्थिती असेल याची कल्पना ही करवत नाही.आपलं याकडे दारूबंदी अधिकारी म्हणून पूर्ण दुर्लक्ष आहे. सदरच्या ठिकाणी दिवसा-रात्री बे रात्री दारू पिण्यासाठी लोकांची लहान-मोठे युवक वयस्क मंडळीची गर्दी असते.त्यामुळे मिलिंद नगर,अशोक नगर, निलंगा शहरांमध्ये सतत भांडणे, शिवीगाळ,मारामाऱ्या होत असून लहान मुले, मुली, महिला,ज्येष्ठ नागरिक या सर्वांना मानसिक व शारीरिक त्रास, सहन करावा लागत आहे.सदर बेकायदेशीर दारू विक्रीमुळे मिलिंद नगर,अशोक नगर,व शहरातील शांतता कायदा सुव्यवस्था धोक्यात आली आहे.तसेच अनेक लहान, मोठे,तरुण युवक व्यसनाधीन होत असून शैक्षणिक,सामाजिक वाता-वरण बिघडत आहे.या दोन नंबरच्या धंद्यातून अव्वाच्या सव्वा उत्पन्न मिळाल्यामुळे हे धंदे करणाऱ्याची निलंगा शहरांमध्ये मुजोरी वाढली आहे.याबाबत मी वेगवेगळ्या सामाजिक संघटना,राजकीय पक्ष यांनी तोंडी, लेखी, तक्रारी दिल्या असता कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. अधिकारी म्हणून याबद्दल संवेदनशील असणे गरजेचे आहे तशी संवेदनशीलता दिसून येत नाही. तरी आपण सदर बाब अत्यंत गंभीरतेने घेऊन तात्काळ चौकशी करून संबंधित बेकायदेशीर अवैध दारू अड्डा चालवणे,विक्री करणे बंद करण्यात यावे व दोषीवर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी ही नम्र विनंती.काहीही कार्यवाही नाही झाल्यात वरिष्ठांकडे तक्रार केली जाईल याची नोंद घ्यावी.आपण योग्य ती कार्यवाही कराल,अशी निलंगा शहरातील जनतेला व मला खात्री आहे. असे निवेदनात नमुद केले आहे.

## राजकारणातील नीतिमान नेतृत्व काळाच्या पडद्याआड – बसवराज पाटील नागराळकर

### उदयगिरीत कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे यांची श्रद्धांजली सभा संपन्न



**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. ०७ मार्च :** येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले. सभेची सुरुवात डॉ. वाघमारे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाली. यावेळी प्रा. प्रवीण जा-हुरे, प्रा. डॉ. बी. एस. भुक्तरे, प्रा. डॉ. जी. जी. जेवळीकर, प्रा. पी. व्ही. हुडगे, प्रा. ए. पी. मोरे, प्राचार्य डॉ. आर. के. मस्के, सचिव डॉ. रामप्रसाद लखोटीया यांनी आपल्या भावना व्यक्त करताना डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या साहित्यिक, शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, प्रशासकीय व वैचारिक कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. शिक्षण क्षेत्रातील त्यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व, विद्यार्थ्यांप्रती अस-लेली आत्मीयता आणि समाजाभिमुख कार्य यांची आठवण यावेळी काढण्यात आली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे अनेक विद्यार्थ्यांना प्रेरणा व दिशा मिळाल्याचे वक्त्यांनी नमूद केले. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर यांनी वाघमारे सरांच्या प्रेरणा देणाऱ्या स्वभावाविषयी आणि लेखन वैविध्याविषयी भावना व्यक्त केली. या शोकसभेस उपाध्यक्ष अॅड. प्रकाश तोंडारे, कोषाध्यक्ष महादेव नौबदे, अभियंता तोडकर, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथपाल डॉ.एल. बी. पेन्सलवार यांनी केले. शोकसभेच्या शेवटी दोन मिनिटे मौन पाळून डॉ. वाघमारे सरांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

# भाषा हा समाज जीवनाचा अविभाज्य भाग आहे: नीता मोरे

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. ०७ मार्च :** मराठी भाषेचे थोर साहित्यिक वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. या परंपरेनुसार यावर्षीही संत ज्ञानेश्र्वर माऊली प्राथमिक विद्यालय उदगीर शाळेतील विद्यार्थ्यांनी मराठी भाषा गौरव दिन मोठ्या आनंदाने साजरा केला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून साहित्यिका नीताताई मोरे उपस्थित होत्या. तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता जगताप, संस्थेचे अध्यक्ष गो-विंदराव निटूरे, कार्यक्रम प्रमुख श्याम कुलकर्णी सर, तसेच भागवत पेठे, सानिया वाडीवाले, ज्ञानेश्वर बिरादार आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजनाने व मराठी भाषेच्या गौरवपर गीतांनी करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी विविध मराठी साहित्यिक, कवी व लेखकांची माहिती प्रभावीपणे मांडली. मराठीतील विविध कविता, छोटेखानी भाषणे व सादरीकरणातून विद्यार्थ्यांनी आपल्या मातृभाषेबद्दलचा अभिमान व्यक्त केला.

प्रमुख पाहुण्या नीताताई मोरे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात मराठी भाषेचे ऐतिहासिक, साहित्यिक व जागतिक महत्त्व स्पष्ट केले. मराठी भाषा केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित नसून भारतासह जगभरात अनेक मराठी भाषिक मोठ्या संख्येने आहेत, असे त्यांनी सांगितले. मराठी भाषेची शब्दसंपदा, भावनिक ताकद व संस्कृतीशी अस-लेले नाते यावर त्यांनी विशेष भर दिला. मातृभाषेवर प्रेम केल्यास व्यक्तिमत्त्व घडते आणि संस्कारांची मजबूत पायाभरणी होते. सर्वांगसुंदर असणाऱ्या मराठी भाषेचे जतन व संवर्धन केले पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष गोविंदराव निटूरे यांनी मराठी भाषेच्या माध्यमातून शैक्षणिक, सामाजिक व व्यावसायिक विकास कसा साधता येतो याविषयी मार्गदर्शन केले. मराठी भाषेतून विचार मांडल्यास आत्मविश्र्वास वाढतो आणि समाजाशी दृढ नाते निर्माण होते, असे त्यांनी नमूद केले.

शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता जगताप यांनी मराठी भाषेची उपयुक्तता, तिची समृद्ध परंपरा व दैनंदिन जीवनातील महत्त्व विविध उदाहरणांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून ती आपल्या संस्कृतीची ओळख आहे,असे त्यांनी सांगितले.

या संपूर्ण कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेविषयी प्रेम, जिव्हाळा व अभिमान निर्माण झाला. संत ज्ञानेश्वर माऊली प्राथमिक विद्यामंदिर, उदगीर येथे मराठी दिन अत्यंत उत्साहात, शिस्तबद्ध व प्रेरणादायी वातावरणात साजरा झाला.



# महिला दिन : सशक्त स्त्रीचा उत्सव



मो. ९७६७०९९७११

**अनिल आगलावे**
जिल्हाप्रतिनिधी

**विपीन वीर**
उपसंपादक / मांडणी/सजावट

ती अंधारातला उजेड आहे,
ती संकटांतही बळकट आहे,
ती कोणत्याही रुपात असो,
तिच्या बळावरच जग उभं आहे,
ती घराचं घरपण आहे,
स्वप्नांची उभारणी आहे,आणि
प्रत्येक संकटाशी लढण्याचं
जिवंत उदाहरण आहे.

जागतिक महिला
दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...




सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

११ | रविवार, ८ मार्च २०२६ https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com सोलापूर तरुण भारत


# कर्तृत्व, धैर्य आणि नेतृत्व

महिला सशक्तीकरणाच्या दिशेने भारतात अनेक महिलांनी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. अशाच कर्तृत्ववान अधिकाऱ्यांपैकी एक म्हणजे धाराशिव जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक IPS रितू खोकर. आपल्या कर्तृत्व, धैर्य आणि कर्तव्यनिष्ठेच्या बळावर त्यांनी पोलीस प्रशासनात वेगळी ओळख निर्माण केली आहे.



रितू खोकर या मूळच्या पानिपत (हरियाणा) येथील आहेत. त्यांनी गणित विषयात एम.एस्सी. पर्यंत शिक्षण पूर्ण केले. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी भारतीय लोकसेवा आयोगाच्या (UPSC) स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली आणि विशेष म्हणजे पहिल्याच प्रयत्नात त्यांनी IPS केडर मिळवून मोठे यश संपादन केले.

महाराष्ट्र कॅडर मिळाल्यानंतर त्यांची पहिली नियुक्ती २०२१ साली अकोला येथे उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून झाली. या पदावर काम करताना त्यांनी कायदा व सुव्यवस्था राखणे, गुन्हेगारी नियंत्रण आणि जनतेशी संवाद यावर विशेष भर दिला. त्यानंतर सांगली येथे अप्पर पोलीस अधीक्षक म्हणून त्यांनी काम पाहिले.

सप्टेंबर २०२४ मध्ये त्यांची धाराशिव जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक पदावर नियुक्ती झाली. धाराशिव हा महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई श्री तुळजाभवानी मातेचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. आदिशक्तीच्या या भूमीत काम करण्याची संधी मिळणे ही मोठी जबाबदारी आणि अभिमानाची बाब असल्याचे त्या सांगतात.

जिल्हा पोलीस अधीक्षक म्हणून कार्यभार स्वीकारल्यानंतर त्यांना सर्वप्रथम राज्यातील सर्वात मोठ्या धार्मिक उत्सवांपैकी एक असलेल्या नवरात्र उत्सवाचा बंदोबस्त सांभाळावा लागला. लाखोंच्या संख्येने तुळजापूर येथे येणाऱ्या देवीभक्तांच्या सुरक्षेसाठी पोलीस प्रशासनाने काटेकोर नियोजन केले आणि हा उत्सव शांततेत पार पडला.

धाराशिव जिल्ह्यात आठ तालुके असून क्षेत्रफळ मर्यादित असले तरी कायदा व सुव्यवस्था राखणे, संवेदनशील परिस्थिती हाताळणे आणि नागरिकांची सुरक्षितता सुनिश्चित करणे ही मोठी जबाबदारी आहे. जिल्ह्यात अनेक वर्षांनंतर होणाऱ्या सार्वजनिक निवडणुका देखील पोलीस दलासाठी मोठे आव्हान होते. मात्र योग्य नियोजनामुळे या निवडणुका शांततेत पार पाडण्यात पोलीस प्रशासनाला यश आले.



**रितू खोकर**
जिल्हा पोलीस अधिक्षक, धाराशिव

नशामुक्त धाराशिव जिल्हा अभियान राबविण्यात येत असून मोठ्या प्रमाणावर अमली पदार्थ रेड मारून हस्तगत केले जात आहेत, सायबर गुन्हेगार आणि गन्हे यबाबत सतर्कता कठोर कारवाई, नॅशनल हायवे वरील दरोडे असो किंवा शहरी चोऱ्या याबाबत तात्काळ कारवाही करून महिलांना सुरक्षित वातावरण निर्मिती करण्यासाठी पोलीस प्रशासन काम करत आहे.

महिलांच्या सुरक्षेला प्राधान्य देत रितू खोकर यांनी धाराशिव जिल्ह्यात विशेष महिला पथके नियुक्त केली आहेत. शहरातील विविध ठिकाणी या पथकांमुळे महिलांना, युवतींना आणि विद्यार्थिनींना अधिक सुरक्षित वातावरण मिळावे यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

आजच्या तरुणाईने उपलब्ध असलेल्या सेवा सुविधांचा वापर करत संधींचा योग्य उपयोग करून स्वतःला सिद्ध करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. विविध स्पर्धा परीक्षा आणि करिअरच्या संधी आज उपलब्ध आहेत. प्रामाणिक प्रयत्न, कठोर परिश्रम आणि सातत्यपूर्ण अभ्यास यांच्या जोरावर कोणतीही उंची गाठता येते. भविष्यात जिल्ह्यातील तरुणाईसाठी स्पर्धा परीक्षा बाबत विशेष तज्ञाच्या साहाय्याने मार्गदर्शक उपक्रम राबवण्याचा संकल्प यावेळी व्यक्त केला.

महिला दिनाच्या निमित्ताने IPS रितू खोकर यांची ही प्रेरणादायी वाटचाल अनेक तरुणींना स्वप्ने पाहण्याची आणि ती पूर्ण करण्याची प्रेरणा देणारी आहे. त्यांच्या कर्तृत्वामुळे महिलांची ताकद, नेतृत्व आणि समाजातील योगदान पुन्हा एकदा अधोरेखित आहे.

# गगणभरारी...

## धाराशिव कन्या हवाई सुंदरी

धाराशिव जिल्ह्यातील एका तरुणीने आपल्या मेहनतीने आणि चिकाटीने हवाई क्षेत्रात नाव कमावले आहे. प्रियंका प्रभाकर गाडे, नगरपरिषद क्रमांक ११ प्राथमिक शिक्षण, छत्रपती शिवाजी माध्यमिक विद्यालय आणि श्रीपतराव भोसले हायस्कूलची माजी विद्यार्थी, यांनी आपल्या शालेय शिक्षणानंतर पुण्यात टुरिझम स्टडी डिप्लोमा पूर्ण करून हवाई क्षेत्रात पदार्पण केले. लग्नानंतर आता त्या प्रियंका चेतन राऊत या नावाने ओळखल्या जात आहेत आणि सध्या पुण्यात वास्तव्य करत आहेत.



प्रियंका यांनी स्पाइस जेट हवाई कंपनीत २०११ साली हवाई सुंदरी म्हणून कारकिर्दीची सुरुवात केली. तेराव्या वर्षी त्यांनी सीनियर केबिन क्रु इन्चार्ज म्हणून पदोन्नती मिळवली, ज्यामुळे धाराशिवसारख्या जिल्ह्यातील तरुण महिलांसाठी प्रेरणादायी उदाहरण ठरले आहे. प्रियंका यांच्या यशामागे त्यांच्या आई नायब तहसीलदार मनोरमा गाडे यांचा अमूल्य पाठिंबा आहे. पतीच्या निधनानंतर मनोरमा गाडे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात लिपिक म्हणून काम सुरू केले आणि नंतर नायब तहसीलदार पदावर पदोन्नती मिळवली. एका सिंगल मदर म्हणून त्यांनी आपल्या दोन्ही मुलींना उच्च शिक्षण दिले आणि स्वावलंबी बनवले.

प्रियंका म्हणतात, हवाई सुंदरी होण्याचे स्वप्न मार्गदर्शनाशिवाय पूर्ण करणे कठीण होते. माझ्या आईंनी मला प्रोत्साहन दिले, आर्थिक अडचणींचा सामना करतही मला पुढे जाण्यास मदत केली. आज मी जे काही आहे, त्यामागे त्यांच्या मार्गदर्शनाचे सर्वस्व आहे. जर स्वप्न पाहिले आणि त्यासाठी खऱ्या अर्थाने प्रयत्न केले, तर मराठी माध्यमातून शिक्षण घेतली तरी हवाई सुंदरी बनणे अशक्य नाही. माझ्या प्रवासात मला मार्गदर्शन आणि प्रोत्साहन देणारी माझी आई होती, ज्यामुळे मी यशस्वी होऊ शकलो. धाराशिवमध्ये हवाई क्षेत्र नविन असून मार्गदर्शनासाठी कुणी उपलब्ध नव्हते. तरीही, प्रियंका यांनी आपल्या चिकाटीने आणि प्रयत्नांनी या क्षेत्रात यश मिळवले आणि आता या यशाने इतर तरुणींना प्रेरणा मिळाली आहे. महिला दिनाच्या विशेष प्रसंगी प्रियंका चेतन राऊत यांनी धाराशिवमधील तरुणींना सांगितले की, स्वप्न पाहणे, मेहनत करणे आणि योग्य मार्गदर्शन घेणे प्रत्येक महिलेसाठी शक्य आहे. त्यांच्या प्रेरणादायक प्रवासामुळे अनेक तरुणींना आपले स्वप्न पूर्ण करण्याची हिम्मत मिळते.



**प्रियंका गाडे-राऊत**
हवाई सुंदरी....

धाराशिव जिल्ह्यातील महिला आणि तरुणी या यशावर अभिमान बाळगत आहेत आणि प्रियंका चेतन राऊत यांच्या कारकिर्दीला भविष्यकालीन मार्गदर्शनाचे उदाहरण मानत आहेत.

# बाल किर्तनकर




**ज्ञानेश्वरी पौळ**
बाल किर्तनकर

बाल कीर्तनकार ज्ञानेश्वरी एकनाथ पौळ आज महाराष्ट्रभर आपल्या प्रभावी कीर्तनातून भक्तिरसाची गोडी पसरवत आहे. निर्मळ आवाज, सहज कथनशैली आणि संत साहित्यावरील अभ्यास यामुळे तिच्या कीर्तनाला लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

अवघ्या सहा वर्षांच्या कोवळ्या वयात कीर्तनाच्या व्यासपीठावर उभी राहिलेली ज्ञानेश्वरी आज महाराष्ट्रातील ओळखली जाणारी बाल कीर्तनकार बनली आहे. वारकरी संप्रदायाच्या संस्कारात वाढलेल्या ज्ञानेश्वरीने भक्तीपर कीर्तनाची अनोखी छटा महाराष्ट्राला दाखवली आहे. अहिल्यानगर येथील जय मृदंग वारकरी संस्थेत घडलेली ही लहानगी आपल्या कीर्तनातून संत साहित्य, वारकरी परंपरा, संस्कारकथा आणि सध्याच्या सामाजिक प्रश्नांवरही प्रभावी भाष्य करते. एवढ्या लहान वयातही तिचा आवाज प्रगल्भ आणि तिचे चिंतन परिपक्व असल्याची प्रशंसा अनेक ठिकाणी होताना दिसते.

वारकरी परंपरा, संत साहित्य, समाजातील मूल्ये आणि संस्कार यांचा सुंदर संगम तिच्या सादरीकरणात पाहायला मिळतो. सध्या ज्ञानेश्वरीच्या कीर्तनाचे व्हिडिओ युट्युबवरही मोठ्या प्रमाणात लोकप्रिय होत असून गावोगावी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी तिच्या तारखा मिळवण्यासाठी आयोजकांना प्रयत्न करावे लागतात. वडील मृदंगाचार्य एकनाथ पौळ, आई क्रांती पौळ आणि मोठा भाऊ शिवम महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली गावखेड्यातील कीर्तनापासून राज्यभरातील धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांपर्यंत ज्ञानेश्वरीने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. आजच्या महिला दिनानिमित्त तुळजापूर तालुक्यातील आरळी बुद्रुक येथील ज्ञानेश्वरी एकनाथ पौळ ही केवळ एक बाल कीर्तनकार नाही, तर वारकरी परंपरेचे संस्कार आणि ग्रामीण कलेचा आणि उदयोन्मुख स्त्रीशक्तीचा अभिमान आहे. तिचा प्रवास हे दाखवून देतो की, प्रतिभेला गावाची किंवा वयाची मर्यादा नसते. जिद्द, संस्कार आणि कष्ट यांच्या जोरावर एक छोटी मुलगीही महाराष्ट्रभर प्रेरणा देऊ शकते.

आजच्या काळातही कीर्तनाचा उपयोग जनजागृतीसाठी केला जातो. शिक्षणाचे महत्त्व, व्यसनमुक्ती, स्वच्छता, पर्यावरण संरक्षण, स्त्री-पुरुष समानता अशा अनेक सामाजिक विषयांवर कीर्तनातून मार्गदर्शन केले जाते. कीर्तनकार सोप्या भाषेत कथा, विनोद आणि उदाहरणांच्या माध्यमातून लोकांपर्यंत संदेश पोहोचवतात. म्हणूनच महाराष्ट्रात कीर्तन ही केवळ धार्मिक परंपरा नसून भक्ती, संस्कार, समाजपरिवर्तन आणि जनजागृती यांचे प्रभावी माध्यम म्हणून कार्य करणारी महत्त्वाची सांस्कृतिक परंपरा आहे.



# साहित्यप्रेमी; उपक्रमशील शिक्षिका

आजच्या काळात शिक्षण, साहित्य आणि सामाजिक क्षेत्रात आपले वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या महिलांची संख्या वाढत आहे. अशाच प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणजे ज्योती राऊत कावरे.



धाराशिव जिल्ह्यातील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, वडगाव सिद्धेश्वर येथे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असलेल्या ज्योतीताई शिक्षण क्षेत्रात उपक्रमशील आणि विद्यार्थीकेंद्रित कामासाठी ओळखल्या जातात. गणित विषयात M.Sc., B.Ed., तसेच MA.. (शिक्षणशास्त्र) आणि MA.. (मराठी) अशी बहुआयामी शैक्षणिक पार्श्वभूमी असलेल्या ज्योतीताई शिक्षणासोबत साहित्य आणि सामाजिक कार्यातही सक्रिय आहेत. विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाची आवड, वाचन संस्कृती आणि सर्जनशीलता वाढावी यासाठी त्या सतत नवे उपक्रम राबवत असतात. साहित्य क्षेत्रातही त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. विविध दिवाळी अंक, दैनिके आणि स्मरणिकांमध्ये त्यांच्या लेखांचे प्रकाशन झाले आहे. सावित्रीच्या लेकी या प्रातिनिधिक काव्यसंग्रहात त्यांच्या कविता समाविष्ट असून ज्योतिर्मयी आणि चाफा हे त्यांचे काव्यलेखनही वाचकांपर्यंत पोहोचले आहे.



**ज्योती राऊत- कावरे**
मुख्याध्यापिका, जि.प. प्रशाला

तसेच अंकुर दिवाळी अंक आणि अंकुर दिनदर्शिका यासाठीही त्या नियमित लेखन करतात. शैक्षणिक व साहित्यिक उपक्रमांबरोबरच विविध साहित्य संमेलनांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे.

मराठवाडा स्त्री लेखिका विभागीय साहित्य संमेलन, अखिल भारतीय साहित्य संमेलन, तसेच राज्यस्तरीय साहित्य उत्सवांमध्ये त्या सातत्याने सहभागी होत असतात. अक्षरवेल महिला साहित्य मंडळ, धाराशिव येथे प्रसिद्धी प्रमुख म्हणूनही त्या कार्यरत आहेत. गेल्या १६ वर्षांपासून युवास्पंदन व मराठवाडा सामाजिक संस्था आयोजित राज्यस्तरीय शालेय वक्तृत्व स्पर्धेत स्पर्धा प्रमुख व परीक्षक म्हणून त्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना लोकमंगल जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार आणि पंचायत समिती धाराशिव आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाले आहेत. शिक्षण, साहित्य आणि समाजकार्य यांचा सुंदर संगम घडवणाऱ्या ज्योती राऊत-कावरे या खऱ्या अर्थाने आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी महिला आहेत.

विद्यार्थ्यांच्या घडणीत आणि समाजात सकारात्मक बदल घडवण्याच्या त्यांच्या प्रयत्नांमुळे त्या महिला सशक्तीकरणाचे जिवंत उदाहरण ठरतात. महिला दिनानिमित्त त्यांच्या कार्याला मन:पूर्वक सलाम!

# अबला ते सबला : ग्लोबल गोदावरी...

## ⏩ दुष्काळग्रस्त गावातून संयुक्त राष्ट्रांच्या व्यासपीठापर्यंतचा प्रेरणादायी प्रवास...



अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून उभं राहत हजारो महिलांच्या आयुष्यात बदल घडवणाऱ्या श्रीमती गोदावरीताई डांगे क्षीरसागर यांचा प्रवास आज महिला दिनानिमित्त विशेष चर्चेत आहे. ग्रामीण भागातील सातवी शिक्षण घेतलेल्या एका सर्वसामान्य महिलेपासून ते आंतरराष्ट्रीय स्तरावर सन्मानित नेत्या होण्यापर्यंतचा त्यांचा प्रवास स्त्रीशक्तीचं जिवंत उदाहरण ठरतो.

वयाच्या १५ व्या वर्षी विवाह, पदरी दोन लहान मुलं आणि अचानक पतीचा अपघाती मृत्यू - या धक्क्याने आयुष्य कोलमडलं. शिक्षण मर्यादित असल्याने रोजगाराची संधी नव्हती. मात्र खचून न जाता गोदावरीताईंनी संघर्षाचा मार्ग स्वीकारला. तुळजापूर तालुक्यातील गंदोरा (जि. धाराशिव) येथे वास्तव्यास असलेल्या गोदावरीताईंना स्वयं शिक्षण प्रयोग (SSP) या संस्थेमार्फत महिला स्वयंमदत केंद्रात काम करण्याची संधी मिळाली. प्रशिक्षण, संघटन आणि नेतृत्व विकासाच्या प्रक्रियेतून त्यांच्यातील सुप्त क्षमता उजेडात आली. २०१२ ते २०१५ दरम्यान मराठवाड्यात भीषण दुष्काळ पडला होता. उपासमार, पाणीटंचाई आणि रोजगाराचा अभाव यामुळे परिस्थिती गंभीर झाली होती. अशा वेळी गोदावरीताईंनी हजारो शेतकरी महिलांना एकत्र केलं. स्थानिक अन्नसुरक्षा उपक्रम,पाणी व्यवस्थापनाबाबत जनजागृती महिलांच्या उत्पन्नवाढीसाठी सामूहिक प्रयत्न या उपक्रमांमुळे गावांतील अन्नटंचाई कमी झाली. महिलांच्या हातात आर्थिक स्वावलंबनाचं साधन आलं.

महिलांच्या नेतृत्व विकासासाठी त्यांनी स्थापन केलेली महिला फेडरेशन आज ५००० हून अधिक सदस्यांसह कार्यरत आहे. महिला व्यवसायांसाठी कर्जसहाय्य,दूध डेअरी प्रकल्पांना चालना, अशा विविध उपक्रमांमुळे ग्रामीण भागात मोठा दिलासा मिळाला.

गोदावरीताईंनी महिलांना केवळ बचत गटापुरतं मर्यादित न ठेवता आरोग्य, कुपोषण आणि हक्कांच्या प्रश्नांवर आंदोलन करण्यास प्रवृत्त केलं. ग्रामीण महिलांना एकत्र आणून नेतृत्वाची नवी परंपरा त्यांनी निर्माण केली. ग्रामीण पातळीवरील कार्याची दखल घेत स्वयं शिक्षण प्रयोग (SSP) या संस्थेला एर्रिरी झीळूश हा प्रतिष्ठेचा आंतरराष्ट्रीय सन्मान मिळाला.

या पार्श्वभूमीवर गोदावरीताईंना न्यूयॉर्क येथे United Nations General ssembly मध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली. संयुक्त राष्ट्रांच्या व्यासपीठावर ग्रामीण महिलांच्या प्रश्नांवर मांडलेले विचार हे महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद ठरले.

त्यानंतर त्यांना 'ग्लोबल गोदावरी' म्हणून ओळख मिळाली. गोदावरीताईंनी केनिया, फिलिपाईन्स, इटली, नेपाळ, अमेरिका, तुर्कस्थान, ब्राझील, जपान, जर्मनी, इंडोनेशिया, मलेशिया, ईजिप्त अशा विविध देशांना अभ्यासदौरे केले. देशांतर्गत गुजरात, तामिळनाडू (सुनामीग्रस्त भाग), बिहार, ओरिसा, कर्नाटक, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश आदी राज्यांत जाऊन त्यांनी महिला सक्षमीकरण, आरोग्य आणि उद्योजकतेबाबत मार्गदर्शन केलं.

आज 'ग्लोबल गोदावरी' या केवळ एक व्यक्ती नाही, तर महिला सक्षमीकरणाची चळवळ बनली आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्यांनी दाखवून दिलं की जिद्द आणि संघटनशक्ती असेल तर ग्रामीण महिलाही जागतिक स्तरावर आपली छाप सोडू शकतात.



**गोदावरी क्षिरसागर**
महिला सक्षमीकरण संघटक

महिला दिनानिमित्त त्यांच्या कार्याला सलाम करताना, समाजातील प्रत्येक स्त्रीसाठी त्यांचा प्रवास प्रेरणादायी ठरतो.

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## कास्ती खुर्द शाळेत आरोग्य विघातक व्यसनी साहित्याची होळी

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.७ मार्च -**

सध्याच्या झगमगत्या व गतिमान युगात अनेकजण विविध व्यसनांच्या आहारी जात आहेत. ग्रामीण भागातील युवकांना वेगवेगळ्या व्यसनांपासून रोखण्यासाठी कास्ती खुर्द शाळेच्या वतीने शालेय होळीचा नावीन्यपूर्ण उपक्रम घेण्यात आला . शाळेच्या वेळेनंतर सायंकाळी सहा वाजता होळी सणाचे महत्व, सामाजिक उपयोगिता विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आली . आजच्या होळी सणाच्या निमित्ताने मानवी आरोग्यास घातक असणारे गोवा, मावा, गुटखा व स्टींग सारख्या शरीरास घातक पदार्थ व पेयांचे दुष्परिणाम शिक्षक गोविंद घारगे यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना निर्व्यसनी राहण्याची शपथ देण्यात आली. यावेळी जमा झालेले आरोग्यसाठी घातक असणाऱ्या साहित्याची होळी करत बोंब ठोकण्यात आली. शाळेने विद्यार्थी व गावापुढे नवीन आदर्श निर्माण करून दिला आहे. यावेळी गावातील युवक व नागरिक उपस्थित होते.

आदर्श समाज व सुसंस्कृत नागरिक घडवण्याचे सर्वोच्च पवित्र मंदीर म्हणजे तुमची आमची सर्वांची मराठी जिल्हा परिषद शाळा याची प्रचिती सर्वांना आली.



## संक्षिप्त वृत्त...

### स्वप्नाली देशमुख हिची निवड

**तुळजापूर, दि.७ मार्च -**

येथील श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालयाची बी.टेक (सिव्हिल इंजिनीअरिंग) शाखेची विद्यार्थिनी देशमुख स्वप्नाली सुधीर हिने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तिची कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, कल्याण येथे 'कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-क' या पदावर निवड झाली आहे. स्वप्नालीने जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर हे यश मिळवले असून, नामांकित महानगरपालिकेत मानाच्या पदावर नियुक्ती झाल्याने महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. तिच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे विश्वस्त, प्राचार्य, उपप्राचार्य व रजिस्ट्रार यांनी अभिनंदन केले. तसेच सिव्हिल इंजिनीअरिंग विभागाचे विभागप्रमुख प्रा. सचिन सगरे आणि सर्व प्राध्यापकांनी स्वप्नालीला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### नगर परिषद शाळेत 'आनंद मेळावा'

**तुळजापूर, दि.७ मार्च -**

येथील नगर परिषद प्राथमिक शाळा क्र.२ मध्ये विद्यार्थ्यांचा आनंद मेळावा उत्साहात पार पडला. मेळाव्याचे उद्घाटन उपनगराध्यक्ष रामचंद्र रोचकरी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शिक्षण विभाग प्रमुख अशोक शेंडगे, म.वि.रा. शिंदे प्रवासी वसतिगृहाचे मुख्याध्यापक, तुळजामाता इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक राजेश जगताप, विराज खोत, महादेव बडुरे, सौदागर काळे, किशोर काळे, मधुकर रणवीर, अक्षय कंदले तसेच शाळेचे मुख्याध्यापक गणेश रोचकरी उपस्थित होते. मेळाव्यात इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी भाजीपाला, खाद्यपदार्थ, लिंबू सरबत, अल्पोपहार आदी विविध वस्तूंची विक्री केली. पालक व परिसरातील नागरिकांनी उपस्थित राहून खरेदी केली. या मेळाव्यात एकूण १५ हजार ४०९ रुपयांची उलाढाल झाली. मेळावा यशस्वी करण्यासाठी बाळासाहेब जेटीथोर, महेंद्र पाटील, महेंद्र कावरे, सुरजमल शेटे, सुज्ञानी गिराम, विद्यादेवी स्वामी आदींनी सहकार्य केले.

### जि.प. स्पेशल शाळेत आनंद मेळावा

**मुरूम, दि.७ मार्च -**

मुरूम येथील भीमनगर परिसरातील जिल्हा परिषद स्पेशल शाळेत विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेला आनंद मेळावा शनिवारी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. मेळाव्याचे उद्घाटन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष निर्मलकुमार जगन्नाथ लिमये यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका तुपेरे, राहुल गायकवाड, शिवकर, पोतदार, शिवाजी गायकवाड, थिटे, विजय देशमाने, रुपचंद ख्याडे, बोईनवाड यांच्यासह शिक्षकवर्ग तसेच सूरज कांबळे, अरविंद कांबळे आणि पालक उपस्थित होते. मेळाव्यात विद्यार्थ्यांनी भाजीपाला विक्री, हॉटेल, फळ विक्री, पुस्तक विक्री आदी विविध व्यवसायांची दुकाने लावून व्यवहारिक ज्ञान मिळवले.

### मुरूम पालिकेत सभापतींच्या निवडी

**मुरूम, दि.७ मार्च -**

मुरूम नगरपालिकेच्या स्थायी, पाणीपुरवठा, बांधकाम, महिला व बालकल्याण, नियोजन व विकास तसेच स्वच्छता व आरोग्य समितींच्या सभापतीपदाची निवड प्रक्रिया बिनविरोध पार पडली. या निवडीसाठी शनिवारी (दि.२४) पालिका सभागृहात विशेष सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेचे पीठासीन अधिकारी म्हणून नळदुर्ग पालिकेचे मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांनी कामकाज पाहिले. परंपरेनुसार स्थायी समितीच्या सभापतीपदी नगराध्यक्ष बापुराव पाटील यांची, तर पाणीपुरवठा समितीच्या सभापतीपदी उपनगराध्यक्ष रमेश चव्हाण यांची बिनविरोध निवड करण्यात आली. तसेच सार्वजनिक बांधकाम समितीच्या सभापतीपदी सिद्धरय्या ख्याडे, स्वच्छता व आरोग्य समितीच्या सभापतीपदी राजेंद्र बेंडकाळे, नियोजन व विकास समितीच्या सभापतीपदी रुपचंद गायकवाड आणि महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी सौ. ज्योती शेळके यांची बिनविरोध निवड झाली. निवडीनंतर नवनिर्वाचित सभापती व सदस्यांचा पालिका प्रशासनाकडून सत्कार करण्यात आला.

# सर्वांगीण विकासासह रोजगार निर्मितीला बळ देणारा अर्थसंकल्प : आ. राणादादा

## जिल्ह्याला मिळणार कृष्णा खोऱ्यातील पुराचे पाणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ मार्च -**

कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील समुद्राला वाहून जाणारे पुराचे पाणी मराठवाड्यात वळवून आणण्याच्या आपण मांडलेल्या महत्वाकांक्षी प्रकल्पाला अर्थसंकल्पातील तरतुदीमुळे आता मोठी गती मिळणार आहे. धाराशिव जिल्ह्यातील पात्र शेतकरी बांधवांनाही पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेतून २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीचा दिलासा मिळणार आहे. तसेच नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकरी बांधवांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान मिळणार आहे.

धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वेमार्गाच्या माध्यमातून पर्यटनाला उभारी देणे आणि दळणवळणाची सक्षम जाळे निर्माण करण्याचे जे ध्येय आपण ठरवले होते त्याला या अर्थसंकल्पामुळे मोठी ताकद मिळाली आहे. जिल्ह्यातील सर्वच तालुक्यांच्या विकास कार्यक्रमाला अर्थसंकल्पातील तरतुदींमुळे आणखी मोठी गती मिळणार असा विश्वास आहे. कृष्णा खोऱ्यातील पुराचे पाणी भीमा खोऱ्यातील पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागात वळवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. जागतिक बँकेच्या सहाय्याने प्रस्तावित असलेल्या या प्रकल्पासाठी या अर्थसंकल्पात महत्वपूर्ण तरतूद करण्यात आली आहे.

धाराशिव-तुळजापूर-सोलापूर या ८४ किलोमीटर लांबीच्या रेल्वे मार्गासाठी करण्यात आलेल्या तरतुदीमुळे जिल्ह्यातील दळणवळणाचे जाळे आणखी सक्षम होणार आहे. त्यामुळे आपण पर्यटन व्यवसायाच्या माध्यमातून रोजगार निर्मितीच्या दृष्टीने डोळ्यासमोर ठेवलेले ध्येय पूर्ण करण्यासाठी आता आणखी मदत होणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्राआत्या पवार यांनी सादर केलेला हा अर्थसंकल्प धाराशिव जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्राच्या प्रगतीला नवी दिशा देणारा आहे.



प्रगतीशील, शाश्वत, सर्वसमावेशक आणि सुशासन या चार स्तंभांवर आधारित हा अर्थसंकल्प जिल्हयातील शेतकरी, कष्टकरी आणि सामान्य नागरिकांचे जीवनमान उंचावणारा ठरेल, असा विश्वास आहे. धाराशिव जिल्ह्याच्या वतीने मुख्यमंत्री देवेंदजी फडणवीस व एकनाथराव शिंदे व सुनेत्राताई पवार या दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचे विशेष आभार !

अर्थसंकल्पात राज्यातील पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देणारी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' जाहीर करण्यात आली आहे. तसेच नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान मिळणार आहे. मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना सुरूच राहणार आहे. त्यासाठी सुमारे २०,००० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. साडेसात एचपीपर्यंत वीज मोफत दिली जाणार असून शेतकरी बांधवांना दिवसा वीजपुरवठा करण्याचा महत्वपूर्ण निर्णयही घेण्यात आला आहे. त्यामुळे धाराशिवमधील हजारो शेतकरी बांधवांना मोठा दिलासा मिळणार आहे. धाराशिव जिल्ह्याचा समावेश आता आकांक्षित जिल्हे व तालुके कार्यक्रमात करण्यात आला आहे. या कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील सर्व तालुके आणि इतर भागांचा गतिमान विकास साधला जाणार आहे. एक हजार लोकसंख्या असलेले प्रत्येक गाव सिमेंट रस्त्यांनी जोडण्यात येणार आहे. त्यासाठी जिल्ह्याला अधिक निधी आणि सोयीसुविधा प्राप्त होतील असा देखील विश्वास आहे.

### शेती, रस्ते, रेल्वे, सामाजिक न्याय सर्व आघाड्यांवर जिल्ह्याला झुकते माप...

कृष्णा खोऱ्यातील पुराचे पाणी मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागात वळवण्याचे नियोजन करण्यात आले आहेच. राज्यात आणखी २५ लाख महिलांना लखपती दीदी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. ग्रामीण भागातील आरोग्य निदानासाठी आशियाई विकास बँकेच्या मदतीने ४,५०० कोटींची प्रगती योजना राबवण्यात येणार आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०' अंतर्गत शेतकऱ्यांना दिवसा १०० टक्के वीजपुरवठा करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. अनुसूचित जाती आणि आदिवासी घटकांसाठी अनुक्रमे २३,१५० कोटी आणि २१,७२३ कोटी रुपयांची भरीव तरतूद करण्यात आली आहे. एकंदरीत हा अर्थसंकल्प धाराशिव जिल्ह्याच्या शाश्वत विकासाची पायाभरणी करणारा आहे. शेती, रस्ते, रेल्वे आणि सामाजिक न्याय या सर्वच आघाड्यांवर महायुती सरकारने जिल्ह्याला झुकते माप दिले आहे.

# भूम-परंडा-वाशी पंचायत समितीवर भगवा

## नवनिर्वाचित सभापती-उपसभापतींचा आमदार तानाजी सावंत यांच्या हस्ते सत्कार...



**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.७ मार्च -**

भूम, परंडा व वाशी पंचायत समितीतील नवनिर्वाचित सभापती व उपसभापती यांचा पुणे येथे माजी मंत्री आमदार तानाजी सावंत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. (दि.६) मार्च रोजी तिन्ही तालुक्यांतील पंचायत समित्यांमध्ये सभापती व उपसभापती पदाच्या निवडी पार पडल्या.

या निवडीत तिन्ही पंचायत समित्यांवर शिंदे गटाचा भगवा फडकला असून तिन्ही ठिकाणी महिला सभापतींची निवड झाल्याने महिलाराज आले आहे. वाशी पंचायत समितीच्या सभापतीपदी प्रणिता प्रवीण गायकवाड यांची निवड झाली असून उपसभापतीपदी नितीन शिवाजी रणदिवे यांची निवड करण्यात आली.

तसेच भूम पंचायत समितीच्या सभापतीपदी पूजा विशाल ढगे यांची निवड झाली असून उपसभापतीपदी प्रियंका प्रवीण रणबागुल यांची निवड करण्यात आली.

तर परंडा पंचायत समितीच्या सभापतीपदी अर्चना अण्णासाहेब जाधव यांची निवड झाली असून उपसभापतीपदी परशु चंद्रकांत गवारे यांची निवड करण्यात आली.

निवडीनंतर सर्व नवनिर्वाचित सभापती-उपसभापती तसेच शिवसेना पदाधिकारी यांचा आमदार तानाजी सावंत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# कर्जमाफीमिळेपर्यंत सरकारवर विश्वास कसा ठेवायचा? : आ. कैलास पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ मार्च -**

मागच्या वेळी याच सरकारने दिलेली कर्जमाफीचा कसा अनुभव आला हे सर्वांनी पाहिलं आहे. त्यामुळे आताही अटी निकष पूर्ण करण्यात यानी पुढची निवडणूक डोळ्यासमोर ठेवू नये असे म्हणत जोवर कर्जमाफीचा लाभ शेवटच्या शेतकऱ्यांना मिळणार नाही तोवर या सरकारवर विश्वास कसा ठेवायचा असा सवाल आमदार कैलास पाटील यांनी उपस्थित केला आहे.

यावेळी आमदार पाटील म्हणाले की, शेतकरी अनुदान योजना पाहता तिथं अनुदान दिले जात नाही. त्यामुळे कालच्या आर्थिक पाहणी अहवालामध्ये शेती उत्पन्न घटल्याच दिसून येत आहे.

याच गतिमान सरकारने केलेली ही कामगिरी आहे. कोविड काळात जे क्षेत्र संजीवनी ठरलं त्याची पुढच्या काही सालात सरकारचे शेतकरी विरोधी धोरण कस मारक ठरलं. शिवाय या सरकारने कर्जमाफीचा निर्णय घेण्याची तयारी केली असताना मार्च २०२५ मध्ये कर्जवसुलीची सक्ती का केली जे शेतकरी चालू बाकीमध्ये गेले त्यांची या सरकारने फसवणूक केली नाही का असा प्रश्न आमदार पाटील यांनी सरकारला विचारला आहे. मोठ्या उद्योगपतीसाठी ज्या प्रकारे गालिचा अंथरलेला असतो तसा विचार शेतकरी, बेरोजगार, महिला यांच्या बाबत का होत नाही.

लाडकी बहिण योजना मधून २१०० रुपये देणं, भावांतर योजना, जीएसटीतून राज्य सरकारची करमाफीचं आश्वासन दिलं त्यावर सरकार बोलत नाही.

# अर्थसंकल्पात शेतकरी, युवक व सर्वसामान्यांचा अपेक्षाभंग : डॉ. पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिर्व, दि.७ मार्च -**

महाराष्ट्र राज्याच्या अर्थमंत्र्यांनी सादर केलेला अर्थसंकल्प हा सर्वसामान्य नागरिक, शेतकरी आणि युवकांच्या अपेक्षांना न्याय देणारा नाही, अशी तीव्र प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी व्यक्त केली.



डॉ. पाटील म्हणाले की, राज्यातील शेती, ग्रामीण अर्थव्यवस्था, रोजगारनिर्मिती आणि बेरोजगारी यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर या अर्थसंकल्पात ठोस उपाययोजना दिसत नाहीत. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे स्वागत असले तरी शेतमालाला हमीभाव, तसेच शेतीसाठी लागणारी खते, बी-बियाणे आणि फवारणीच्या औषधांच्या किमती कमी करण्याबाबत कोणतीही ठोस तरतूद करण्यात आलेली नाही.

राज्यातील वाढती महागाई, शेतकऱ्यांचे प्रश्न, सिंचन प्रकल्प तसेच ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांसाठी अपेक्षित निधी देण्यात सरकार अपयशी ठरल्याची टीका त्यांनी केली. राज्याचा वाढता कर्जभार लक्षात घेता आर्थिक शिस्त आणि दीर्घकालीन नियोजन आवश्यक असताना सरकारने त्याकडे गांभीर्याने पाहिलेले दिसत नाही, असेही त्यांनी नमूद केले.

# कृष्णाई ऊळेकर यांच्या लोकगीत-भारूडाला प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.७ मार्च -**

शिव-बसव-राणा सार्वजनिक जन्मोत्सव समितीच्या वतीने हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा बसवेश्वर महाराज व वीर महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंतीनिमित्त दि.६ मार्च रोजी प्रसिद्ध लोकगीतकार व भारूडकार कु. कृष्णाई ऊळेकर यांच्या लोकगीत, भारूड व पोवाड्यांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



कार्यक्रमाच्या प्रारंभी महाराष्ट्र राज्य पोलिस प्राधिकरण समितीचे सदस्य उमाकांत मिटकर, जि.प. सदस्य डॉ. जितेंद्र कानडे, सामाजिक कार्यकर्ते डॉ. जितेंद्र पाटील, प्राचार्य डॉ. सुभाष राठोड, राजेंद्र जाधव, मुकुंद नाईक, विलास येडगे आदी मान्यवरांच्या हस्ते तीनही महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.

यानंतर कृष्णाई ऊळेकर व त्यांच्या सहकलाकारांनी लोकगीत, भारूड व पोवाड्यांचा बहारदार कार्यक्रम सादर केला. दार उघड बये, दार उघड, वासुदेव, पिंगळा, जागरण-गोंधळ यांसह विविध लोकगीतांनी उपस्थितांची मने जिंकली.

यावेळी नगराध्यक्ष बसवराज धरणे, मारुती खारवे, सुधीर पोतदार, आकाश कुलकर्णी, विनायक अहंकारी, सरदारसिंग ठाकुर, शाम कनकधर, वैभव पाटील, दत्तात्रय वाघमारे, दिलीप ठाकुर, भीमाशंकर बताले, सोमनाथ म्हेत्रे, चंदर सगर आदींसह नागरिक उपस्थित होते.

# अश्लेष मोरे यांच्या वाढदिनी विविध सामाजिक उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.७ मार्च -**

भारत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष तथा धाराशिव युवक काँग्रेसचे नेते अश्लेष भैय्या मोरे यांच्या वाढदिवसानिमित्त अश्लेष भैय्या मित्र मंडळाच्या वतीने विविध सामाजिक व जनकल्याणकारी उपक्रम राबविण्यात आले. या उपक्रमांमधून गरजू कुटुंबांना मदतीचा हात देण्याबरोबरच युवक, विद्यार्थी आणि शेतकरी यांनाही लाभ मिळेल असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

वाढदिवसानिमित्त आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना आर्थिक मदत देण्यात आली. यात पेठ सांगवी येथील कै. महादू बसाप्पा माळी, मोजे गुंजोटी येथील कै. धोंडीबा उर्फ प्रमोद महाळप्पा दूधभाते (गळफास घेऊन आत्महत्या), मोजे बलसुर येथील कै. विजय दत्तात्रय चव्हाण (गळफास घेऊन आत्महत्या) तसेच मौजे बलसुर येथील कै. विजय सिताराम सरोदे यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्यात आली. या मदतीमुळे संकटात सापडलेल्या कुटुंबांना दिलासा मिळाला.

याचबरोबर महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आयोजित 'करीअर कट्टा' अंतर्गत श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या सेंटर ऑफ एक्सलन्स आणि ट्रेनिंग अँन्ड प्लेसमेंट सेलच्या माध्यमातून भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या रोजगार मेळाव्यात ६५० जागांसाठी बेरोजगार युवक-युवतींना संधी उपलब्ध करून देण्यात आली. विविध कंपन्यांच्या प्रतिनिधींनी उपस्थित राहून उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या.

तसेच शालेय विद्यार्थीनी दत्तक योजना अंतर्गत जिल्हा परिषद प्रशाला, उमरगा येथील गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, गणवेश आणि शालेय बॅगचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध झाले.

शेतकरी बांधवांसाठीही विविध उपक्रम राबविण्यात आले.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या माती परीक्षण केंद्राच्या वतीने उमरगा-लोहारा तालुक्यातील १५० शेतकऱ्यांच्या शेतीमातीची तपासणी करून त्यांचे अहवाल वाटप करण्यात आले. तसेच शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञानाबाबत मार्गदर्शन करण्यासाठी भव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाला नगर उपाध्यक्ष विजय वाघमारे, नगरसेवक विशाल काणेकर, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष अर्जुन बिराजदार, नगरसेवक दळगडे, जयेश बिराजदार, रमेश जाधव, प्रकाश सगर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

# अभिनेता उमेश जगताप राज्यस्तरीय झी मराठी नाट्यगौरव पुरस्कार

## इथेच टाका तंबू या नाटकातील उत्कृष्ट भूमीकेसाठी करण्यात आला गौरव....

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ मार्च -**

तुळजापूर येथील अभिनेते उमेश जगताप यांनी रंगभूमीवरील आपल्या प्रभावी अभिनयाच्या जोरावर पुन्हा एकदा राज्यस्तरीय पातळीवर मानाचा झी मराठी नाट्यगौरव पुरस्कार पटकावला आहे.

यावर्षी प्रायोगिक विभागातील सहायक अभिनेता हा पुरस्कार त्यांना इथेच टाका तंबू या नाटकातील त्यांच्या उत्कृष्ट भूमिकेसाठी जाहीर झाला आहे. त्यांच्या या यशामुळे तुळजापूरसह संपूर्ण धाराशिव जिल्ह्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून कलाक्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. उमेश जगताप हे सिनेमा, दूरदर्शन मालिका आणि नाटक या तिन्ही माध्यमांमध्ये सातत्याने विविधांगी भूमिका साकारत आहेत. मात्र मुळात रंगभूमीचा पिंड असलेला हा कलाकार नाटकांमधील भूमिकांमुळे विशेष उठून दिसतो. व्यावसायिक असो वा प्रायोगिक, प्रत्येक नाटकामध्ये त्यांनी आपल्या अभिनयाची वेगळी छाप निर्माण केली आहे. त्यांच्या दमदार आणि वास्तवदर्शी अभिनयामुळे प्रेक्षकांची तसेच समीक्षकांचीही दाद त्यांना मिळत आली आहे.

इथेच टाका तंबू या नाटकाचे लेखन दत्ता पाटील यांनी केले असून दिग्दर्शन सचिन शिंदे यांनी केले आहे. या नाटकाची निर्मिती यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक यांनी केली आहे. सामाजिक आशय मांडणाऱ्या या नाटकाला यावर्षी झी मराठी नाट्यगौरव पुरस्कारांसाठी तब्बल ११ नामांकने मिळाली होती. अभिनय, दिग्दर्शन, नेपथ्य आणि प्रकाशयोजना अशा विविध विभागांमध्ये या नाटकाला गौरव प्राप्त झाला आहे. उमेश जगताप यांना गतवर्षी देखील दगड आणि माती या नाटकातील भूमिकेसाठी प्रायोगिक विभागातील सहायक अभिनेता झी नाट्यगौरव पुरस्कार मिळाला होता. सलग दुसऱ्या वर्षी मिळालेला हा सन्मान त्यांच्या अभिनयातील सातत्य आणि गुणवत्तेची पावती मानली जात आहे.



तुळजापूरच्या या कलावंताने राज्याच्या नाट्य व चित्रपट क्षेत्रात मिळवलेले यश हे धाराशिव जिल्ह्यासाठी निश्चितच अभिमानास्पद ठरत आहे. त्यांच्या पुढील कलाप्रवासासाठी विविध स्तरांतून शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.